



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार ३० डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# भाजपमध्ये घराणेशाहीला चाप

## मंत्री, खासदार आणि आमदारांच्या नातेवाईकांना महापालिकेचे तिकीट नाही!

**पुणे/प्रतिनिधी :** माहापालिका निवडणुकीत आमदार, खासदार किंवा आजी-माजी नगरसेवक यांच्या नातलगांना उमेदवारी देउ नये, अशा प्रकारचा आदेश भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने दिला आहे. त्यामुळे पुण्यात इच्छुक असलेल्या आमदार किंवा नगरसेवक यांच्या नातेसंबंधातील दावेदारांची पंचायत होणार आहे.

काँग्रेसच्या घराणेशाहीवर भारतीय जनता पक्षाने सातत्याने टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षामध्ये सुद्धा गेल्या काही वर्षांमध्ये ग्रामपंचायत स्तरापासून आमदारकीपर्यंत नात्यागोत्यातील राजकारणाला महत्त्व आले होते. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकांचे अर्ज भरण्यासाठी सुरुवात झालेली असताना दिल्लीमधून नात्यागोत्यातल्या उमेदवारांना, इच्छूकांना वगळा अशा प्रकारचा आदेश आल्याचे विश्वसनीय सूत्रांनी रविवारी सांगितले.



त्यामुळे संबंधित इच्छुकांची पंचाईत होणार आहे. भाजपने निष्ठावान कार्यकर्ते, पदाधिकारी असतानाही अनेक प्रभागांमध्ये इतर पक्षातील माजी नगरसेवक, पदाधिकारी यांना पक्षात प्रवेश देउन उमेदवारी देण्याचा शब्द दिला आहे. भाजपने निश्चत केलेल्या पहिल्या यादीत बाहेरच्या पक्षातून आलेल्या पदाधिका-याचे नाव आल्यास भाजपचे पदाधिकारी नाराज होउ शकतात. तसेच, गेल्या निवडणुकीत नगरसेवक राहिलेल्या काही उमेदवारांचा पत्तादेखील या निवडणुकीत कट होण्याची शक्यता आहे. शहर भाजपमध्ये वरिष्ठ पदाधिकारी म्हणून जबाबदारी संभाळणारे, आमदार, खासदार यांच्या कुटुंबातील व्यक्ती उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांनी पक्षाच्या मुलाखतीदेखील दिलेल्या आहेत.कोअर कमिटीच्या बैठकीत त्यांच्या नावांना प्राधान्य देण्याची शिफारसदेखील करण्यात आली आहे. त्याबाबत वरिष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त करून कार्यकर्त्यांना संधी द्या, अशी सूचना केल्याने सुधारीत यादी भाजपकडून करण्यात येत आहे. ही यादी प्रदेश भाजपकडे पाठविण्यात येणार असून, त्याला मान्यता मिळाल्यानंतरच ती जाहीर केली जाणार आहे. गेल्या काही काळापासून प्रभाग पद्धतीमध्ये महिला आरक्षण झाल्याने अनेकांनी राजकारणाशी कोणताही संबंध नसलेल्या आपल्या बहिणीला, पत्नीला, (पान २ वर)

# धनुष्यबाणाचे बटन दाबणा-यांना स्वर्गातच जागा :शहाजीबापू पाटील

***सोलापूर / प्रतिनिधी-*** शिवसेना शिंदे गटाचे नेते शहाजीबापू पाटलांनी अजब वक्तव्य केले आहे. शिवसेनेला मतदान करणारे स्वर्गात जाणार असल्याचे विधान त्यांनी केले आहे. ज्यांनी धनुष्यबाणाचे बटन दाबले त्याला स्वर्गातच जागा आहे, तो नरकात जाणारच नाही अस विधान करत शहाजीबापू पाटलांनी अकलेचे तारे तोडले आहेत. सांगोल्याच्या सभेत बोलताना बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, मी खात्रीने सांगतो, ज्यांनी ज्यांनी धनुष्यबाण दाबला त्यांना त्यांना स्वर्गातच जागा आहे. नरकात तुम्हाला देव घेत नाही. स्वर्गात तुम्ही गेल्याशिवाय राहत नाही. देव तुम्हाला नरकात जाउच देत नसतो. मात्र, ज्यांनी विरोधकांची बटणं दाबली त्यांचे काय खरे नाही त्यांच्यात रामच उरला नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.तसेच यावेळी बोलताना शहाजीबापू पाटलांनी विधानसभेतल्या पराभवावरून देखील दीपक साळुंखेंवर टीका केली. ते म्हणाले,



मी भाकरीत साप पाळला होता म्हणूनच मला विधानसभेला पराभवाचा फटका बसला, असे ते म्हणाले. तसेच आपण आजही महायुतीत आहे. आपल्याला युतीचेच काम करायचे असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.पुढे शहाजीबापू पाटील म्हणाले, हा मतदारसंघ २०१४ पासून शिवसेनेचा आहे. तुम्ही आमचा सन्मान ठेवा आम्ही तुमचा कोणताही शब्द खाली पडू देणार नाही. पण तुम्ही तसे केले नाही, तर आम्ही पुन्हा एकट्या वाटेने जाउ, असा इशारा त्यांनी यावेळी भाजपला दिला. शिवाय तुम्ही आताच्या निवडणुकीत ऐकले असते तर तुम्ही सत्तेत निम्मे भागीदार झाला असता, असा टोलाही त्यांनी लगावला.

***दीपक साळुंखेंवर टीका-*** माजी आमदार व शहाजीबापू पाटलांचे कट्टर विरोधक समजले जाणारे दीपक साळुंखे यांच्यावरही त्यांनी टीका केली. ते म्हणाले, दीपक साळुंखे स्वतःला किंग मेकर म्हणतात. मी जिथे जाईल त्याचा गुलाल असतो असे ते सांगतात. मात्र, ते पांढ-या पायांचे असल्यामुळे ते ज्यांच्याकडे जातील त्यांचा पराभव नक्की, अशी जहरी टीका पाटलांनी केली.

# शिक्षक करणार भटक्या कुत्र्यांची मोजणी

**नवी दिल्ली :** सरकारने शहरातील भटक्या कुत्र्यांची मोजणी करण्याचे काम शिक्षकांकडे सोपवण्याचे आदेश दिले आहेत. सरकारी आणि खाजगी अशा



दोन्हीकडच्या शिक्षकांना भटक्या कुत्र्यांची मोजणी करण्याची सूचना देण्यात आली आहे. शिक्षण संचालनालयाने हे आदेश दिले आहेत.तसेच हे काम जनतेच्या सुरक्षेशी संबंधित असून, सर्वोच्च न्यायालयाच्या ७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये करण्यात येत असल्याने ते खूप महत्त्वपूर्ण (पान २ वर)

# प्रमुख पक्षांच्या उमेदवारांना एबी फार्मचे वाटप; उमेदवारांची होणार दमछाक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सध्या महापालिका निवडणुकांसाठी राजकीय वातावरण तापले आहे. सर्व २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ ला मतदान होईल तर १६ जानेवारी २०२६ ला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, आगामी महापालिकेच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्ष उमेदवारांना एबी फार्मचे वाटप करण्यास सोमवारपासून सुरुवात झाली आहे. उमेदवारांच्या हातात फक्त एक दिवस शिल्लक असल्याने कागदपत्रे जमा करण्यास मोठी दमछाक होणार आहे.

महापालिका निवडणुका साठी गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय पक्षांतील आघाडी आणि युतीच्या चर्चा अंतिम टप्प्यात आल्या आहेत. आघाडी आणि युतीत ज्या जागांवर सहमती झाली आहे, अशा जागांसाठी ए आणि बी फार्म वितरित करण्याची प्रक्रिया सोमवारपासून सुरू झाली. आजच



मगळवार एकच दिवस शिल्लक असल्याने त्यांची कागदपत्रे जमा करण्यासाठी आणि अर्ज भरण्यासाठी दमछाक होत आहे.युती आणि आघाडीच्या चर्चेमुळे तसेच बंडखोरी टाळण्यासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपले उमेदवार शेवटच्या क्षणी जाहीर करण्याचे ठरवले होते. त्यामुळे निश्चित केलेल्या उमेदवारांच्या याद्या सोमवारी व काहींच्या मंगळवारी टप्प्याटप्प्याने जाहीर होतील.मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत मंगळवारी संपत आहे. उद्धवसेना आणि मनसेने उमेदवारांना एबी फार्मचे वाटप सुरू केले आहे. काँग्रेसचीही मुंबईतील उमेदवारांची यादी तयार असून, तीही सोमवारी जाहीर केली , तरी काही उमेदवारांना फोनवरून अर्ज भरण्यास तयार राहायला सांगितले असल्याचे समजते. (पान २ वर)

# भाजपला मुंडे-महाजनांची गरज नाही : प्रकाश महाजन

**छ. संभाजीनगर / प्रतिनिधी-**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रवक्तेपदी राहिलेल्या प्रकाश महाजन यांनी काही महिन्यांपूर्वी मनसेला सोडचिठ्ठी दिली.त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. शिवसेनेकडून त्यांना प्रवक्तेपदाची जबाबदारीही देण्यात आली. शिवसेनेचे प्रवक्ते बनताच प्रकाश महाजन यांनी अपेक्षेप्रमाणे ठाकरे बंधू आणि भाजपवर हल्लाबोल केला. भाजपला आता मुंडे-महाजनांची गरज राहिली नाही, अशा शब्दात त्यांनी सुनावलं.प्रकाश महाजन पुढे बोलताना ठाकरे बंधूंवर टीका करत म्हणाले, तुम्ही हिंदू म्हणून कुठे आहेत, आता त्यांना मुंबईत अस्तित्व



टिकवायचे आहे, असे म्हणत शिवसेना प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी शिवसेना आणि मनसेच्या युतीवरुन ठाकरे बंधूंवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच, भाजपवरही निशाणा साधत आपण भाजपात का गेलो नाही, भाजपने मला तीन महिने ताटकाळत ठेवलं. आता, भाजपला मुंढे-महाजनांची गरज नाही, जे आहेत त्यांना संभाळा अशा शब्दात प्रकाश महाजनांनी शिवसेनेतील प्रवेशानंतर पहिल्यांदाच भाजपवर जोरदार टीका केली. मी भाजपमध्ये गेलो नाही, कारण त्यांनी मला तीन महिने ताटकळत ठेवले. मी त्यांची एंट्रन्स परीक्षा पास झालो नाही, पण ज्यांनी भाजपवर टीका केली ते सगळे आज भाजपात आहेत. दिनकर पाटील भाजपावर बोलले तो भाजपात आहे. भाजपच्या घराला दार नाही पण पहारेकरी आहेत हे सांगण्यासाठी मी मुनगंटीवार यांना फोन केला, पण त्यांनी उचलला नाही, असेही प्रकाश महाजन यांनी सांगितले.

## टँकमध्ये गुदमरून तिघांचा मृत्यू

**सांगली :** सांगली जिल्ह्यात एका कंपनीच्या सेप्टिक टँकमध्ये गुदमरून तिघांचा मृत्यू झाला आहे. तर अडकलेल्या तिघांना वाचवायला गेलेल्या पाच जणांची प्रकृती गंभीर असल्याचं म्हटलं जात आहे. प्रकृती गंभीर असलेल्या पाच जणांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेने कामगार वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.सांगलीच्या ईश्वरपूरमध्ये पेठ येतील गावच्या हद्दीतील एका कंपनीच्या सेप्टिक टँक साफ करण्याचे काम सुरू होते. यावेळी टँकमध्ये उतरलेल्या तिघा कामगारांचा ऑक्सिजन न मिळाल्याने गुदमरुन दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी घडली आहे.

## रेल्वे घसरली; 13 ठार; 98 प्रवासी जखमी

**चिवेला / वृत्तसंस्था** मेक्सिकोच्या दक्षिणेकडील ओअक्साका राज्यात आंतरसागरीय रेल्वे रुळावरून घसरली, त्यानंतर रुळावरून इंजिन, अनेक डबेही उलटले. यात १४ प्रवाशांचा मृत्यू झाला असून ९८ लोक जखमी झाले आहेत. ही रेल्वे मेक्सिकोचे आखात आणि प्रशांत महासागर यांना जोडणा-या एका नवीन रेल्वेमार्गावर धावत होती. या रेल्वे मार्गाचे संचालन मेक्सिकन नौदल करते.मेक्सिकन नौदलाच्या माहितीनुसार, रेल्वेमध्ये २५० लोक होते, ज्यात ९ क्रू मेंबरचा समावेश होता. हा अपघात चिवेला आणि निजांडा या शहरांदरम्यान एका वळणावर झाला.

## स्मृती मानधना जलद 10 हजार धावा करणारी फलंदाज

**तिरुवनंतपुरम -**भारतीय फलंदाज स्मृती मानधना महिला क्रिकेटमध्ये सर्वात जलद १०,००० धावा पूर्ण करणारी महिला ठरली. भारत आणि श्रीलंका यांच्यातील चौथ्या टी-२० सामन्यात तिने ही कामगिरी केली. मानधना हिने २८१ सामन्यांमध्ये १०,००० धावा पूर्ण केल्या आणि माजी भारतीय कर्णधार मिताली राजला मागे टाकले. मितालीने २९१ डावांमध्ये १०,००० आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या होत्या. मानधनाने भारतीय डावाच्या सातव्या षटकात १०,००० आंतरराष्ट्रीय धावांचा टप्पा गाठला.

# अमरावतीत महायुतीचे जागावाटप ठरले!

## भाजपा ५३, शिवसेना १६, वायएसपी ६

**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिका निवडणूक महायुतीत लढण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार भाजपा ५३, शिंदे शिवसेना १६ व युवा स्वाभिमान पार्टी ६ जागा लढणार असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली. याची अधिकृत घोषणा मंगळवारी दुपारनंतर होण्याची शक्यता आहे. काल तुटण्याच्या स्थितीत आलेली महायुती मंत्री संजय राठोड यांच्या मध्यस्थीने बचावली. सोमवारी खुद्द संजय राठोडच विशेष विमानाने अमरावतीत आले. त्यानंतर महायुतीतल्या जागावाटपाची चर्चा सुरू झाली. सर्वप्रथम त्यांनी शिवसेनेच्या




पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांचे म्हणणे जाणून घेतले.त्यानंतर ते व संजय रायमुलकर, अभिजीत अडसूळ चर्चा करण्यासाठी गेले. तेथे भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसोबत त्यांनी चर्चा केली. ही चर्चा संध्याकाळपर्यंत सुरू होती. तेथून संजय राठोड परत हॉटेल मैफीलवर आले. त्यांनी झालेल्या चर्चेचा तपशील शिवसेना पदाधिकाऱ्यांना सांगितला. जी माहिती सुत्रांकडून समोर आली, त्यानुसार शिवसेना १६ जागेवर लढणार असल्याचे जवळपास निश्चित झाले असून महायुतीतला आणखी एक पक्ष युवा स्वाभिमानला ६ जागा देण्यात (पान २ वर)

## पॉलिटिकल 'स्टेटस' ठेवाल तर सरकारी नोकरी गमावून बसाल !

**अकोला :** निवडणुकीच्या काळात सोशल मीडियावर राजकीय 'स्टेटस', पोस्ट, रील्स शेअर करणे शासकीय कर्मचा-यांना महागात पडू शकते. थेट किंवा अप्रत्यक्ष प्रचार केल्यास कठोर



कारवाई होते. यामध्ये निलंबन ते नोकरी जाण्यापर्यंतची शिक्षा होउ शकते. निवडणुकीत अनेक शासकीय कर्मचारी साहेबांचे समर्थक किंवा भाउबंदांचे(पान २ वर)

# बांगलादेशच्या आखाड्यात 91 जागांवर हिंदू टक्कर देणार!

**ढाका/वृत्तसंस्था-**बांगलादेशात सध्या हिंदू आणि इतर अल्पसंख्याक समाजावर होणारे हल्ले थांबण्याचे नाव घेत नाहीत. दीपू चंद्र दास आणि अमृत मंडल यांच्यासारख्या तरुणांची जमावाने केलेली हत्या असो किंवा मंदिरांची विटंबना, या घटनांमुळे तिथला हिंदू समाज दहशतीखाली आहे. मात्र, आता याच अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी बांगलादेशच्या निवडणुकीत एका नव्या पक्षाने शड्डू ठोकला आहे. बांगलादेश माइनारिटी जनता पार्टी आता आगामी निवडणुकीत हिंदूंचा प्रबळ आवाज बनून रिंगणात उतरणार आहे. येत्या फेब्रुवारी महिन्यात बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. या पार्श्वभूमीवर बीएमजेपीने ९१ जागांवर आपले उमेदवार उभे करण्याची तयारी केली आहे. पक्षाचे अध्यक्ष सुकृती



कुमार मंडल यांनी स्पष्ट केले की, ज्या मतदारसंघात हिंदू मतदारांची संख्या २० ते ६० टक्क्यांपर्यंत आहे, अशा जागांना त्यांनी प्राधान्य दिले आहे. ३०० पैकी ४० ते ४५ जागांवर विजय मिळवून संसदेत अल्पसंख्याकांचे प्रश्न मांडण्याचा या पक्षाचा निर्धार आहे. सुकृती कुमार मंडल यांनी भारत सरकारलाही एक महत्त्वाचे आवाहन केले आहे. भारताने आता ढाकाबाबत आपले धोरण बदलण्याची गरज (पान २ वर)


## बेस्टची 10 ते 12 जणांना धडक, दोन महिलांचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतल्या भांडुपमध्ये बसने १० ते १२ जणांना चिरडलं आहे. या घटनेत दोन महिलांचा मृत्यू झाल्याची माहिती येते आहे. मुंबईत बेस्ट बसचा हा अपघात झाला आहे. भरधाव बसने काही लोकांना चिरडलं आहे ज्यामध्ये दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. क्षत्रूच या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार हा भयंकर अपघात आहे. या अपघातात भरधाव बेस्टने १० ते १२ जणांना



उडवलं. चालकाचा बसवरचा ताबा सुटल्यामुळे हा अपघात झाल्याची माहिती आहे. या घटनेत दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. मुंबईतल्या भांडुप रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या बस डेपोजवळ बेस्ट बस भरधाव वेगात आली. यावेळी लोक कामावरुन घरी चालले होते. या बसने १० ते १२ जणांना जोरदार धडक दिली. या घटनेत दोन महिलांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी मोठी गर्दी झाली. अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहचले. अपघातातील जखमींना जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव(पान २ वर)






# न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कुलचा रौप्य महोत्सव साजरा







**अमरावती/प्रतिनिधी :** स्थानिक बालाजी नगर, मोती नगर वार्ड स्थित न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कुलचा २५ वर्षाचा यशस्वी प्रवास रौप्य महोत्सवाने उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे हा उद्देश या कार्यक्रमाचा होता.

सदर कार्यक्रमा अंतर्गत शिक्षक तसेच विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा व कार्यक्रमांची आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांकरिता चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, तसेच विविध क्रीडा स्पर्धा, आयोजित करण्यात आल्या. एकूण सहा दिवस चाललेल्या या कार्यक्रमामध्ये विविधता दिसून आली.

कार्यक्रमाच्या प्रथम दिवशी मशाल पेटवून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले-यादिवशी हातात पेटती मशाल घेउन मॅरेथॉन रॅली काढण्यात आली. सबनीस प्लॉट , कवर नगर, मार्गाने विद्यार्थ्यांसह काढलेल्या या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी चौका चौकात योगा प्रदर्शन आणि योगासनांचे विविध फोर्मेशन सादर केले. याप्रसंगी शिक्षक कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी रॅली मध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला फरशी स्टाप वरील शिवाजी चौकामध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हारार्पण आणि फटाक्यांची आतिषबाजी करून रॅलीचे समापन करण्यात आले. दुस-या दिवशी विद्यार्थ्यांकरीता आनंद मेळाव्या चे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल, मेंदी स्टाल, पेंट टॅटू गेम झोन इत्यादी विविध प्रकारचे स्टॉल लावले होते. यामध्ये छोट्या छोट्या उद्योगातून पैसा कमविण्याचे कौशल्य आत्मसात करून स्वयंरोजगार कसा निर्माण करावा याचा धडा विद्यार्थ्यांना शिकायला मिळाला-

तिस-या दिवशी विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या यामध्ये विद्यार्थी जीवनात खेळाचे महत्व शिक्षक पटवून देणे आणि आरोग्याच्या दृष्टीने मैदानी खेळ संस्कृती विद्यार्थ्यांमध्ये रु जाविण्याचा हा छोटासा प्रयत्न होता. यावेळी विद्यार्थ्यांसोबतच शिक्षक तसेच सर्व कर्मचा-यांकरिता सुद्धा .विविध क्रीडास्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यामध्ये संगीत खुर्ची क्रिकेट टग ऑफ वार कबड्डी, खो-खो, लंगडी, स्लो सायकलींग इत्यादी खेळांचा समावेश होता. चौथ्या शिक्षकांकारीता कराओके गित गायन स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांकरिता मिस मॅच स्पर्धा आणि विविध आंतर शालेय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यावेळी शहरातील अनेक प्रतिष्ठित शाळांनी आंतर शालेय स्पर्धेमध्ये हिरीरीने सहभाग घेतला होता. पाचव्या दिवशी आयोजित. वार्षिक स्नेह संमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. स्नेह संमेलनाकरीता संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिल आसलकर तसेच असोसियेट डायरेक्टर उत्कर्ष आसलकर उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते माता सरस्वती पूजन हारार्पण तसेच दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम गणेश वंदना नृत्य सादर करून सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाकरीता थीम नृत्य सादर करण्यात आले. महाराष्ट्रामध्ये पूर्वापार चालेत आलेले आणि सध्या लोप पावत असलेले कडकलक्ष्मी नृत्य बाला डान्स कोळी नृत्य, गोंधळ नृत्यट असे अनेक प्रकारचे नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले तसेच आपल्या नृत्यातून विद्यार्थ्यांनी दिवंगत बॉलीवूड कलाकारांना श्रद्धांजली म्हणून त्यांच्या सुप्रसिद्ध गाण्यांवर नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या अखेरीस शाळेच्या रौप महोत्सवानिमित्य केक कापून उपस्थित विद्यार्थ्याना वितरीत करण्यात आला. स्नेहसंमेलनामध्ये पालक तसेच विद्यार्थी अत्यंत उत्साहात सहभागी झालेत. स्नेहसंमेलन सोहळा शाळेच्या प्रांगणात पार पडला.कार्यक्रमाच्या सहाव्या दिवशी शाळेतर्फे विद्यार्थी शाळेचे कर्मचारी तसेच शिक्षकांसाठी स्नेह भोजन आयोजित करून शाळेच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सहा दिवसीय कार्यक्रम सोहळा सर्वांनी आनंदाने पार पाडून स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला.शाळेच्या दीर्घकालीन प्रवासात हातभार लावुन शाळेच्या प्रगतीकरिता सहकार्य करणा-या समस्त कर्मचारी व शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिल आसलकर तसेच जयश्री अनिल आसलकर यांनी सर्वांना मनापासून धन्यवाद देउन आभार मानले.

पान १ व १० वरून

## भाजपमध्ये घराणेशाहीला

आईला किंवा सुनेला, मुलीला उभे करून महापालिकेवर अप्रत्यक्षपणे सत्ता मिळवली होती. भारतीय जनता पक्षामध्ये सुद्धा नात्यागोत्याच्या राजकारणाला बहर आला होता. अशा काळात केंद्रीय नेतृत्वाने नव्या चेह-यांना संधी देण्यासाठी स्थानिक पातळीवर घराणेशाही संपवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे स्वागत कार्यकर्ते करीत आहेत.

## शिक्षक करणार भटक्या

आहे, असेही शिक्षण संचालनालयाने म्हटले आहे. मुलांना सुरक्षित ठेवणे आणि वेळीच समस्येची माहिती मिळवणे हा हे पाउल उचलण्यामागचा हेतू आहे. ज्यामुळे महानगरपालिका किंवा पशू विभाग योग्य ती कारवाई करू शकतील, असे प्रशासनाने सांगितले. मात्र अनेक शिक्षक संघटनांनी या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. शिक्षकांचे मुख्य काम हे भटक्या कुत्र्यांची मोजणी करणे हे नाही, तर शिक्षण देणे हे आहे, असे शिक्षक संघटनांनी सांगितले. या निर्णयाबाबत सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. तसेच काही जण मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा योग्य निर्णय असल्याचे सांगत आहेत. तर काही जण सरकारने यासाठी वेगळा स्टाफ किंवा एजन्सी नियुक्त केली पाहिजे असे सांगत आहेत.

## प्रमुख पक्षांच्या उमेदवारांना

दरम्यान, आपने तिसरी यादी रविवारी जाहीर केली आहे.

**भाजपकडून उमेदवारांना एबी फार्मचे वाटप**

काल दिवसभर बैठकींचा सिलसिला होउनही फार्मुल्यावर शिक्कामोर्तब करण्यात आलं नव्हतं. त्यामुळे आज (२९ डिसेंबर) पुन्हा एकदा खासदार धनंजय महाडिक यांच्या निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीनंतर जवळपास फ?र्म्युला निश्चित करण्यात आला. आज संध्याकाळी याबाबत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. भाजपकडून उमेदवारांना एबी फार्मचे सुद्धा वाटप केलं जात आहे. भाजपकडून २९ जणांना फार्म वाटप करण्यात आलं आहे. दरम्यान, जागावाटपावर चर्चा करण्यासाठी आज बैठक पार पडली या बैठकीमध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, शिवसेनेकडून आमदार राजेश क्षीरसागर, भाजपकडून खासदार धनंजय महाडिक यांच्यासह तिन्ही पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी तिन्ही पक्षांच्या ताकदीचा अंदाज घेउन प्रभागनिहाय उमेदवारांवर चर्चा करण्यात आली.

**कोल्हापुरात काँग्रेसकडून ६१ उमेदवार घोषित**

दुसरीकडे, कोल्हापुरात काँग्रेसकडून दोन याद्यांमध्ये ६१ उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. मनसे जिल्हाध्यक्ष राजू दिंडोर्ले यांना काँग्रेसकडून पुरस्कृत करण्यात आलं आहे. आज काही उमेदवारांनी शक्तीप्रदर्शनाने उमेदवारी अर्ज दाखल केला.

सांगलीत तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढवणार

दरम्यान, कोल्हापूरमध्ये महायुती म्हणून निवडणुकीला सामोरे जाणार असले तरी सांगलीत मात्र तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. दुसरीकडे, सांगलीमध्ये महाविकास आघाडीने एकत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या आघाडीसोबत अजित पवारांची राष्ट्रवादी जाण्याची शक्यता आहे. सर्वच पक्षातील बहुतांश इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल करण्यात आले असले, तरी एबी फार्म मात्र पक्षांकडून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अंतर्गत नाराजी आणि बंडखोरी टाळण्यासाठी उद्याच पक्षाकडून एबी फार्म निवडणूक कार्यालयामध्ये जमा केले जाउ शकतात अशी चर्चा आहे.

**अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस; यंत्रणेची कसोटी**

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आजचा शेवटचा दिवस असून, राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे गुलदस्त्यात ठेवल्याने अर्ज स्वीकारण्यापासून ते योग्य कागदपत्रांसह अर्ज दाखल करून घेण्यापर्यंत पालिका कर्मचा-यांचा कस लागणार आहे. पालिकेकडून हजारो अर्जांचे वितरण झाल्यामुळे त्याचे प्रमाणात ते भरले जाण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेता संपूर्ण निवडणूक यंत्रणेची कसोटी लागणार आहे. पालिका निवडणुकांसाठी उमेदवारांना अर्ज दाखल करण्याची सुरुवात २३ डिसेंबरपासून झाली आहे.

## पॉलिटिकल 'स्टेटस' ठेवाल

प्रचारक बनताना दिसतात; मात्र सरकारी सेवक म्हणून राजकीय बाजू घेणे पूर्णत गैरकायदेशीर आहे.

सोशल मीडिया, व्हाट्सअॅपवरही नजर

फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर), व्हाट्सअॅप स्टेटस व ग्रुप, यावर २४ तास नजर ठेवून आहे. कंत्राटी कर्मचा-यांनाही तंबी, कंत्राटी, मानधनावरचे, आऊटसोर्स कर्मचारी

अशा कर्मचा-यांची तक्रार कुठे कराल?

जिल्हा निवडणूक अधिकारी, तहसीलदार - उपविभागीय अधिकारी, निवडणूक आयोगाचे सी व्हिजिल अॅप.

कर्मचा-यांसाठी काय नियम?

कोणत्याही पक्षाच्या समर्थनार्थ पोस्ट-स्टेटस टाकण्यास बंदी. उमेदवाराच्या प्रचारात सहभागी होता येत नाही. सभांना, रॅलींना जाण्यास मनाई, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रचाराला बंदी तसेच लाईक, शेअर, कमेंट, स्टेटस, डीपी बदलणे हे सुद्धा अप्रत्यक्ष प्रचार मानले जाते. 'शासकीय सेवकांनी राजकीय तटस्थता पाळणे बंधनकारक आहे. सोशल मीडियावरील प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले जात आहे. नियम मोडणा-यांवर कठोर कारवाई केली जाईल.' असे सुनील लहाने, आयुक्त मनपा यांनी सांगितले.

## बांगलादेशच्या आखाड्यात 91

आहे. केवळ शेख हसीना यांच्या अवामी लीगला पाठिंबा देण्याऐवजी भारताने बांगलादेशातील हिंदूंच्या मुद्द्याला थेट पाठिंबा द्यावा, असे मंडल यांनी म्हटले आहे. भारताने भूमिका बदलली तर बांगलादेशातील इतर मुख्य प्रवाहातील पक्ष हिंदूंच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सर्वात धक्कादायक म्हणजे, आपल्या समाजाच्या सुरक्षेसाठी हा पक्ष कोणत्याही मुख्य प्रवाहातील पक्षाशी हातमिळवणी करण्यास तयार आहे. मग ती तारिक रहमान यांची बीएनपी असो किंवा जमात-ए-इस्लामी. जर या मोठ्या पक्षांसोबत आमची युती झाली, तर हिंदू मतदार कोणत्याही भीतीशिवाय घराबाहेर पडून मतदान करू शकतील, असे मंडल यांनी सांगितले. विशेष म्हणजे, त्यांनी अवामी लीगला आता आपल्या यादीतून पूर्णपणे वगळले आहे. मंडल यांच्या मते, बांगलादेशात आजही सुमारे अडीच कोटी हिंदू राहतात.

एनिमी प्रापर्टी अॅक्टसारख्या कायद्यांमुळे हिंदूंच्या जमिनी बळकावल्या जात आहेत. हे सर्व थांबवण्यासाठी हिंदूंनी राजकीय प्रवाहात सक्रिय होणे हाच एकमेव पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले. आता ही नवी राजकीय शक्ती बांगलादेशच्या राजकारणाची दिशा बदलणार का, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## बेस्टची 10 ते 12 जणांना

घेतली आणि गर्दी पांगवली. मुंबईतील भांडुप रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या बस डेपोजवळ ही घटना घडली. बस ज्यावेळी भरधाव वेगात आली तेव्हा अनेक लोक आपल्या घराकडे जाण्यासाठी बसच्या रांगेत उभे होते. त्याचवेळी अचानक एक बेस्टची बस क्रमांक ग्क्त ०१ -कज्- ६५१५ ही भरधाव वेगात आली आणि रांगेत उभ्या असलेल्या प्रवाशांना चिरडून पुढे गेली. प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार, बेस्टची बस ही नियंत्रणाबाहेर गेली होती. बस स्ट?पवर २० ते २५ जण रांगेत उभे होते. त्यावेळी ही बस आली आणि तिने रांगेत उभ्या असलेल्या प्रवाशांना चिरडलं आणि पुढे निघून गेली. पुढे गेल्यावर ती एका विजेच्या खांबाला जाउन धडकली. या बसचा वेग इतका होता की, धडकेनंतर विजेचा खांब ही कोलमडला.

## अमरावतीत महायुतीचे जागावाटप

येणार असल्याचे सांगण्यात आले. भाजपा ५३ जागा लढविणार आहे. मनपाच्या एकूण जागा ८७ आहे.

त्यापैकी ७५ जागांवरच महायुतीची लढण्याची तयारी सुरू आहे. उर्वरीत १२ जागा या मुस्लिम बहुल असल्यामुळे भाजपा तेथे उमेदवार उभे करत नाही. गेल्या निवडणुकीतही त्यांनी तेथे उमदेवार दिले नव्हते. या १२ जागांपैकी ४ जागा शिंदेसेना लढू शकते, अशी पण एक माहिती मिळाली आहे. अशा स्थितीत त्यांची उमेदवार लढण्याची संख्या २० होऊ शकते. महायुतीत निवडणूक लढण्याचे पक्के झाले आहे. जागावाटपाची अधिकृत घोषणा मंगळवारी होईल.

**जगदीश गुप्ता यांची नाराजी-**शिवसेना शिंदे गटाचे पश्चिम विदर्भ संपर्क प्रमुख आणि माजी मंत्री जगदीश गुप्ता सोमवारी सांयकाळी मंत्री संजय राठोड व अन्य पदाधिकाऱ्यांसोबतची बैठक अर्ध्यावर सोडून बाहेर पडले. शिंदेसेनेतल्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. आपली स्वतंत्र भूमिका मंगळवारी सकाळी पत्रकार परिषद घेऊन जाहीर करणार असल्याचे त्यांनी सांगितले. महायुतीच्या जागावाटपावर चर्चा करण्यासाठी मंत्री संजय राठोड यांना जबाबदारी देण्यात आली आहे. तेच शिंदेसेनेला किती जागा मिळाल्या याची माहिती देऊ शकतात. ती देण्याचा अधिकार माझ्याकडे नाही. मात्र, मंगळवारी सकाळी मी सर्वकाही सविस्तर सांगणार आहे. तोपर्यंत प्रतीक्षा करा, असे त्यांनी सांगितले. माहितीनुसार ते स्वतंत्र पॅनल मैदानात उतरवू शकतात.

## माजी नगरसेवक इंगोले, शेख

नगरसेवक भूषण बनसोड यांची पत्नी रेखा बनसोड, मनीष बजाज, सोनाली नाईक, प्रशांत महल्ले प्रदीप बाजड, संकेत महल्ले, प्रिया धनाडे, सुरेश रतावा यांची पत्नी ललिता रतावा, अंबा गेट बुधवार प्रभागातून माजी नगरसेवक प्रवीण हरमकर, विशाखा हरमकर, आसिफ तवक्कल, पुरुषोत्तम बजाज, इम्रान अशरफी, प्रभाग क्रमांक ४ जमील कॉलनी - लालखडी मधून शेख जुबेर शेख जब्बार, अब्दुल नफिस अब्दुल हाफिस, फौजीया तहेसीन नदीम सर, नाझिया परवीन जकी मुल्ला, प्रभाग १५ छाया नगर पठाणपुरा येथून शेख जफर शेख जब्बार, सिराज मेमन सुलेमान मेमन, नसीम सुलताना मो.शारीक मो. रफिक, शाहेदा बानो मो.अय्युब, प्रभाग ४ जमील कॉलनी मधून निसार अहमद आलम खान, जलील खान आलम खान, मुस्लिम लीगचे इम्रान अशरफी सह अनेक दिग्गजांनी नामांकन दाखल केले. आता निवडणुकीची रंगत आणखी वाढणार आहे. ७ ही केंद्रावर नामांकन दाखल करण्यासाठी आणि उचलण्यासाठी उमेदवारांची गर्दी होती.

## राष्ट्रवादी अजित पवार गटाचे

,संकेत महल्ले, परविन बानो मोहम्मद फारूक, प्रशांत डवरे, प्रभाग ४ जमील कॉलनी लालखडी येथून नफीस कुरेशी, फैजिया तहसीन नदीम मुल्ला, शेख जुबेर शेख जब्बार, प्रभाग ५ महेंद्र कॉलनी न्यू कॉटन मार्केट येथून अविनाश पारडे, श्रद्धा मोरे, सारिका वडे, भागवत उर्फ बंडू निंभोरकर, विलास नगर मोरबाग प्रभाग क्रमांक ६ मधून प्रथमेश गवई, रीना भोरे, सरोज गुप्ता, प्रभाग ७ जवाहर स्टेडियम येथून रेखा बनसोड, मनीष बजाज, अंजली मोहल्ले, मोहित भोजवानी, जोग स्टेडियम चपरासी पुरा प्रभाग ८ मधून राम चव्हाण, स्वाती निकम, प्रभाग ९ एसआरपीएफ वडाळी मधून विजय बाभुळकर ,निकिता पवार, ममता आवारे, प्रभाग १० बेंनोडा भीम टेकडी येथून अर्चना पाटील, मंगेश मनोहरे, अविनाश मार्डीकर, फ्रेजरपुरा रुक्मिणी नगर प्रभागातून सुजाता बोबडे, किशोर भुयार, स्वामी विवेकानंद कॉलनी बेलपुरा प्रभाग १२ मधून गणेश तंबोले, प्रभाग १३ अंबापेठ गोरक्षण मधून दिनेश देशमुख, रतन डेंडूले, प्रभाग १७ गडगडेश्वर मधून सरोज चिखलकर ,आशिष कपले, अजय बोंडे, प्रभाग १८ राजापेठ कंवरराम येथून प्रणाक्षी झांबानी, अभिषेक हजारे, प्रभाग १९ साईनगर अकोली मधून चरणजीत कौर नंदा, प्रभाग २० सूतगिरणी सामरा नगर राजू उर्फ गजानन बिहार, गजानन गोमासे, प्रभाग २१ जुनी बस्ती बडनेरा येथून मेघा ठोसरे, अजय बेहेरे, योगेश कावरे, प्रभाग २२ नवी बस्ती बडनेरा मोसमी नंदागवळी, इशरत बानो मन्नान खान, अक्रम देशमुख यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. उरलेल्या २७ उमेदवारांच्या नावावरही चर्चा झालेली आहे. त्यांचे नाव लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

## बहिरम यात्रेत पार्किंगच्या

लुटच आहे.यावर पंचायत समिती अधिकाऱ्यांचे कोणतेही नियंत्रण नाही काय? असाही प्रश्न ही यावेळी यात्रेतील भाविकांकडून , उपस्थित केल्या जात आहे. या प्रकारामुळे आधीच लांबचा प्रवास करून आलेल्या भाविकांना, आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यात्रेत एका दूरवरून आलेल्या भाविकाने तर, या आर्थिक लुटीत यात्रा व्यवस्थापणाचा तर सहभाग नाही ना ? असा सवाल ही यावेळी उपस्थित केला.

ाहिरम यात्रा ही दिर्घ काळ चालणारी यात्रा आहे . या यात्रेत दररोज हजारोंच्या संख्येने भाविक हजेरी लावतात . सुट्टीच्या दिवशी तर भाविकांची संख्या लाखोंच्या घरात जाते. याचा विचार करून , यात्रेत आरोग्य सुविधा ही उपलब्ध करून देण्यात आली आहे.मात्र यात्रेतील आरोग्य सुविधांचा प्रश्नही गंभीर बनला आहे. यात्रेच्या पहिल्याच शनिवार (दि.२७) मानवी दवाखाना बंद असल्याचे दिसून आले. सुटीच्या दिवशीच भाविकांची गर्दी असते. अशा वेळी प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असणे. ही बाब चिंतेची असल्याचा सूर ही, भाविकांमधून व्यक्त होत होते.आरोग्य सुविधा बंद असल्याने, अचानक आजारी पडणे, चक्कर येणे, जखमी होणे किंवा एखादा अपघात घडणे.अशा घटनांमध्ये तातडीचा उपचारा होणे गरजेचे असते.परंतू यात्रेतील दवाखाना बंद असल्याने, आपात्कालीन प्राथमिक उपचारांचाही अभाव यात्रेत जाणवत होता.

बहिरम यात्रा ही केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक दृष्ट्याही महत्त्वाची आहे. यात्रा प्रशासनाने यात्रेतील असुविधांकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. पार्किंग दरांवर नियंत्रण, आरोग्य सुविधा ,यावर प्रशासनाने वेळीच योग्य उपाययोजना कराव्यात.

**-सुरेश वानखेडे, यात्रेकरी ,बहीरम**

यात्रेत येणाऱ्या वाहनांसाठी यात्रा प्रशासनाने अधिकृतरित्या, वाहनतळधारकांना वाहनतळसाठी दर ठरवून दिले आहेत.त्यानुसार दुचाकी साठी ३० रूपये,तर चारचाकी वाहनासाठी ५० रुपये दर निश्चित करण्यात आले आहे.या दरा व्यतिरिक्त जास्त पैसे घेतल्या जात असतील,तर अशा वाहनतळ धारकांना विरूद्ध निश्चित कारवाई करण्यात येईल.

**-रामेश्वर रामागडे,यात्रा अधिक्षक,बहिरम.**

## कुख्यात दुचाकी चोर गजाआड

झालेल्या वाहनचोरीच्या घटनांशीही त्याचा थेट संबंध असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणातील दुसरा आरोपी श्रावण बनारसे आणि अल्पवयीन साथीदार सध्या फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. पुढील तपासात आणखी चोरीच्या घटनांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## प्रदीप हिवसे भाजप तर धीरज हिवसे

यामुळे प्रदीप हिवसे काँग्रेसच्या तिकीटवर प्रबळ उमेदवार मानले जात होते. परंतु त्यांनी ऐन वेळेवर सोमवारी दुपारी भाजपामधून आणि प्रभाग क्रमांक पाच महेंद्र कॉलनी मधून भाजपाच्या सीटवर निवडून आलेले धीरज हिवसे यांच्या नावाची काँग्रेस मधून चर्चा होत आहे. त्यामुळे राजकिय समिकरण चांगलेच बदलले आहे.

## कायदा व सुव्यवस्था अबाधित

केला आहे. रस्त्यावरून जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळ्याचा संभव असेल तर अडथळा होऊ न देणे, सर्व मिरवणूकाच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी कोणताही रस्ता किंवा अडथळा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा न होवू देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे, सर्व रस्त्यांवर किंवा रस्त्यात, सर्व धाब्यावर आणि सार्वजनिक ठिकाणच्या कपडे धुण्याचा व उतरविण्याचा जागेच्या ठिकाणी व इतर सर्व सार्वजनिक किंवा लोकांच्या येण्याच्या जागेमध्ये बंदोबस्त राहण्यासाठी, वाद्यांबाबत नियम व नियंत्रण ठेवणे, सार्वजनिक जागेत ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत नियम व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सक्षम अधिका-यांनी या अधिनियमाच्या कलम ३३, ३५, ३७ ते ४०, ४४ व ४५ अन्वये कार्यवाही करावी, असे पोलीस आयुक्त यांच्या आदेशात नमूद केले आहे.

## युवा सेनेचे विभागीय सचिव सागर

आणि चुकीच्या लोकांकडून पक्ष संघटनेत हस्तक्षेप, व कार्यकर्त्यांकडे सातत्याने होणारे दुर्लक्ष, संघटनेत लक्ष देण्याऐवजी केवळ पैसे कमविण्यात धन्यता मानणारे खोगीर पदाधिकारी यामुळे माझे गेल्या काळात प्रचंड राजकीय नुकसान झाले आहे,अशा शब्दात देशमुख यांनी नाराजी व्यक्त केली. पक्षासाठी काम करूनही कोणताही राजकीय वाटचालीत सामावून न घेणे, कुठल्याही समितीत समाविष्ट न करून घेता परस्पर कारभार करणे, केवळ एकाचीच मर्जी आणि इतरांना मात्र काहीही जबाबदारी न देणे अशा कारभाराला कंटाळून त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे.

## दैनिक हिंदुस्थान व्रतस्थ

उच्च शिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. के. एम. कुलकर्णी हे होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, दै. हिंदुस्थान हे अमरावतीचे वृत्तपत्र एक आदर्श वृत्तपत्र आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अव्यहातपणे दै. हिंदुस्थान ने समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे. संस्थापक संपादक बाळासाहेब मराठे यांचा वारसा दै. हिंदुस्थानची तिसरी आणि चौथी पिढी चालवीत असून अत्यंत नम्रतेने आणि समाजभान राखून ते हे कार्य करीत आहेत . 'कै. व्यंकटेश ब्रह्मदेव जहागीरदार स्मृती' पुरस्कारासाठी जहागीरदार कुटुंबीयांनी दै. हिंदुस्थानची केलेली निवड ही अत्यंत योग्य आहे आणि त्याबद्दल हिंदुस्थान परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे. या पुरस्काराचे प्रवर्तक सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ.जहागीरदार याप्रसंगी पुरस्काराचे औचित्य सांगताना म्हणाले की त्यांचे तीर्थरूप कै. व्यंकटेश जहागीरदार यांच्या १२५ व्या जयंतीच्या पर्वावर जहागीरदार कुटुंबीयांनी त्यांच्या स्मृती जपण्यासाठी या पुरस्काराची आयोजन केले आहे. मागील वर्षी डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांच्या तपोवन संस्थेला पहिला पुरस्कार देण्यात आला. यावर्षी वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजसेवा व समाज प्रबोधन करणाऱ्या हिंदुस्तानला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आणि त्यांच्या ७५ वर्षाच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार देण्याचे आम्ही ठरविले आहे. हिंदुस्थान परिवाराने हा पुरस्कार स्वीकारला त्याबद्दल आम्ही त्यांच्याप्रति कृतज्ञ आहोत .हा पुरस्कार म्हणजे कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींनी कुटुंबातील नव्या पिढीचा केलेला गौरव आहे अशा भावना दै. हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे यांनी व्यक्त केल्या. डॉ जहागीरदार सर हिंदुस्थान परिवारातीलच असून दै. हिंदुस्तान मध्ये अर्थविश्व सदर त्यांनी अनेक वर्ष चालून हिंदुस्तान परिवाराला सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. आजचा पुरस्कार हा कुटुंबातील व्यक्तींनी केलेला कौतुक सोहळा आहे असे मी मानतो.

याप्रसंगी बोलताना सुप्रसिद्ध वक्ते ,लेखक डॉ.किशोर फुले म्हणाले की, जहागीरदार कुटुंबीयांनी या पुरस्काराचे कार्यगौरवपत्र लेखनाची जबाबदारी माझ्यावर दिली आणि मी दैनिक हिंदुस्थान परिवारातीलच असल्याने माझ्याच परिवाराच्या कार्याचे गौरवशाली कार्याचे मला शब्दांकन करता आले याविषयी मी स्वतःला भाग्यवान समजतो. दै. हिंदुस्थानचे कार्य आणि अमरावतीसाठी असलेले योगदान खूप मोलाचे आहे.

**सर्वेश मराठे -**याप्रसंगी दै. हिंदुस्थान परिवाराच्यावतीने चौथ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे सर्वेश विनोद मराठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्व .आप्पांनी आम्हा मराठे कुटुंबीयांवर जे संस्कार केले आणि जी शिकवण आम्हाला दिली ती शिकवण पूर्णपणे आचरण्यात आणण्याचा प्रयत्न आमचे कुटुंब आणि दै. हिंदुस्तान परिवार करत असतो. आज हा पुरस्कार जहागीरदार कुटुंबीयांनी दै. हिंदुस्थानला दिला आणि आमच्या कार्याची दखल घेतली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो आणि समाजाप्रती दै. हिंदुस्थानची बांधिलकी अशीच कायम राहील याची ग्वाही देतो.

**प्राचार्य अनंत मराठे -**याप्रसंगी प्राचार्य अनंत मराठे यांनी दै. हिंदुस्तान परिवाराचे पितामह आणि मार्गदर्शक प्राचार्य प.सि.काणे यांनी या पुरस्कार सोहळ्यासाठी पाठविलेल्या शुभेच्छांचे वाचन केले. प्राचार्य प.सि.काणे यांनी डॉ. दि.व्यं जहागीरदार व डॉ. मुक्ता जहागीरदार या दाम्पत्याच्या अर्थशास्त्रातील योगदानाचा, त्यांच्या समर्पित अध्ययन सेवेचा गौरव करून या कुटुंबाने आपल्या वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ सुरू केलेला पुरस्कार हा इतरांसाठी आदर्श आहे अशा भावना व्यक्त केल्या.

प्रारंभी जहागीरदार कुटुंबीयांच्या वतीने डॉ. श्रीपाद जहागीरदार, डॉ. सायली जहागीरदार, अदिती जहागीरदार, सारंग जहागीरदार यांनी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. किशोर फुले यांनी लिहिलेल्या मानपत्राचे स्वतः अभिवाचन केले. समारंभाचे सूत्रसंचालन डॉ.मुक्ता जहागीरदार यांनी केले तर डॉ. प्रशांत हरमकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. या समारंभाला दै. हिंदुस्थान परिवारातील ज्येष्ठ सदस्य डॉ. सुरेश सावदेकर, प्राचार्य डॉ.अनंत मराठे, विनोद मराठे, मनीषा मराठे ,विवेक मराठे, पद्मा महाजन,मंगला जोशी, माजी प्राचार्य डॉ. मंगला कुलकर्णी, प्राचार्य डॉ.माधुरी फुले, प्राचार्य डॉ. वनिता चोरे, प्रा.अनंत उताणे प्रा.राजश्री रायभोग हे विशेषत्वाने उपस्थित होते. अतिशय कौटुंबिक वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

## रेल्वे ट्रॅक परिसरात प्रवाशांवर

असा इशारा जाणकारांकडून दिला जात आहे. प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर दिसणाऱ्या अशा संवेदनशील आणि धक्कादायक व्हिडीओंवर त्वरित विश्वास ठेवू नये. अधिकृत यंत्रणांकडून खात्री झाल्याशिवाय अशा मजकुराचा प्रसार करणे टाळावे. एआय तंत्रज्ञानाच्या गैरवापरामुळे भविष्यात कायदा-सुव्यवस्था बिघडण्याचा धोका असून, अशा फसवणूक प्रकरणांवर कडक कायदेशीर कारवाईची गरज व्यक्त केली जात आहे.

## वडिलांची हत्या करून फरार

गुन्हा दाखल करण्यात आला होता. तीन महिन्यापासून पोलीस त्याच्या मागारावर होते पण तो पोलिसांना चकमा देत होता. सोमवारी (दि.२९डिसेंबर) त्याच्या शोधात मध्य प्रदेश पोलिसांचे एक पथक गाडगे नगर ठाणाच्या हद्दीत दाखल झाले. गाडगेनगरचे पोलीस कर्मचारी गुलरेज खान यांच्या मदतीने पोलिसांनी आरोपीला पलाश लाईन परिसरातून ताब्यात घेतले. त्याला मध्यप्रदेश पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## लोतवाडा ग्रा.पं. सरपंचपदी प्रिती गावंडे

सुरेश रामागडे यांची नियुक्ती केली होती.

आज सामेवारी (दि.२९) येथील ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच व उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. यात प्रिती मोहन गावंडे यांची सरपंचपदी तर विनायक देवमन मानकर यांची एकमताने निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राजेंद्र धोटे हे उपस्थित होते.

**चिखलदरा येथील वनवे वाहतूक व्यवस्था दोन दिवस राहणार**

## पर्यटकांच्या सुविधेसाठी जिल्हा

पर्यटनानंतर परत येताना चिखलदरा-घटांग-परतवाडा या एकमार्गी रस्त्यानेच खाली उतरावे लागणार आहे.जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, या मार्गावरील गावांमध्ये राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना या नियमातून सवलत देण्यात आली आहे. मात्र, इतर पर्यटकांनी या नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ नुसार कारवाई करण्यात येईल. चिखलदऱ्यातील कडाक्याची थंडी आणि पर्यटकांचा ओघ पाहता जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्थानिक प्रशासन पूर्णपणे सज्ज असून पर्यटकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ३० डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# दिगंबर जैन समाजाचा शिरपूर पोलीस स्टेशनवर मोर्चा

## दारू पिऊन मंदिरात दंगल, मारहाणीच्या घटना वाढल्या; सीसीटीव्हीच्या मागणीसह निवेदन

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

**शिरपूर येथील श्री अंतरीक्ष पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर परिसरात वारंवार घडणाऱ्या गंभीर घटनांच्या पार्श्वभूमीवर दि. २८ डिसेंबर रोजी समस्त दिगंबर जैन समाज, शिरपूर व वाशीम जिल्हा यांच्या वतीने शिरपूर पोलीस स्टेशनवर जोरदार पण शांततामय मोर्चा काढण्यात आला.**

यावेळी दिगंबर समाजाने दोन स्वतंत्र निवेदने सादर करून गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कठोर कारवाई, तसेच मंदिर परिसरात दिगंबर पंथीयांसाठी स्वतंत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची ठोस मागणी केली शिरपूर येथील श्री अंतरीक्ष पार्श्वनाथ जैन मंदिर हे दिगंबर जैन समाजाची 'काशी' म्हणून ओळखले जाते देशभरातून दररोज शेकडो भाविक येथे दर्शनासाठी येतात जैन धर्म हा अहिंसेचा संदेश देणारा असून हे मंदिर दिगंबर समाजाचे अत्यंत पवित्र श्रद्धास्थान आहे मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मंदिर सर्वांसाठी खुले झाल्यापासून काही श्वेतांबर पंथीयांकडून मंदिरात गुंड प्रवृत्तीच्या लोकांना कामावर ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप दिगंबर समाजाने केला आहे वारंवार मारहाण, दारूच्या नशेत धिंगाणा निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, यापूर्वी अनेक वेळा दिगंबर भाविक व पुजाऱ्यांवर काड्या, दगड, ऊसाचे तुकडे, चाकू अशा प्राणघातक शस्त्रांनी हल्ले करण्यात आले आहेत या घटनांचे व्हिडीओ पुरावे आणि लेखी तक्रारी वारंवार पोलीस प्रशासनाकडे देण्यात आल्या असूनही दोषींवर ठोस कारवाई न झाल्याने गुंडांचे मनोबल वाढल्याचा आरोप करण्यात आला ४ डिसेंबर रोजी दिगंबर पुजारी महेश जैन यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला ते उपचार घेत असतानाच दिनांक २६ डिसेंबर रोजी दुपारी ४.३०च्या दरम्यान आणखी एक धक्कादायक घटना घडली श्वेतांबर पंथीयांकडून कामावर ठेवलेले सोनू



देशमुख, बाबुराव बोराटे, इत्यादी आदींनी संगनमत करून दारूच्या नशेत मंदिरात बुटांसह प्रवेश केला देवमूर्तीसमोर अपमानास्पद वर्तन करून दिगंबर समाजाचे पुजारी विजय जैन यांना जबरदस्तीने बाहेर नेऊन मंदिराच्या गेटसमोर जीव घेण्याच्या उद्देशाने काड्या, बुटांसह लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली या हल्ल्यात विजय जैन रक्तबंबाळ झाले, तर त्यांना वाचविण्यास गेलेल्या दिगंबर समाजाच्या दोन महिलाही जखमी झाल्या यावेळी अश्लील शिवीगाळ केल्याचाही आरोप करण्यात आला आहे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वाद; दिगंबर समाज असुरक्षित दुसऱ्या निवेदनात दिगंबर समाजाने मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या व्यवस्थेवर गंभीर आक्षेप नोंदवला सध्या मंदिरात श्वेतांबर पंथीयांकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत सुरुवातीला त्याचा एक डिव्हाइस दिगंबर पंथीयांच्या कार्यालयात ठेवण्याचे ठरले होते आणि काही काळ तसे करण्यातही आले मात्र नंतर अचानक त्या डिव्हाइसचे कनेक्शन बंद करण्यात आले, त्यामुळे अनेक घटनांचे फुटेज दिगंबर समाजाला मिळत नसून खरी परिस्थिती समोर येण्यास अडथळा निर्माण होत आहे, असा आरोप करण्यात आला श्वेतांबर पंथीयांकडून होणाऱ्या अन्यायामुळे कधी मोठा अनर्थ होईल, याचा नेम राहिला नसून दिगंबर भाविक भक्त स्वतःला असुरक्षित समजू लागले आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले शासन व पोलीस प्रशासन सार्वजनिक ठिकाणी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवते, मग अशा अत्यंत पवित्र धार्मिक स्थळी दोन्ही पंथीयांकडे पारदर्शकतेसाठी सीसीटीव्ही असणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

**दिगंबर समाज स्वयंखर्चाने सीसीटीव्ही बसविण्यास तयार :** दिगंबर जैन समाजाने स्पष्ट केले की, स्वतःच्या खर्चाने मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास ते तयार आहेत त्यासाठी पोलीस प्रशासनाने सहकार्य करावे, अथवा पोलीस प्रशासनानेच सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसवावेत तसेच सीसीटीव्हीचे डिव्हाइस दिगंबर पंथीयांकडे देण्यात यावे, किंवा दोन्ही पंथीयांचे सीसीटीव्ही डिस्प्ले थेट शिरपूर पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्यात यावेत, अशी ठोस मागणी करण्यात आली कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा या सर्व मागण्यांची तात्काळ पूर्तता न झाल्यास आणि भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्यास सर्व संबंधित जबाबदार राहतील, असा इशारा दिगंबर जैन समाजाने दिला आहे तसेच गरज पडल्यास मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्यात येईल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले या मोर्चामुळे शिरपूर परिसरात मोठी चर्चा सुरू असून, पोलीस प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कठोर कारवाई व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी सर्वत्र मागणी होत आहे.

---

# जऊळका पोलीस स्टेशन अंतर्गत २४ गावांचे पोलीस पाटील पदे १५ वर्षांपासून रिक्त

- एका पोलीस पाटलाकडे पाच ते सहा गावांचा अतिरिक्त भार
- रिक्त पदे तातडीने भरण्याची खंडेराव मुंडे यांची मागणी

**■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■**

जऊळका पोलीस स्टेशन व किन्हीराजा पोलीस चौकी अंतर्गत येणाऱ्या एकूण ४२ गावांपैकी केवळ १८ गावांमध्येच पोलीस पाटील कार्यरत असून तब्बल २४ गावांतील पोलीस पाटील पदे गेल्या १५ वर्षांपासून रिक्त असल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रिक्त पदांमुळे अनेक पोलीस पाटलांकडे पाच ते सहा गावांचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. परिणामी रहिवासी दाखला, वंशावळ, उत्पन्न प्रमाणपत्र आदी कागदपत्रांसाठी नागरिकांना व विद्यार्थ्यांना एका गावातून दुसऱ्या गावात फेऱ्या माराव्या लागत असून जनतेचा वेळ व पैसा वाया जात आहे.

जऊळका पोलीस स्टेशन अंतर्गत २००६ साली पोलीस पाटील भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती, तर २०१० मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. मात्र त्या वेळी अनेक अर्जदार नियमांच्या चौकटीत बसत नसल्याने निवड प्रक्रियेतून बाद झाले. त्यानंतर आजतागायत नव्याने पोलीस पाटील भरती करण्यात आलेली नाही.

यामुळे खिर्डा, जोडगव्हाण, रामनगर, गीव्हा, कवरदरी, मैराळडोह, सोनाळा, वाकापूर आदींसह जऊळका पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या २४ गावांतील पोलीस पाटील पदे अजूनही रिक्त आहेत. या रिक्त पदांचा अतिरिक्त भार उर्वरित १८ पोलीस पाटलांवर टाकण्यात आल्याने प्रशासनावरही ताण वाढला आहे.

रिक्त पदांमुळे पोलीस यंत्रणा व पोलीस पाटील दोघांवरही कामाचा अतिरिक्त ताण येत असून नागरिकांच्या मूलभूत प्रशासकीय गरजांवर परिणाम होत आहे. त्यामुळे रिक्त असलेली २४ पोलीस पाटील पदे तातडीने भरावीत, अशी जोरदार मागणी मैराळडोह येथील सामाजिक कार्यकर्ते खंडेराव मुंडे यांनी केली आहे. दरम्यान, २०१० पासून प्रलंबित असलेल्या या भरती प्रक्रियेला केव्हा गती मिळणार, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

---

# व्यावसायिक शेती तंत्रज्ञान प्रसारासाठी अकोल्यातील 'ॲग्रोटेक' दिशादर्शक

## प्रधान कृषी सचिव विकासचंद्र रस्तोगी



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

शाश्वत शेती आणि संपन्न शेतकरी ही संकल्पना अधिक बळकट करत व्यावसायिक शेती तंत्रज्ञानाच्या प्रभावी प्रसारासाठी अकोल्यातील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन 'ॲग्रोटेक २०२५' सर्वार्थाने दिशादर्शक ठरले, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे प्रधान कृषी सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ॲग्रोटेक २०२५' या भव्य कृषी प्रदर्शनाचा समारोप रविवारी सायंकाळी शेतकऱ्यांच्या प्रचंड प्रतिसादात झाला.

कृषिक्रांतीचे प्रणेते कृषिरत्न स्व. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त आयोजित या प्रदर्शनाच्या समारोपीय सत्रात विशेष अतिथी म्हणून रस्तोगी बोलत होते. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वर्षा मिना, विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य शिवराम घोडके यांच्यासह विद्यापीठाचे संचालक, अधिष्ठाते, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञांची उपस्थिती होती. तीन दिवस चाललेल्या या प्रदर्शनाला शेतकरी बांधवांचा उदंड प्रतिसाद लाभला. विगत तीन दिवसांत तब्बल ९.२० लाखांहून अधिक शेतकरी-भगिनींनी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नव्या पद्धती, मूल्यवर्धन व पूरक उद्योगांची माहिती घेतली. समारोपीय सत्रात उत्कृष्ट व प्रभावी सादरीकरण केल्याबद्दल विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्था, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी अभियांत्रिकी, यांत्रिकीकरण, कृषी प्रक्रिया व पूरक उद्योग गटांतील दालनधारकांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे व पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुष्प प्रदर्शनी, पशुसंवर्धन, पथनाट्य, कृषी संवादिनी विक्री, छायाचित्रण सेवा, वैद्यकीय व सुरक्षा सेवा यासाठीही विशेष प्रोत्साहनपर प्रमाणपत्रे देण्यात आली. दरम्यान, चर्चासत्रे व शेतकरी प्रबोधन कार्यक्रमांत कापणीपश्चात तंत्रज्ञान, दुग्ध व्यवसाय, कापसाची अति घनता लागवड, पौष्टिक तृणधान्य प्रक्रिया उद्योग, आंबा घन लागवड आदी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

संपूर्ण प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. धनराज उंदीरवाडे यांच्या नेतृत्वात विविध समित्यांनी अथक परिश्रम घेतल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. समारोपीय सत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे यांनी केले.

---

# कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मिळाली मायेची उब



**वाशिम :** गत २१ वर्षापासून सामाजीक कार्यकर्ते तरून क्रांती मंचचे जिल्हाअधक्ष निलेश सोमानी व आयुर्वेद तज्ञ डॉ दिपक ढोके यांच्या पुढाकाराने कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मायेची उब देण्यात आली या वर्षी वैकुंठधामवासी सौ.स्नेहलता पूनमचंद सोमानी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सदर उपक्रम रविवार २८ डिसेंबर रोजी रात्री ८ ते १२ वाजे दरम्यान शहरात राबवण्यात आला.

या करीता निलेश सोमानी सौ.भारती सोमानी तेजस सोमानी कु.पुर्वा सोमानी व सोमानी परीवाराने पुढाकार घेतला.

---

# क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने वाशिम पंचायत समिती कार्यालय समोर १०१ नारळ फोडून अनोखे आंदोलन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम पंचायत समिती कार्यालयासमोर संघटनेचे अध्यक्ष बालाजी मोरे व युवा जिल्हाध्यक्ष सतीश इढोळे यांचे नेतृत्वात १०१ नारळ फोडून आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन आगळे वेगळे असून संबंधित अधिकारी यांना आता तरी सद्बुद्धी देवो याकरीता हे अनोख्य आंदोलन करण्यात आले.लाभार्थ्यांना विविध समस्या घेऊन अनेक वेळा पंचायत समिती कार्यालयाच्या चकरा मारून पायपीट करावी लागते.पण अनुदान मिळत नाही., विहीर



घरकुल ,गोठा, फळबाग इत्यादी रखडलेले अनुदान तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावे, याकरता क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने अनोखं आंदोलन विहीर, घरकुल, गोठा फळबाग ,नरेगा अंतर्गत लाभार्थ्यांना लाभ दिला जातो .पण पंचायत समिती कार्यालय मध्ये अधिकारी व कर्मचारी यांचे अकार्यक्षमपणामुळे सामान्य लाभार्थ्यांना पंचायत समितीमध्ये चकरा माराव्या लागतात. म्हणून अशा भोंगळ कारभारामुळे लाभार्थी यांना त्यास सहन करावा लागतो.शिवाय लाभार्थ्यांना आर्थिक संकटाचा सामना करून सुद्धा लाभार्थ्यांच्या खात्यावर आत्तापर्यंत रक्कम मिळाली नाही .लाभ मिळवून देण्याकरता याकरिता क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने अनोख्या आंदोलन करण्यात आले यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे युवा जिल्हाध्यक्ष सतीश इढोळे, पदाधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# एचएसआरपी लावण्यासाठी फक्त दोन दिवस शिल्लक

## उद्या अंतिम मुदत; विलंब झाल्यास कायदेशीर कारवाई

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

जुन्या मोटार वाहनांवर 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' (एंईझ) लावण्यासाठी आता फक्त चार दिवस शिल्लक आहेत. केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० अन्वये १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांवर ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी एचएसआरपी बसविणे अनिवार्य आहे. ही मुदत जवळ आल्याने नागरिकांनी तात्काळ नोंदणी करून अधिकृत प्लेट बसविण्याचे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे.

रस्ते सुरक्षा व वाहनांची ओळख पटविणे सोपे होणे, बनावटगिरी रोखणे आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने एचएसआरपी अत्यावश्यक आहे. अनधिकृत पुरवठादारांकडून घेतलेल्या प्लेट्स अवैध मानल्या जातील व नियमभंग करणाऱ्या वाहनमालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. वाशिम जिल्ह्यासाठी Rosmerta Safety Systems Ltd. या अधिकृत संस्थेची नेमणूक करण्यात आली असून, नागरिकांनी एचएसआरपी बुकिंगसाठी अधिकृत संकेतस्थळ https:// mhhsrp.com वर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी.

---

# मालेगाव नगरपंचायत : उपाध्यक्ष पदासाठी 'माझं ऐका नाहीतर बघाच!'

## कोणी समाजाची ढाल पुढे करतोय, कोणी आमदारांची ओळख; सत्तेचा बाजार तापला!

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

येथे नगरपंचायतीतील उपाध्यक्ष पदाचा तिढा काही केल्या सुटण्याचे नाव घेत नाही. सत्ता स्थापनेनंतरही ना उपाध्यक्ष ठरतोय, ना सभापती पदांचा पत्ता! सध्या नगरपंचायत म्हणजे विकासाचे सभागृह नसून मागण्यांचा मेळावा झाल्याचे चित्र आहे.

कोणी ठामपणे म्हणतंय उपाध्यक्ष पद द्या, नाहीतर बांधकाम सभापती तरी द्या! तर काहींचा सूर थेट धमकीचा आमची मतं वापरून राजकारण करायचं असेल, तर खुर्ची आमचीच! यातच काही मंडळींनी भविष्यातील विधानसभा निवडणुकीचा इशारा देत, आज उपाध्यक्ष दिला नाही, तर उद्या मतं विसरून जा! असा स्पष्ट अल्टिमेटम दिल्याची जोरदार चर्चा आहे. समाजकारणाचाही फड रंगात आला आहे. आमच्या समाजाला उपाध्यक्ष पद मिळालं नाही, तर पुढे तुमचं काम करणार नाही! असा इशारा देत काहींनी सामाजिक दबावाचं हत्यार उपसले आहे. यावर कडी म्हणजे काही नगरसेवकांची खुलेआम कबुली मी इतक्या मोठ्या राजकारण्याला पाठींबा दिलाय, आता उपाध्यक्ष पद माझंच! एकीकडे पदग्रहण रखडलेलं, दुसरीकडे एकही सभापती पद वाटप नाही. नगरपंचायत सध्या पद आहे, पण धारक नाही या विचित्र अवस्थेत अडकली आहे. आता सर्वांचे लक्ष लागले आहे ते आमदार भावनाताई गवळी यांच्याकडे. कोणाचा अहंकार सांभाळतात, कोणाला गोड शब्दात थोपवतात, आणि कोणाला उपाध्यक्षाची खुर्ची बहाल करतात याकडे संपूर्ण मालेगाव उत्सुकतेने पाहत आहे. एक मात्र नक्की विकास कुठे हरवला कळलंच नाही, पण उपाध्यक्ष पदासाठीचं राजकारण मात्र शिखरावर पोहोचलं आहे!

---

# ॲग्रोटेक राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनात कृषि विज्ञान केंद्र, वाशिमचे शास्त्रीय व तंत्रज्ञानाधारित प्रभावी दालन



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विभाग व आत्मा, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ ते २९ डिसेंबर दरम्यान विद्यापीठ क्रीडांगण, नागपूर रोड, अकोला येथे ?ग्रोटेक–२०२५'ङ या राज्यस्तरीय भव्य कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात वाशिम जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, वाशिम यांचे सुसज्ज व तंत्रज्ञानाधारित दालन वाशिमचे अध्यक्ष अनंतरावजी देशमुख यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली उभारण्यात आले होते. अध्यक्षांनी नेहमीच शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात घट करून निव्वळ उत्पन्न वाढविण्यावर भर देणाऱ्या कमी खर्चिक, स्थानिक संसाधनाधारित व शाश्वत तंत्रज्ञानाचा आग्रह धरला आहे. त्यांच्या मार्गदर्शनानुसार दालनामध्ये गोआधारित व नैसर्गिक शेती, जैविक निविष्ठा निर्मिती, एकात्मिक शेती पद्धती, मूल्यवर्धन व काढणीपश्चात व्यवस्थापन यांसारख्या तंत्रज्ञानांचा समावेश करून खर्च कमी व नफा अधिक या संकल्पनेवर आधारित प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

कृषि विज्ञान केंद्राच्या दालनामध्ये 'शेतकरी हाच केंद्रबिंदू' या संकल्पनेवर आधारित, आधुनिक व शाश्वत कृषि तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिके व मॉडेल्स प्रभावीपणे सादर करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने एकात्मिक शेती पद्धती , गोआधारित नैसर्गिक शेती प्रणाली, गोकृपा अमृत व जैविक निविष्ठा, नैसर्गिक शेतीतील निविष्ठा निर्मिती पद्धती, गांडूळखत उत्पादन तंत्रज्ञान, नाडेप व व्हर्मी कम्पोस्टिंग, ॲझोला उत्पादन तंत्र, हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादन, शोभिवंत मत्स्यपालन, महिलांचे श्रम कमी करणारी कृषी अवजारे, श्रीअन्न (श्ग्त्तू) पिकांचे नमुने, चिया पिकाची लागवड व तंत्रज्ञान, सेंद्रिय हळदीचे नमुने, सायलेज कल्चर तंत्रज्ञान, सुपर ग्रेन बॅग तंत्र, काढणीपश्चात व्यवस्थापन व मार्केटिंग तंत्र या घटकांवर विशेष भर देण्यात आला. तसेच, गाईच्या शेणापासून तयार होणाऱ्या धूपबत्ती व मूल्यवर्धित उत्पादने, जैविक निविष्ठा (ट्रायकोडर्मा, रायझोबियम), मत्स्यबीज, कुक्कुटपालन पक्षी, माती परीक्षण सेवा, विविध पिकांची प्रमाणित बियाणे, कृषि विज्ञान केंद्रामार्फत उपलब्ध सेवा, प्रकाशने व माहितीपत्रके, आधुनिक तंत्रज्ञानावरील माहिती दर्शक फलक तसेच यशस्वी शेतकऱ्यांच्या प्रेरणादायी यशकथा शेतकरी व अभ्यागतांचे विशेष आकर्षण ठरल्या. मा. अनंतरावजी देशमुख यांच्या नेतृत्वामुळे कृषि विज्ञान केंद्र, वाशिम हे शेतकरी-केंद्रित, विज्ञानाधिष्ठित व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी प्रभावी व्यासपीठ म्हणून कार्यरत असून, शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य व शाश्वत शेती विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या दालनास डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदिरवाडे, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी, अधिष्ठाता कृषि डॉ. डी. एम. पंचभाई, अधिष्ठाता डॉ. एस. एम. भोयर, डॉ. विजय काळे, उघानविज्ञाते डॉ. श्याम गावडे, वसंतराव नाईक कृषि भूषण पुरस्कारप्राप्त प्रगत शेतकरी दिलीप फुके, विद्यापीठातील शास्त्रज्ञ, विदर्भातील विविध कृषि विज्ञान केंद्रांचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व त्यांचे पथक, कृषि महाविद्यालयांचे विद्यार्थी, विदर्भातील शेतकरी बांधव, महिला बचत गट, कृषि विभागाचे अधिकारी तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी यांनी भेटी दिल्या. या वेळी कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या तांत्रिक प्रश्नांचे शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन व निरसन केले.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३५ ■ मंगळवार ३० डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# मनरेगाच्या पैशांवर 'डल्ला'

# ७० लाखांचा अपहार उघड : नवीन वर्षात आर्थिक गुन्हे शाखेचा अटकस्फोट

## बीडीओंच्या मानेवर तलवार

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या नावाखाली तब्बल ७० लाखांहून अधिक शासकीय निधीवर डल्ला मारल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणाने संपूर्ण जिल्हा प्रशासन हादरून गेले आहे. या बहुचर्चित घोटाळ्याचा तपास आता आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला असून, इंग्रजी नववर्षात या प्रकरणात अटकसत्राची ठिणगी पेटणार असल्याची जोरदार चर्चा आहे. २०१४ ते २०२५ या काळात आर्वी पंचायत समितीत बीडीओ म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची एकामागून एक चौकशी होणार असून, ज्या-ज्या कार्यकाळात मनरेगाच्या निधीची हेराफेरी झाली, त्या अधिकाऱ्यांना तपासाच्या जाळ्यात ओढले जाणार असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. त्यामुळे अनेक माजी-विद्यमान बीडीओंच्या छातीत धडकी भरली आहे.



अर्धे तुम्ही अर्धे आम्ही या सूत्रावर मनरेगाचा निधी लाटल्याचा आरोप असून, आर्वी पंचायत समितीच घोटाळ्याचे केंद्रबिंदू ठरल्याचे तपासात पुढे येत आहे. विशेष म्हणजे या कालावधीत तब्बल १४ अधिकाऱ्यांनी बीडीओ म्हणून सूत्रे हाताळली. त्यापैकी सुनीता मरसकोल्हे यांना आर्वी पोलिसांनी अटक केली होती. मात्र, ही अटक केवळ सुरुवात असून, संपूर्ण साखळी उघड करण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखा कंबर कसून मैदानात उतरल्याचे सांगण्यात येते.

या प्रकरणात बडतर्फ सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर आणि बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांची विधाने नोंदविण्यात आली असून, त्या बयाण्यांतून अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. बनावट कामांची नोंद, नियमबाह्य देयके, संगनमताने निधीची वाटणी, तसेच शासकीय पैशांचा वैयक्तिक खात्यांत वळवाट अशा गंभीर बाबी तपासाच्या केंद्रस्थानी आहेत. काही काळ हे प्रकरण 'थंड बस्त्यात' असल्याची चर्चा होती, मात्र तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे गेल्याने घोटाळ्याची फाईल पुन्हा तापली आहे. नववर्षात या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर अटक आणि निलंबनाची कारवाई होणार, अशी जोरदार चर्चा जिल्ह्यात सुरू आहे.

### कुटुंबीयांवरही कारवाईची टांगती तलवार

मनरेगा निधीचा अपहार करताना बडतर्फ सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर यांनी सहकार्य करणाऱ्यांच्या तसेच कुटुंबातील काही सदस्यांच्या बँक खात्यांत शासकीय निधी नियमबाह्यरित्या वळविल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे संबंधित कुटुंबीयही आता आर्थिक गुन्हे शाखेच्या रडारवर असून, ठोस पुरावे हाती लागताच कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

### एपीआयकडे तपासाची सूत्रे

मनरेगा निधी अपहारप्रकरणी आर्वी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्र. ९९४/२०२५ चा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. या तपासावर पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपअधीक्षक (आर्थिक गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शन असून, प्रत्यक्ष तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर करीत आहेत.

# सामान्य रुग्णालयात सापडलेले मृत अर्भक

## बाहेरून आणले असण्याची शक्यता प्रशासनाचा खुलासा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा सामान्य रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागाजवळील प्रसाधनगृहात आढळून आलेले मृत अर्भक हे रुग्णालयातील नसून बाहेरून आणले गेले असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा खुलासा रुग्णालय प्रशासनाने केला आहे. सर्व संबंधित वॉर्डांची सखोल तपासणी केल्यानंतर रुग्णालयातील कोणतेही नवजात बाळ बेपत्ता नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ९.३० वाजता प्रसाधनगृहात मृत अर्भक आढळून आले. सफाई कर्मचारी सीमा मोरे यांनी ही बाब लक्षात येताच तात्काळ अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकांना माहिती दिली. त्यानंतर घटनास्थळी पाहणी करून वर्धा शहर पोलीस ठाण्याला कळविण्यात आले. पंचनामा करून अर्भकाला शवविच्छेदनासाठी पीएम विभागात ठेवण्यात आले.



घटनेनंतर रुग्णालय प्रशासनाने गठीत केलेल्या वैद्यकीय चमूने सर्व वॉर्डांची बारकाईने तपासणी केली. एनसी वार्डात १६ गरोदर माता होत्या. त्यापैकी ९ नवजात बालके मातेजवळ, तर ७ बालके एसएनसीयूमध्ये भरती होती. सर्व सुरक्षित आढळून आली. पीएनसी वार्डात १२ माता व १२ नवजात बालके सुरक्षित होती. केएमसी वार्डात ३ माता व ३ नवजात बालके एनएनसीमध्ये सुरक्षित आढळली.

लेबर रूममध्ये ५ माता व ५ नवजात बालके, तर एलएससीएस विभागात २ माता व २ बालके सर्वांची पडताळणी केल्यानंतर कोणतेही बाळ गायब नसल्याचे निष्पन्न झाले. अपघात विभागातील बाह्यरुग्ण सेवेत तपासणीस आलेल्या १३ गरोदर माता तपासणीनंतर घरी गेल्याची नोंद आहे. तसेच एका मातेने स्वेच्छेने सावंगी मेघे येथील रुग्णालयात भरती होऊन सिझेरियनद्वारे मुलीला जन्म दिल्याची माहिती प्रशासनाने दिली.

या सर्व तपासणीत रुग्णालयातील सर्व नवजात बालके सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाल्याने, प्रसाधनगृहात सापडलेले मृत अर्भक हे रुग्णालयातील नसून बाहेरून आणले गेले असण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. शवविच्छेदन अहवालानुसार मृत अर्भक पुरुष जातीचे असून डीएनए नमुने घेण्यात आले आहेत. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस विभागाकडून सुरू असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी दिली.

# पालकमंत्र्यांनी घेतला विविध विभागाचा आढावा



**वर्धा जनमाध्यम** : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सहकार आदी विभागाच्या कामकाजाचा आढावा घेऊन आवश्यक सूचना दिल्या.

बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. टिकले, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी, जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे, मुख्याधिकारी विजय देशमुख यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शहरातील प्रमुख चौक, रस्त्ये तसेच गर्दीच्या ठिकाणी असलेले ट्रॉन्सफॉर्मर सुरक्षित ठिकाणी हलवावे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही व अनूचित घटना घडणार नाही यादृष्टीने तात्काळ कार्यवाही करावी.

गर्दीच्या ठिकाणी असलेल्या विद्युत तारेची भूमीगत जोडणी करावी. यासाठी पुढील आराखडा तयार करुन नियोजन समितीच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना यावेळी दिल्यात. सार्वजनिक बांधकाम विभागाने सालोड, दत्तपूर चौकातून जाणाऱ्या महामार्गाच्या रस्त्याची कामे तातडीने हाती घ्यावे, असे सांगितले.

तसेच प्रलंबित असलेले जिल्ह्यातील बांधकामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्यात. जिल्ह्यात सहकारभवन बांधण्यात येणार असून यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जागेचा व बांधकामाचा प्रस्ताव तत्काळ सादर करण्याच्या सूचना यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी बैठकील संबंधित विभागाला केल्यात.

# विदर्भ राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचा दिमाखदार समारोप

## पुरुषांत काटोलचा जल्लोष, महिलांत यवतमाळचे वर्चस्व

**वर्धा जनमाध्यम :** दिवंगत माजी राष्ट्रीय खो-खो पटू प्रदीप महाजन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रदीप की याद में आयोजित करण्यात आलेल्या विदर्भ राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचा थरारक आणि दिमाखदार समारोप झाला. सहयोग शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा यांच्या वतीने स्थानिक जुने आरटीओ मैदान, प्रतापनगर येथे झालेल्या या स्पर्धेत विदर्भातील महिला व पुरुषांचे एकूण ३५ संघ सहभागी झाले होते. चुरशीच्या लढतीनंतर पुरुष गटात विदर्भ क्रीडा मंडळ, काटोल तर महिला गटात नवजयहिंद क्रीडा मंडळ, यवतमाळ यांनी विजेतेपद पटकावले. स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यास पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार अमर काळे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, संजय इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सुषिता भोयर, किशोर कोकाटे, अतुल तराळे, डॉ. यशवंत हिवंज, प्रशांत पांडे, कैलाश बाकरे, विजय धनवलकर, संजय पिल्लेवार, नरेंद्र दिघडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. महिला विभागातील उपांत्य फेरीत अनंत क्रीडा मंडळ, अकोला आणि छत्रपती युवक क्रीडा मंडळ, नागपूर यांच्यात झालेल्या सामन्यात अकोला संघाने विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.





### नगर परिषद कार्यालय देवळी, जि.वर्धा
### ई-निविदा सूचना (तिसरी वेळ)

जा.क्र.नपदे/१६५६/२०२५ दिनांक २६.१२.२०२५

मुख्याधिकारी नगर परिषद देवळी, जि.वर्धा यांच्या वतीने खालील कामाची ई-निविदा द्वी-लिफाफा पध्दतीने योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय (निव्वळ) किंमत |
|---|---|---|
| १. | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत देवळी शहरातील घनकचरा संकलन, वाहतुक व प्रक्रिया करणे. (०८ महिने कालावधीकरीता) | ७३,०९,५६०/- |
| २. | देवळी शहरातील जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग करणे | २५,८५,०००/- |

वरील कामाबाबत सविस्तर माहिती तसेच अटी व शर्ती आपणास दिनांक २९.१२.२०२५ ते दिनांक ०५.०१.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र शासनाचे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

स्वाक्षरी/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देवळी.


# घरकुल लाभार्थ्यांना दिलासा : ४ रेती घाटांतून रेती वितरण सुरू

## हिंगणघाट तालुक्यात २ घाटांत अजूनही पाणी, २३०० ब्रास रेतीचे नियोजन

**वर्धा जनमाध्यम :** आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांचे पक्क्या घराचे स्वप्न साकार व्हावे, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेला रेतीअभावी मोठा अडथळा निर्माण झाला होता. मात्र आता हिंगणघाट तालुक्यात प्रशासनाच्या ठोस निर्णयामुळे घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील सहा रेती घाट घरकुल लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यापैकी चार रेती घाटांतून सध्या प्रत्यक्ष रेती वितरण सुरू झाले आहे.



तालुक्यातील सहा रेती घाट घरकुल लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी चार रेती घाटांवरून सध्या रेती वितरण सुरू आहे. दोन घाटांमध्ये पाणी अधिक असल्याने तेथून वितरण सुरू झालेले नाही. लाभार्थ्यांनी घरकुल मंजुरीचा कागद व आधार कार्ड सोबत आणून रितसर रेती घ्यावी.
**योगेश शिंदे,** तहसीलदार, हिंगणघाट

शासनाच्या आदेशाला केंद्रस्थानी ठेवत हिंगणघाटचे तहसीलदार योगेश शिंदे यांनी जिल्हाधिकारी वान्मथी सी. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी श्रीकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय अमलात आणला. त्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेली घरकुलांची कामे आता पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

तालुक्यातील कापसी (सर्वे क्रमांक ११, ८१, १२, १११), कापशी (सर्वे क्रमांक २३, २४), जुनोना (सर्वे क्रमांक २९, ३२, ३३, ३६, ४०), पोहणा (सर्वे क्रमांक २१, २२), धानोरा (सर्वे क्रमांक १८४, १८५) तसेच काजळसरा (सर्वे क्रमांक २, ७०, २७, ३२, ७४, २६९) येथील रेती घाटांमधून सुमारे २३०० ब्रास रेती घरकुल लाभार्थ्यांना वितरित करण्याचे नियोजन तालुका प्रशासनाने केले आहे.

यापैकी जुनोना व काजळसरा येथील दोन रेती घाटांमध्ये सध्या पाण्याची पातळी अधिक असल्याने तेथून रेती वितरण सुरू होऊ शकलेले नाही. उर्वरित चार रेती घाटांमधून मात्र घरकुल लाभार्थ्यांना नियमानुसार रेती दिली जात आहे. विशेष म्हणजे, ज्या एजन्सींनी रेती घाटांचा लिलाव घेतला आहे, त्यांनी अद्याप उपसा सुरू केला नसला तरी शासनाच्या निर्देशानुसार ३१ डिसेंबरपर्यंत रेती वितरण सुरू करण्याचा निर्णय तालुका प्रशासनाने घेतला आहे.

घरकुल मंजुरीचे कागद व आधार कार्ड आणा आणि रेती घ्या' असे स्पष्ट धोरण राबविण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक रेती घाटावर तलाठ्यांची नियुक्ती करण्यात आली असून पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडून घरकुल लाभार्थ्यांची अधिकृत यादी मागविण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रांसह रेती घाटावर गेलेल्या लाभार्थ्यांना रितसर रेती दिली जात असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.या निर्णयामुळे हिंगणघाट तालुक्यातील शेकडो घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, रखडलेली घरे आता वेगाने पूर्ण होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अतिवृष्टीत खचलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य मर्यादा दिड लाख करा

## खासदार अमर काळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**वर्धा जनमाध्यम :** सन २०२५-२६ मध्ये राज्यातील विविध भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील सिंचन विहिरी मोठ्या प्रमाणावर खचल्या आहेत. अनेक विहिरींमध्ये प्रचंड गाळ साचला असून काही विहिरी पूर्णतः नादुरुस्त झाल्याने शेतकऱ्यांचे सिंचन व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडले आहे. याचा थेट फटका खरीप व रब्बी पिकांच्या उत्पादनावर बसत असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

सध्या शासनाच्या संदर्भीय शासन निर्णयानुसार अतिवृष्टीमुळे खचलेल्या सिंचन विहिरींसाठी कमाल ३० हजार रुपये इतकी अर्थसहाय्य मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. मात्र सध्याच्या वाढत्या महागाईच्या काळात मजुरीचे दर, दगड, वाळू, सिमेंट, लोखंड यांसारख्या बांधकाम साहित्याचे बाजारभाव लक्षणीयरीत्या वाढले आहेत. अशा परिस्थितीत विहिरीतील गाळ काढणे, दुरुस्ती करणे व पुनर्बांधणी करणे हे या तुटपुंज्या रकमेतून शक्य नसल्याचे वास्तव शेतकऱ्यांसमोर उभे आहे.

ही बाब लक्षात घेऊन खासदार अमर काळे यांनी शासनाकडे ठोस व भरीव मदतीची मागणी केली आहे. खचलेल्या व गाळ भरलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी सध्याची अर्थसहाय्य मर्यादा ३० हजार रुपयांवरून थेट १ लाख ५० हजार रुपये करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्षात विहिरींची दुरुस्ती करून सिंचन व्यवस्था पूर्ववत करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.



तसेच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या विहिरींचे पंचनामे कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त उपस्थितीत तात्काळ करण्यात यावेत. पंचनाम्यानंतर अर्थसहाय्याचे वितरण विलंब न लावता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट करण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हास्तरीय कृषी विभाग व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात यावेत, अशीही मागणी खासदार काळे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी पत्राद्वारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. अतिवृष्टीमुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा पूर्ववत करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा येणाऱ्या हंगामात शेती उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, अशी भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.


### जाहीर सूचना

माझे पक्षकार सौ. किरण विजय गुजर हे मौजा - सेलू, तह -सेलू. ज़िल्हा वर्धा कॉम्स नगर पंचायत सेलू , मौजा क्रमांक १६७ , प ह क्रमांक. १५, शीट क्रमांक. ०१, नगर भूमापन क्रमांक . ३४, वॉर्ड क्रमांक ०१ घर क्रमांक ४३२ झोन क्रमांक. 1 (as per assessment and tax receipt) क्षेत्रफळ 44.20 sq.mt. and ४०० चौरस फूट (as per Assessment) सदर प्लॉटची चतुरसीम - पूर्वेस- सिमेंट रोड पश्चिमेस- श्री उमेश पराते ह्यांचे घर उत्तरेस - श्री सुरेश कामनापुरे ह्यांचे घर दक्षिणेस - प्रकाश गुजर ह्यांचे घर सादर मालमत्ता हि सौ . किरण विजय गुजर ह्यांनी सादर मालमत्ता सौ. सुषमा प्रमोद खोडतकर यांच्याकडून दिनांक १६-०५-२०२३ दस्त क्रमांक ९८१/२०२३ अन्वय विकत घेतली आहे . माझ्या पक्षकाराने सादर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता The Tata Capital Housing Finance Ltd येथे कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल व तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर,वर्धा.**
**मो.९९२२४२६१६८**

### जाहीर सूचना

माझा मुलगा स्व. हंसराज हिरामण शंभरकर यांचे दिनांक १८/१२/२०२४ रोजी दुःखद निधन झाले. त्याच्या मालकीची दुचाकी वाहन क्रमांक MH-32 AQ 2842 एसेस १२५, चेसिस क्रमांक MB8DPL2DFL8248297 इंजिन क्र. AF212318839 हा आहे. (नाते आई आहे) माझे नाव इंदू हिरामण शंभरकर, (वय ६७) समता नगर सावंगी मेघे वर्धा, हे असून ते वाहन माझे नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझे कुटुंबातील सदस्यांनी ना- हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सालोड हिरापूर, वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र
**श्रीमती इंदु हिरामण शंभरकर**
समता नगर वार्ड क्रं. ३ सावंगी (मेघे) वर्धा,
मो. नं. ९९७५६९२६१५

### जाहीर सूचना

माझे पती गोपाळराव गोविंदराव मोरे याचे दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे टायटन (ग्रे) चारचाकी वाहन क्रं. MH32AQ2842 चेचीस नंबर MALFB81BLPM479151 इंजिन नंबर G4LAPM579845 हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव मंदा गोपाळराव मोरे (वय ७६) कमला नेहरू शाळेजवळ रामनगर वर्धा, हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र
**श्रीमती मंदा गोपाळराव मोरे**
कमला नेहरू शाळा जवळ रामनगर वर्धा
मो. नं. ९८५०२३५५९०

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### उन्नाव बलात्कार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

# कुलदीप सेंगरचा जामीन रद्द




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उन्नाव बलात्कार प्रकरणात आज (२९ डिसेंबर) सुप्रीम कोर्टात महत्त्वाची सुनावणी झाली. या प्रकरणातील आरोपी आणि माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर याला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. दिल्लीउच्च न्यायालयाने दिलेल्या जामिनाच्या आदेशावर सुप्रीम कोर्टाने तात्पुरती स्थगिती लावली आहे. या प्रकरणाची सुनावणी मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने केली.

**समाजाला हादरवणारा गुन्हा; CBIचा ठाम युक्तिवाद**

अपील प्रलंबित असताना सेंगरच्या आजीवन कारावासाच्या शिक्षेवर स्थगिती देत सशर्त जामीन मंजूर करणा-या दिल्लीउच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात केंद्रीय अन्वेषण विभागाने (क्एक्ष) सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सुनावणीच्या सुरुवातीलाच CBI तर्फे सालिसिटर जनरल तुषार मेहता यांनी कठोर भूमिका घेतली. त्यांनी न्यायालयाला सांगितले की, हा एका अल्पवयीन मुलीवर करण्यात आलेला अत्यंत भयानक बलात्कार आहे. गुन्ह्याची तीव्रता लक्षात घेता आरोपीच्या शिक्षेला स्थगिती देणे चुकीचे ठरेल.

CBIने हेदेखील स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाने भारतीय दंड विधान (IPC) कलम ३७६ आणि पाक्सो कायद्याच्या कलम ५ या तरतुदींचा योग्य विचार केलेला नाही. पीडिता अल्पवयीन होती आणि हे प्रकरण संपूर्ण समाजाला हादरवणारे आहे. अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपीला दिलासा दिल्यास समाजात चुकीचा संदेश जाईल. यावर न्यायमूर्ती जे.के. महेश्वरी यांनी स्पष्ट केले की, कलम ३७६ संदर्भात विचार करण्यात आला आहे. मात्र, एसजी मेहता यांनी पुन्हा आक्षेप घेत सांगितले की, अनेक महत्त्वाच्या बाबींकडे उच्च न्यायालयाने दुर्लक्ष केले असून, पीडिता अल्पवयीन असल्याचा मुद्दा अत्यंत गंभीर आहे.

**पीडितेचे वय आणि दोषसिद्धी-** CBIच्या मते, गुन्हा घडला तेव्हा पीडितेचे वय १६ वर्षांखालील होते. ती केवळ १५ वर्षे १० महिन्यांची होती. सेंगरला दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये दोषी ठरवण्यात आले आहे. सार्वजनिक पदावर असलेल्या व्यक्तीने हा गुन्हा केल्याचे स्पष्टपणे सिद्ध झाले असून, CBIने ठोस पुरावे न्यायालयासमोर सादर केले होते. आता अखेर सर्व युक्तीवाद ऐकल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली हाय कोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे.

**सेंगर अजूनही तुरुंगात-** दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाने जरी बलात्कार प्रकरणात सेंगरच्या शिक्षेला स्थगिती देत सशर्त जामीन मंजूर केला असला, तरी पीडितेच्या वडिलांच्या कोठडीतील मृत्यू प्रकरणात ठोठावण्यात आलेल्या १० वर्षांच्या शिक्षेमुळे तो अद्याप तुरुंगातच आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी-** हे प्रकरण २०१७ सालचे आहे. उत्तर प्रदेशातील तत्कालीन भाजप आमदार कुलदीप सिंह सेंगर याच्यावर उन्नाव जिल्ह्यातील एका अल्पवयीन मुलीने बलात्काराचा आरोप केला होता. २०१९ मध्ये दिल्लीतील ट्रायल कोर्टाने सेंगरला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. तसेच, पीडितेच्या वडिलांच्या कोठडीतील मृत्यू आणि साक्षीदारांना धमकावण्याच्या प्रकरणांमध्येही सेंगर दोषी आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढणार, अजित पवार यांनीच केली घोषणा

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात महापालिका निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या युतीची चर्चा फिस्कटल्याचं वृत्त दोन दिवसांपूर्वी समोर आलं होतं. दरम्यान, आता नाट्यमय घडामोडी घडल्या असून पवार काका-पुतण्या एकत्र निवडणूक लढणार आहेत. खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच याबाबत घोषणा केलीय. रविवारी झालेल्या भेटीगाठी आणि चर्चेनंतर हा निर्णय झाला आहे.दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार अशी चर्चा असताना शनिवारी अचानक शरद पवार गट महाविकास आघाडीसोबत जात असल्याचं म्हटलं जात होतं. दरम्यान, आमदार रोहित पवार आणि खासदार अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. यानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीच्या चर्चा सुरू झाल्या. अजित पवार यांनी स्वत:च दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केलीय.



अजित पवार यांनी म्हटलं की, पिंपरी चिंचवडमध्ये निवडणुका लढवत असताना राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजे घड्याळ आणि तुतारी एकत्रित सामोरे जात आहे. त्यामुळे हा परिवार पुन्हा एकत्र येण्याचं काम होत आहे. ब-याच जणांच्या मनात हेच होतं. त्यामुळे महापालिका निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याचं म्हटलंय. खासदार अमोल कोल्हे आणि रोहित पवार यांनी अजित पवार गटासोबत तीन बैठका केल्या. या बैठकीनंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढण्यावर शिक्कामोर्तब झालंय. दोन्ही राष्ट्रवादीच्या उमेदवारांची एकत्रित यादी आज जाहीर होण्याची शक्यता आहे.

## मुंबईसाठी अदानी अन् आमची नैतिक लढाई सुरूच राहणार, ती थांबवणार नाही: संजय राउत

**मुंबई/प्रतिनिधी :** आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या देशातील पहिल्या अत्याधुनिक महाविद्यालयाचे उद्घाटन बारामतीत उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे एकाच व्यासपीठावर आले होते. शरद पवार म्हणाले की, गौतम अदानी यांचे अनेक क्षेत्रांमध्ये मोठे योगदान आहे. त्यांनी लाखो लोकांना रोजगार दिला आहे. त्यांनी समाजहिताच्या अनेक गोष्टी उभ्या केल्या आहेत. त्यांचे कर्तृत्व नव्या पिढीसाठी सांगणे आवश्यक आहे. बारामतीतील कार्यक्रमाबाबत बोलताना संजय राउत यांनी स्पष्ट शब्दांत भाष्य केले. गौतम अदानी यांनी शरद पवार यांना माय मेंटार असे संबोधले. शरद पवारांना सर्व क्षेत्रातील माहिती अधिक आहे. शरद पवार माझ्यासाठी आदरणीय आणि आदर्श आहेत. परिवर्तनाचे प्रतीक म्हणून बारामतीकडे पाहिले जाते. एक नेतृत्व कसे विकास साधू शकते, याचे उदाहरण म्हणून शरद पवार यांच्या कामांना बघितले जाते, असे गौतम अदानी यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितले. यावर संजय राउत यांनी पत्रकारांशी बोलताना थेट प्रतिक्रिया दिली. त्यात नवीन काय आहे. ज्यांनी शरद पवार यांचे आत्मचरित्र वाचले आहे, त्यात या सगळ्या गोष्टी आलेल्या आहेत. शरद पवार यांनीच गौतम अदानी यांना एक तरुण उद्योजक म्हणून घडवले. एखाद्या नेत्याने तरुण उद्योजकाला घडवले असेल, जडण-घडण केली असेल, तेव्हा त्यांचे कौटुंबिक संबंध निर्माण होतातच. यावर आक्षेप घेण्यासारखे काहीच नाही. परंतु, मुंबईसाठी गौतम अदानी आणि आमची नैतिक लढाई सुरूच राहील, तो संघर्ष रस्त्यावरही येउ शकतो. आम्ही आमची लढाई थांबवणार नाही. ज्या पद्धतीने मुंबईचा घास गिळण्याचा प्रयत्न अदानींच्या माध्यमातून भाजपा करत आहे, त्याविरोधात आम्ही आमचा लढा कायम ठेवू. या लढ्यात जे आमच्यासोबत येतील ते येतील. आलात तर तुमच्या सोबत नाहीतर तुमच्याशिवाय. मुंबईवर प्रेम असेल, ते येतील, असे संजय राउत यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अजित पवार म्हणाले, गौतम अदानी यांनी १९८८ साली शून्यातून व्यवसायाची सुरुवात केली. आज त्यांच्या उद्योग समूहाचे २० देशांमध्ये कार्य सुरू आहे. ते तीन लाख लोकांना रोजगार देतात. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ३० वर्षांपासून पवार आणि अदानी कुटुंबाचे प्रेमाचे नाते आहे.



## 'ऑपरेशन सिंदूर'यशस्वी! पाकने 7 महिन्यानंतर कबूल केले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'ऑपरेशन सिंदूर'च्या सात महिन्यांनंतर, पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक दार यांनी भारतीय ब्रह्मोस क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने नूर खान एअरबेसवर हल्ला केला होता असे पहिल्यांदा कबूल केले. या हल्ल्यात तळावरील इमारतींचे नुकसान झाले आणि सैनिक जखमी झाले. पाकिस्तानने ८० ड्रोन हल्ल्यांचाही उल्लेख केला.मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू झाला होता. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले होते. 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाले होते. पाकिस्तानने हे नेहमी नाकारले आहे. पण, आता पाकिस्तानने पहिल्यांदाच ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानचे मोठे नुकसान झाल्याचे कबुल केले आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे एक भयानक दहशतवादी हल्ला झाला. पाकिस्तान समर्थित दहशतवाद्यांनी २६ निष्पाप पर्यटकांना मारले. भारताला हे सहन झाले नाही. ७ मे २०२५ रोजी ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले. या कारवाईत भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नउ दहशतवादी अड्ड्यांवर हल्ले केले.पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांनी प्रत्युत्तर दिले. त्यानंतर भारताने अधिक जोरदार प्रत्युत्तर दिले, ब्राह्मोस सुपरस?निक क्रूझ क्षेपणास्त्रे आणि ड्रोन वापरून अनेक पाकिस्तानी हवाई तळांवर अचूक हल्ले केले. १० मे रोजी युद्धविराम जाहीर करण्यात आली.नूर खान एअरबेसवर हल्ला- पाकिस्तानने कबूल केले की भारताने १० मे रोजी सकाळी रावळपिंडीजवळील नूर खान एअरबेसवर हल्ला केला. हा त्यांच्या लष्करी मुख्यालयाजवळील एक महत्त्वाचा पाकिस्तानी हवाई दलाचा तळ आहे.दार यांनी सांगितले की, हल्ल्यात तळाच्या इमारतींचे नुकसान झाले आणि सैनिक जखमी झाले.नुकसान किरकोळ असल्याचे सांगितले असले तरी, ही पहिलीच सार्वजनिक कबुली आहे. भारताने ३६ तासांत किमान ८० ड्रोन तैनात केल्याचा दावा केला आहे. एका नूर खान बेसला नुकसान झाले. भारताने ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी अनेक हवाई तळांना लक्ष्य केल्याच्या बातम्या आधीच आल्या होत्या. पाकिस्तानच्या कबुलीमुळे आता या अहवालांना बळकटी मिळते. ब्रह्मोसची अचूकता पाकिस्तानी हवाई संरक्षणाला आव्हान देते.

# संपूर्ण पवार कुटुंब आणि गौतम अदानी हे एकाच मंचावर



## गौतम अदानी मंचावर असताना शरद पवार अन् अजित पवारांमध्ये संवाद

**पुणे/प्रतिनिधी :** महापालिकांच्या निवडणुकींची घोषणा झाल्यानंतर राजकारणात घडामोडींना वेग आला असतानाच बारामतीत रविवारी संपूर्ण पवार कुटुंब आणि गौतम अदानी हे एकाच मंचावर पाहायला मिळाले. बारामती रविवारी उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स या केंद्राचं उद्घाटन झालं. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पवार कुटुंबातील सर्व दिग्गज एकाच मंचावर दिसून आले.

**रोहित पवारांनी अदानींच्या गाडीचं केलं सारथ्य :** गौतम अदानी रविवारी बारामतीत दाखल झाले होते, तेव्हा आमदार रोहित पवार आणि अजित पवार यांनी त्यांचं स्वागत केलं. यावेळी रोहित पवार यांनी ड्रायव्हिंग सीटवर बसून अदानी यांच्या गाडीचं सारथ्य केलं. या कार्यक्रमात खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, खासदार सुनेत्रा पवार यांच्यासह पवार कुटुंबातील आदी जण उपस्थित होते.

**शरद पवार माझे मेंटर :** शरद पवार यांच्याशी तीन दशकांहून अधिक काळाचा परिचय आहे. त्यांची दूरदृष्टी, अनुभव, प्रशासनातील जाण आणि देशहिताचा दृष्टिकोन यांपासून आपल्याला कायम प्रेरणा मिळाली. शरद पवार हे माझे मेंटर आहेत असं यावेळी गौतम अदानी यांनी म्हटलं. **अदानी माझे मोठे भाउ :** गौतम अदानी हे माझ्यासाठी मोठ्या भावासारखे आहेत. कधी आयुष्यातील चांगली किंवा कडू बातमी कुठल्या भावाला सांगते तर ते गौतम अदानी आहेत, असं या कार्यक्रमात बोलताना सुप्रिया सुळे यांनी म्हटलं.

**काका-पुतण्यामध्ये संवाद :** बारामती शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स या केंद्राच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात गौतम अदानी बोलत असताना मंचावर शरद पवार आणि अजित पवार यांच्यामध्ये काही वेळ संवाद झाल्याचं पाहायला मिळालं. **अजित पवारांचा सुळेंना टोला तर अदानींचं कौतुक :** गौतम भाई नेहमीच बारामतीत येतात. दिवाळीत ते शरद पवारांना शुभेच्छा देण्यासाठी येतात. त्यांचे आज बारामतीत स्वागत करताना आनंद झाला. लोक मोठे झाल्यावर आरोप करतात. टीका-टिप्पणी करतात. पण, आपण काम करत राहायचं असतं, असं अजित पवारांनी म्हटलं.

## आंध्रात टाटानगर-एर्नाकुलम एक्सप्रेसच्या दोन डब्यांना भीषण आग; एकाचा मृत्यू



**अमरावती /वृत्तसंस्था :** आंध्र प्रदेशातील येलामांचिली परिसरात टाटानगर-एर्नाकुलम एक्सप्रेसच्या दोन डब्यांना आग लागल्याची गंभीर घटना घडली. या अपघातात एका प्रवाशाचा मृत्यू झाला आहे.माहितीनुसार, ज्या दोन डब्यांना आग लागली त्यापैकी एका डब्यात ८२ तर दुस-या डब्यात ७६ प्रवासी प्रवास करत होते.आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही असून, त्याची फारेन्सिक तपासणी सुरू आहे.मीडिया रिपोर्ट्सनुसार, बी-१ आणि एम-२ या डब्यांना आग लागली होती. आग लागली त्या वेळी सर्व प्रवासी शांतपणे झोपलेले होते. लोको पायलटला ट्रेनमध्ये आग लागल्याचे लक्षात येताच त्याने तात्काळ ट्रेन थांबवली आणि अग्निशमन दलाला लगेच माहिती देण्यात आली. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचेपर्यंत दोन्ही डबे पूर्णपणे जळून खाक झाले होते आणि संपूर्ण स्थानक धुराने भरून गेले होते.एका पोलिस अधिका-याने सांगितले की, ट्रेनला आग लागल्याची माहिती त्यांना रात्री सुमारे १२.४५ वाजता मिळाली. अपघातानंतर आगीच्या तडाख्यात सापडलेल्या बी-१ डब्यातून एक मृतदेह आढळून आला आहे. मृत व्यक्तीची ओळख चंद्रशेखर सुंदरम अशी करण्यात आली आहे. या अपघातात एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याव्यतिरिक्त काही इतर प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. मात्र, प्रवाशांचे सर्व सामान आगीत जळून खाक झाले आहे. या घटनेमुळे विशाखापट्टणम-विजयवाडा मार्गावरील सर्व रेल्वे गाड्या सध्या रद्द करण्यात आल्या आहेत.अपघातानंतर आगीने प्रभावित झालेले दोन्ही डबे ट्रेनपासून वेगळे करण्यात आले आणि ट्रेनला तिच्या अंतिम गंतव्य एर्नाकुलमच्या दिशेने रवाना करण्यात आले. तसेच, अपघातग्रस्त डब्यांतील प्रवाशांनाही लवकरच त्यांच्या गंतव्यस्थळी पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. आगीचे कारण शोधण्यासाठी दोन फारेन्सिक पथके तपासात गुंतलेली आहेत.

## विवेक भीमनवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अध्यक्षपदी विवेक लक्ष्मीकांत भीमनवार (भा.प्र.से.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचना जारी केली आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१६ (१) अन्वये राज्यपालांनी ही नियुक्ती केली असून, विवेक भीमनवार यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून सहा वर्षे किंवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत (जे आधी होईल तोपर्यंत) ते या पदावर कार्यरत राहणार आहेत. अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारेपर्यंत, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१६ (१-क) नुसार डॉ. अभय एकनाथ वाघ, सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.



## विदर्भात सर्वात कमी तापमान @9.0

**नागपूर/प्रतिनिधी :** मागील एक महिन्या पासून गोंदिया जिल्हा थंडीमुळे गारठत आहे. विदर्भात सर्वाधिक कमी तापमान गोंदियाचे नोंदविले जात आहे. सोमवार २९ डिसेंबर रोजी गोंदियाचे तापमान ९.० अंश सेल्सियस नोंदविण्यात आले आहे. कमालीच्या थंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे.दरवर्षीप्रमाणे गोंदिया जिल्हा थंडीच्या लाटेत थंडगार होत चालला आहे.

गेल्या २५- २६ दिवसांपासून गोंदिया जिल्ह्यातील तापमानाचा पारा ८ ते ९ अंशाच्या घरात स्थिरावला आहे. डिसेंबर महिन्यात तर १० अंशाच्या आताच तापमान राहिला आहे त्यामुळे थंडीचा जोर कमी होण्याचे चिन्ह दिसून येत नसल्याने सर्वसामान्य नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. या संपूर्ण डिसेंबर महिन्या भरा पासून सातत्याने गोंदिया जिल्हा विदर्भात सर्वाधिक कमी तापमानात अव्वलस्थानी कायम आहे. अगदी पहाटे पासूनच थंडीचा जोर राहत असल्याने हुडहुडी जाणवत आहे. ज्येष्ठ नागरीक व लहान मुलांना थंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. पहाटेपासून दिनचर्या सुरू करणा-या नागरिकांचा थंडीच्या लाटेमुळे सकाळी ७.३० वाजेपुर्वी घराबाहेर पडणे कठीण होत आहे. अश्यात उबदार कपडेही या बोच-या थंडीमुळे कुचकामी ठरू लागले आहेत. सुर्याचे किरणामुळेही थंडीचा जोर सकाळी ११ वाजता पर्यंत ही काही कमी होताना दिसून येत नाही. वाढत्या थंडीमुळे सर्वसामान्य त्रासले असून वयोवृद्ध लोक आणि लहान मुलांच्या आरोग्यावरही परिणाम पडू लागले आहे. सर्दी, खोकला, ताप यासारख्या आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. वाढलेली थंडी ही आरोग्यासाठी धोकादायक ठरत असून जिल्ह्यात सर्दी, खोकला व तापाने पाय पसरले आहेत. मोठ्या संख्येत सर्दी, खोकला व तापाचे रुग्ण निघत आहेत. थंडीमुळे आरोग्याच्या तक्रारी वाढल्या असून लहान मुले व वृद्धांसह युवावर्गही त्रासला आहे. नोव्हेंबर महिन्यातील पहिल्या आठवड्या पासून गोंदिया जिल्ह्यात अचानकच जिल्ह्यात थंडीचा जोर वाढला होता. तेव्हा त्या पूर्वी उन्हाळ्याने हैरान असलेले लोक पारा नउ अंशांवर आला होता व गुलाबी थंडीने जिल्हावासी खुश झाले होते. मात्र तेव्हापासूनच थंडीने जिल्ह्यात बस्तान मांडले असून थंडीचा जोर काही केल्या कमी झाला नाही. कमाल व किमान तापमानातील ही घसरण असल्यामुळे गारठणारी थंडी पिच्छा सोडत नसून जिल्हावासीयांना चांगलीच हुडहुडी भरली आहे. यामुळे आणखी किती दिवस असाच थंडीचा जोर चालणार, अशी चर्चा ठिकठिकाणी ऐकाव्यास येवू लागली आहे.

**जिल्हा निहाय तापमान**


| | |
|---|---|
| गोंदिया | 9.0 |
| नागपूर | 9.8 |
| भंडारा | 10 |
| यवतमाळ | 10.4 |
| वर्धा | 11.0 |
| अमरावती | 11.5 |
| वाशिम | 11.6 |
| गडचिरोली | 12.2 |
| चंद्रपूर | 12.2 |
| अकोला | 12.5 |

## छत्तीसगडमध्ये अनेक ठिकाणी ईडीचे छापे

**रायपूर/वृत्तसंस्था :** भारतमाला प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करताना दिल्या जाणा-या मोबदल्यात झालेल्या अनियमिततांच्या प्रकरणी अंमलबजावणी संचनालयाने (ईडी) छत्तीसगडमध्ये अनेक ठिकाणी छापेमारी केली आहे. ही कारवाई रायपूर-विशाखापट्टणम आर्थिक कारिडारशी संबंधित आहे. ईडीने सोमवारी रायपूर आणि महासमुंद येथे एकूण ९ ठिकाणी झडती घेतली. या कारवाईत हरमीत सिंग खनुजा, त्यांचे कथित सहकारी, काही सरकारी अधिकारी तसेच जमीन मालकांशी संबंधित ठिकाणांचा समावेश आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रायपूर ते विशाखापट्टणम दरम्यान भारतमाला प्रकल्पाअंतर्गत उभारण्यात येणा-या रस्त्यासाठी जमीन अधिग्रहणाच्या मोबदल्याच्या वितरणात झालेल्या कथित अनियमिततांच्या चौकशीसाठी ही कारवाई करण्यात येत आहे. अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, या संपूर्ण प्रकरणाचा संबंध रायपूर-विशाखापट्टणम आर्थिक कारिडारसाठी करण्यात आलेल्या जमीन अधिग्रहणाशी आहे.या ऑपरेशनअंतर्गत हरमीत सिंग खनुजा, त्यांचे कथित सहकारी, काही सरकारी अधिकारी आणि जमीन मालकांशी संबंधित ठिकाणी छापेमारी करण्यात येत असल्याचे अधिका-यांनी सांगितले.

## दाट धुक्यामुळे दिल्लीत रेड अलर्ट ; विमान, रेल्वे वाहतूक विस्कळीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीमध्ये आज सकाळी दाट धुक्याचे वातावरण असल्याने भारतीय हवामान विभागाने सोमवारी ऑरेंज अलर्ट जारी केला होता, मात्र नंतर तो बदलून रेड अलर्ट करण्यात आला आहे. सकाळी आठ वाजेपर्यंत इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि सफदरजंग येथे दृश्यता केवळ ५० मीटर इतकी होती. धुक्यामुळे विमान आणि रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्याचबरोबर प्रदूषणाची पातळीही वाढली आहे. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर थंडीच्या लाटांमुळे दाट धुके पसरले असून त्यामुळे अनेक विमानांच्या उड्डाणांना विलंब होत आहे. काही विमानसेवा रद्द होण्याचीही शक्यता आहे. विमानतळ प्रशासनाने प्रवाशांना त्यांच्या विमानाच्या स्थितीची (फ्लाइट स्टेटस) तपासणी करण्याचा सल्ला दिला आहे. तर धुक्यामुळे दिल्लीकडे येणा-या सुमारे ७० गाड्या २ ते १५ तास उशिराने धावत आहेत. दिल्लीमध्ये उशिरा पोहोचल्याने परतीच्या मार्गावरील अनेक गाड्यांच्या सुटण्याच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांसह अनेक लोकल गाड्याही उशिराने धावत असल्यामुळे दैनंदिन प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.नवी दिल्ली-बरौनी हमसफर विशेष १४.०५ तास,नवी दिल्ली-कानपूर श्रमशक्ती एक्सप्रेस - ११.०५ तास, नवी दिल्ली-कालका शताब्दी एक्सप्रेस - साडे चार तास, नवी दिल्ली-अमृतसर शान-ए-पंजाब एक्सप्रेस -साडे पाच तास, नवी दिल्ली-सोगरिया (कोटा) सुपरफास्ट एक्सप्रेस - साडे चार तास, नवी दिल्ली-दरभंगा हमसफर विशेष - ५ तास, आनंद विहार टर्मिनल-अयोध्या कॅन्ट वंदे भारत - ६.०५ तास, नवी दिल्ली-लखनउ स्वर्ण शताब्दी एक्सप्रेस - ३ तास, नवी दिल्ली-फिरोजपूर इंटरसिटी एक्सप्रेस - २ तास, आनंद विहार टर्मिनल-जोगबनी सीमांचल एक्सप्रेस -दीड तास उशिरा या गाड्या उशिराने धावणा-या प्रमुख गाड्यांमध्ये आहेत. दरम्यान, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीबीसी) च्या समीर अॅपनुसार, सकाळी आठ वाजता वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) ४०२ नोंदवला गेला, जो गंभीर श्रेणीत मोडतो. आनंद विहार (४५५) आणि विवेक विहार (४५६) हे सर्वाधिक प्रदूषित भाग ठरले.



## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ‘काँग्रेस कल्चर’

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाच्या विरोधकांची अवस्था ‘कळते पण वळत नाही’ अशी असल्याचा आणखी एक पुरावा परवा मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री, काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य आणि खासदार दिग्विजय सिंह यांच्या विधानाने दिला. दिग्विजय सिंह हे काही नवखे नेते नव्हेत. वयाची ८० पार केलेले, सारी हयात काँग्रेसमध्ये घालवलेले, संघटनेतल्या बहुतेक पदांवर काम केलेले विचारी, ज्येष्ठ नेते आहेत. सत्तेच्या खेळापलीकडेही राजकारणाचे अस्तित्व असते, याची जाण असलेल्या आणि त्या राजकारणात कायम रस घेणाऱ्या देशातल्या निवडक नेत्यांमध्ये दिग्विजय सिंह यांचे नाव घेतले जाते. त्यामुळे, त्यांच्या वक्तव्याला माध्यमांनी दिलेले महत्त्व योग्यच आहे. फक्त ते राहुल गांधींविरोधी आहे किंवा पुढच्या वर्षी जूनमध्ये त्यांची राज्यसभेची मुदत संपते आहे म्हणून आहे, या टीकेला किंवा निष्कर्षाला काही अर्थ नाही. अशा झटपट, उथळ निष्कर्षाने त्यांचा अवमान होतोच; पण त्यांनी जे वक्तव्य केले आहे, त्याचे गांभीर्यही नष्ट होते. दुर्दैवाने राजकारणात सर्वत्रच सध्या अशा झटपट विश्लेषकांचे पेव फुटले असल्याने राजकारणातल्या अनेक घडामोडींची तटस्थ, गांभीर्यपूर्ण दखल घेतली जात नाही. दिग्विजय सिंह यांनी केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीला जाण्यापूर्वी केलेल्या विधानाचीही तशीच वासलात लागू नये. अनुभवी राजकारणी काय बोलतो याला महत्त्व असतेच; पण, तो ते कधी बोलतो याला जास्त महत्त्व असते. कार्यकारिणीच्या बैठकीला जाण्यापूर्वी एवढे महत्त्वाचे बोलण्यामागे दिग्विजय सिंह यांचा हेतू आता संघ किंवा भाजपचे कौतुक करण्याचा नाही. त्याबाबत ते जे बोलले, ते सर्वसामान्यच आहे. काँग्रेसचे अनेक नेते खासगी किंवा एखाद्या बिगरराजकीय कार्यक्रमात ते बोलतच असतात. संघ आणि भाजपच्या गुणांचा उल्लेख करताना दिग्विजय सिंह यांची इच्छा स्वजनांनी त्यापासून धडा घ्यावा, अशी आहे. काँग्रेसच्या नेतृत्वात गेल्या पन्नास-साठ वर्षांत अनेक बदल झाले. पण, संघटनात्मक कार्यपद्धती बदलली नाही. राहुल गांधी यांच्या कार्यकाळातही त्यात काही बदल नाही, हे दिग्विजय सिंह यांनी उघड केले आहे. ते अधिक महत्त्वाचे आहे. कारण काँग्रेसच्या ऱ्हासाचे कारणच ते आहे. दिग्विजय सिंह आज जे बोलताहेत, ते यापूर्वी कोणी बोललं नाही, असं नाही. काँग्रेसमध्ये हा मुद्दा वारंवार चर्चिला गेला आहे. काँग्रेसची अंतर्गत बाब म्हणूनही आणि विरोधकांनी याच मुद्द्यावर काँग्रेस विरोध विरोधात जनमत तयार केलं म्हणूनही. पण, काँग्रेसमधल्या तोंडपूज्या नेत्यांनी उलट असे मुद्दे मांडणाऱ्यांच्या विरोधात हल्ले केले आणि ‘इंदिरा इज इंडिया, इंडिया इज इंदिरा’ सारखी विधाने केली. त्याकाळी या विधानावरून देवकांत बरुआ यांची माध्यमे आणि विरोधकांनी टिंगल केली. पण, काँग्रेसमध्ये मात्र इंदिरा गांधी यांना बळ मिळाले. बरुआ यांची ‘री’ ओढण्यात चढाओढ लागली. जे त्यापासून दूर राहिले, ते नंतर बाजूला फेकले गेले! बरुआ किंवा तत्सम नेत्यांचे दिवस चांगले गेले; पण पक्षाचे नुकसान झाले. हे नुकसान कोणीच वेळीच लक्षात न घेतल्याने पक्षाची आज अशी अवस्था झाली आहे. गंमत म्हणजे, आजही दिग्विजय सिंह यांना समर्थन किंवा सहमती म्हणून कोणीही पुढे आलेले दिसत नाही. उलट, कार्यकारिणीच्या बैठकीत दिग्विजय सिंह यांना त्यांचे बोलणे आवरते घ्यायला सांगण्यात आले. खुद्द अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीच त्यांना ‘इतरांनाही बोलायचे आहे’ असे सुचवून बोलणे आवरते घ्यायला लावले. काँग्रेसमध्ये आत्मपरीक्षण शक्य नाही, हे दाखवून देणाराच हा सगळा प्रसंग आहे. जमीनजुमला गमावल्यानंतरही ऐटीत वावरणाऱ्या जमीनदारांसारखी काँग्रेसची स्थिती आहे. ही स्थिती राहुल गांधी बदलू शकतील, अशी आशा अनेकांना होती. पण, तीही आता विरत चालली आहे. सोनिया गांधी अध्यक्ष असताना काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांची मानसिकता, विचार करण्याची पद्धत, डावपेच याबाबत राहुल गांधी सतत तक्रार करत असत. ‘माझ्या हातात काय आहे? अध्यक्ष तर ‘त्यांचेच ऐकतात’, अशी त्यांची तक्रार असे. ‘काँग्रेस कल्चर’ बदलण्याबाबत ते बोलत असत. दिग्विजय सिंह यांचं विधान आणि त्याला नेतृत्वाकडून मिळालेला प्रतिसाद पाहता आता राहुल गांधीच त्या ‘कल्चर’ चा भाग झाले, असं म्हणता येईल. काँग्रेस विरोधकांसाठी ही बाब बलवर्धकच आहे! काँग्रेस आणि भाजप हे केवळ दोन विरुद्ध पक्ष नाहीत. त्या विरुद्ध राजकीय संस्कृती आहेत, असे म्हटले जाते ते यामुळेच. काँग्रेस हा मुळात व्यक्तीकेंद्री पक्ष आहे. त्या पक्षाने खूप व्यापक व्हायचे ठरवले, तर तो कुटुंबकेंद्री होतो. याउलट भाजपची जडणघडण संघटनकेंद्री आहे. लोकशाहीत त्याशिवाय सामिलीकरण होत नाही आणि त्यायोगे पक्षाचा विस्तारही होत नाही. व्यक्तीकेंद्री संघटनेसाठी कायम दिव्यवलयी, कणखर व्यक्तिमत्त्वाची गरज असते. सामूहिक नेतृत्वरचनेत नेतृत्वाच्या शीर्षस्थानी पोहोचलेल्या नेत्यांपैकी कोणा एकाची निवड तत्कालीन परिस्थितीनुसार होत राहते. परिस्थिती बदलल्यास नेतृत्वाची पर्यायी फळी तयार असते. राजकीय कार्यकर्त्याला त्याच्या पात्रतेप्रमाणे प्रगतीची संधी दुसऱ्या प्रकारातच असते. म्हणून नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान होऊ शकतात. संघटनेची ही ताकद संघ आणि भाजपमधल्या प्रत्येकाला माहीत आहे. काँग्रेसमध्येही काहींना आहे, पण त्यांचा इलाज चालत नाही. काँग्रेसच्या मतदाराचा तोच नाईलाज आहे!

# ब्रँड पवार आणि राष्ट्रवादीचे राजकारण

**माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राजधानी नवी दिल्लीमध्ये झालेल्या स्नेहभोजनाला विविध पक्षाचे दिग्गज नेते उपस्थित राहिले. सत्तेत असो किंवा नसो, सर्वपक्षीय राष्ट्रीय नेत्यांना एकत्र आणण्याची किमया केवळ शरद पवारांकडे आहे हे पुन्हा दिसून आले. मात्र त्याच वेळी त्यांच्या पक्षाच्या भवितव्याची आणि संभाव्य एकत्रीकरणाची चर्चा जोरात सुरु होती.**



माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांचा ८५ वा वाढदिवस नुकताच साजरा झाला. त्याच्या दोन दिवस अगोदर राजधानी नवी दिल्लीमध्ये त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या स्नेहभोजनाला विविध पक्षाचे दिग्गज नेते उपस्थित राहिले. यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्ट, कमलनाथ, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे खासदार सौगत रॉय, माजी केंद्रीय मंत्री डी. पुरंदेश्वरी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रफुल पटेल, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांची या सोहळ्याला उपस्थिती होतीच, पण देशातील मोठ्या उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा गौतम अदानी हे सुध्दा शरद पवारांच्या शेजारीच बसून होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

**सामान्य जनतेचे आजही प्रेम**

मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटरमधे आम जनतेसोबत त्यांचा वाढदिवस साजरा झाला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, रोहिणी खडसे, विद्या चव्हाण अशी टीम त्यांच्या बाजूला होती, पण सर्व थरातील आणि सर्व वयोगटातील सामान्य लोकांच्या झुंडीच्या झुंडी सकाळपासून त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येत होत्या. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती. केंद्रात आणि राज्यात सत्तेच्या परिघात नसताना हजारोंची गर्दी तिथे लोटली होती.

**वलय अजून कायम**

अजित पवार आणि त्यांनी बरोबर अडीच वर्षापूर्वी अजित पवार हे चाळीस आमदारांसह पक्ष घेऊन भाजपासोबत गेले, सत्तेत सहभागी झाले. त्यांना भाजपाने उपमुख्यमंत्रिपद दिले, आवडते अर्थमंत्रिपद त्यांना मिळाले. त्यांच्याबरोबर बंडात सामील झालेल्या दहा आमदारांना मंत्रिपदे मिळाली. सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्द्यावरून शरद पवारांनी बंड करून १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. राज्यातून डझनभर खासदार आणि पन्नास-साठ आमदार निवडून आणण्याची आपली ताकद आहे आणि आपल्याला बरोबर घेतल्याशिवाय सरकार स्थापन करता येणार नाही हे त्यांनी दाखवून दिले. शरद पवारांनी मोठे केलेले नेते, मंत्री अजितदादांबरोबर भाजपासोबत गेले आहेत. पण पक्षाचे कार्यकर्ते आणि शरद पवारांना मानणारी सर्वसामान्य जनता त्यांच्यावर आजही प्रेम करते, हेच त्यांच्या वाढदिवसाला जमलेल्या लोकांमुळे तसेच राष्ट्रीय राजकारणातील मुरब्बी मंडळींमुळे दिसून आले.

नेलेल्या पक्ष संघटनेला अजून तरी भाजपाचे संरक्षक कवच आहे. भाजपाच्या कवचामुळेच त्यांच्या पक्षाला राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक आणि राजकारणात वर्षानुवर्षे किंगमेकर म्हणून ओळखले जाणारे शरद पवार यांचे सत्तास्थापनेतील महत्त्व कमी करण्यात भाजपा यशस्वी झाली असेल, पण त्यांचे वलय कमी झालेले नाहा. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवला आणि चाळीस आमदारांसह भाजपासोबत गेले. उध्दव ठाकरेंप्रमाणे शरद पवारांनी अजितदादा आणि बंडखोर कंपनीला गद्दार ठरवले नाही. गेल्या अडीच वर्षांमध्ये शरद पवारांनी आपल्या पुतण्याविषयी कटूशब्द उच्चारले नाहीत आणि पुतण्यानेही त्यांचा अनादर केला नाही. वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्यूट, रयत शिक्षण संस्था अशा दीड-दोन डझन सार्वजनिक संस्थांवर काका पुतण्या पदाधिकारी आहेत. पण एकमेकांना कोणी पाण्यात बघितले नाही.

**बंड नवीन नाही**

शरद पवारांसाठी बंड काही नवीन नाही. १९७८ मध्ये वसंतदादांचे सरकार पाडून पुलोद सरकार स्थापन केले, तेव्हा त्यांच्यावर दादांच्या पाठीत खंजीर खुपल्याची टीका झाली होती. वयाच्या ३८ वर्षी राज्याचे सर्वात तरुण मुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांनी केला होता. पण नंतरच्या काळात वसंतदादांचा अवमान होईल असे वक्तव्य त्यांनी केले नाही. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या विरोधात काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवून त्यांनी पक्षात स्वतःचा दरारा निर्माण केला होता. रावांच्या विषयी मनात कधी अढी बाळगली नाही, सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्दयावरून शरद पवारांनी काँग्रेसमध्ये बंडाचा झेंडा फडकवला, पण नंतर डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमध्ये ते दहा वर्षे केंद्रात कृषिमंत्री होते. यामुळेच अजित पवार यांनी केलेल्या बंडामुळे ते विचलीत झाले नाही. राजकारणात गेल्या साडेसहा दशकाहून अधिक काळ सकीय असलेल्या शरद पवारांची ओळख ‘साहेब’ अशी आहे. अनेक अडचणी, संकटे आणि आजारावर त्यांनी मात केली आहे. त्यांचा पुणे, मुंबई, दिल्ली असा प्रवास अखंड चालू असतो, पण राज्यात चांद्यापासून बांद्यापर्यंत सर्वत्र सर्वाधिक फिरणारा नेता अशी त्यांची प्रतिमा आहे.

तब्येत कशी आहे, असा प्रश्न पवारांना कधीच आवडत नाही. ते कधी थकलेले दिसत नाहीत. आजही वाचन भरपूर आहे. शेतीपासून कृत्रिम बुध्दिमत्तेपर्यंत अनेक विषयांमध्ये त्यांना रस आहे. लोकांची गर्दी हेच त्यांचे टॉनिक आहे.

**भाजपची स्वबळाची तयारी**

भाजपाने २०२९ ची निवडणूक स्वबळावर लढवण्याची तयारी सुरू केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही त्याची सुरुवात आहे. २०२९ च्या निवडणुकीत कुबड्या फेकून द्यायच्या असल्याचे स्पष्ट आदेश अमित शहा यांनी अलीकडेच दिले आहेत. राज्यात सत्तेवर येण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना बरोबर घेऊन ठाकरेंची शिवसेना आणि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाने खच्ची केलीच, पण आता शत-प्रतिशत सत्ता प्राप्त करण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या कुबड्या दूर करायला सुरुवात केली आहे. एकनाथ शिंदे हे सारखे दिल्लीला धावतात आणि अमितभाईंना भेटतात, अमित शहा हे एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांचे राजकारणातील हायकमांड आहेत. अमित शहा हे भाजपची ताकद कशी वाढेल याचा सदैव विचार करतात. शिंदे किंवा अजितदादांचा पक्ष मोठा करणे हे त्यांचे काम नाही. जे अमितभाईच्या मनात आहे तेच महाराष्ट्रात देवाभाऊ व रवींद्र चव्हाण करत असतात, एकनाथ शिंदे हे माघारी फिरू शकत नाहीत. त्यांना भाजपासोबत राहूनच राजकारण करावे लागणार आहे, पण अजितदादांना काकांचा पर्याय आहे

. काका-पुतण्यांनी तसे संबंधही ठेवले आहेत. भाजपा आपला विस्तार साधत असताना आपल्या पक्षाचा संकोच होणार हे अजितदादांना पूर्ण ठाऊक आहे. आपले अस्तित्व, आपला पक्ष आणि आपले सहकारी यांच्या भवितव्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊ शकतील का, अशा चर्चेला शरद पवारांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने उधाण आलेले दिसले.

**काहीही होऊ शकते**

मुंबईमध्ये ठाकरे ब्रॅंड जवळ आले असेल तर काका-पुतण्या का येणार नाही, असा प्रश्न विचारला जातो आहे. यावर काहीही होऊ शकते असे एक उत्तर आहे. सध्या तरी होकार किंवा नकार काहीच व्यक्त होताना दिसत नाही. महराष्ट्रामध्ये होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये मुंबई-ठाण्यात भाजपा आणि शिंदे सेनेची युती होणार, असे दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी जाहीर केले आहे. अन्य महापालिकांमध्ये तसेच जिल्हा परिषदांमध्येही असे होऊ शकते. मग अजितदादांचा पक्ष कुठे आहे, असा प्रश्न पडतो. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव कोणी घेत नाही. भाजपाने ठाणे व कोकणामध्ये शिंदेंच्या शिवसेनेला धक्का देण्याचे काम केले. उद्या अजितदादांच्या पक्षाबाबत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपा हाच प्रयोग करू शकतो, नव्हे तसे होणारच आहे. भाजपाच्या आक्रमक विस्तारवादापुढे एकनाथ शिंदे किंवा अजितदादा काहीच करू शकणार नाहीत.

पक्षाच्या भविष्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र यावे अशी मानसिकता दोन्ही पक्षांमध्ये वाढते आहे. त्यातून काय आणि कसे निष्पन्न होते, ते आता पहायचे.

**डॉ. सुकृत खांडेकर**

# समस्या ईशान्य भारताची

अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि सिक्कीम या आठ राज्य मिळून ईशान्य भारत बनतो. सिक्कीम वगळता उरलेल्या सात राज्यांना त्यांच्या भौगोलिक सानिध्यात आणि संस्कृतिक समानतेमुळे सात बहिणी (सेवन सिस्टर) हे नाव दिले आहे तर सिक्कीमला भाऊ(ब्रदर स्टेट) संबोधले जाते. हा भाग कायमच दुर्लक्षित राहिल्यामुळे अशांत, अस्थिर, अविकसितच आहे. प्रत्येक राज्याची वेगळी समस्या आहे. नागालँड मध्ये क्रिस्ती मिशनरी मोठ्या प्रमाणात धर्मांतरण करत आहे. मणिपूर मध्ये मूळ आदिवासी आणि घुसखोर धर्मांध यांच्यात सरळ सरळ युद्ध आहे त्यात अफू सारख्या अमली पदार्थाची शेती आणि तस्करी होत आहे. आसाममध्ये बांगलादेशी रोहिंग्यां ची समस्या आहे. अरुणाचल प्रदेशला चीन स्वतःचाच भाग मानतो. धर्मांतरण, जिहादी आतंकवादी, आक्रमण आणि चीन, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ हे देश ही भूमी कह्यात घेण्यासाठी सतत प्रयत्नात असतात. नुकतेच अरुणाचल प्रदेश मध्ये हेरगिरीचे जाळे उघड झाले आहे. त्यात पाकिस्तानशी संबंधित हेरगिरी नेटवर्कमधील चार संशयितांना अटक केली. हे सर्व संशयित महत्त्वाची माहिती पाकिस्तानी हॅन्डलर्सला पाठवत होते. त्यात चीनचाही सहभाग असल्याचे लक्षात आले. पकडले गेलेले संशयित स्थानिक मुसलमान समुदायांमध्ये मिसळून स्लीपर सेल सिद्ध करण्याचा प्रयत्न करत होते.

काही दिवसापूर्वी भारताला ईशान्य भारताची जोडणाऱ्या ‘चिकन नेक’ जवळील बांगलादेशाच्या भूभागावर बांगलादेशाच्या वायुसेनेचा हवाई तळ चीन बांधून देत आहे. तर पेरूवा येथे आठ पाणबुड्यांसाठी तळ बांधत आहे. चीनने बांगलादेशाला दोन पाणबुड्या ही दिल्या आहेत. बांगलादेशाच्या वैमानिकांना पाकिस्तान प्रशिक्षित करणार आहे. त्या समवेत सैन्यालाही प्रशिक्षण देणार आहे. सध्या बांगलादेशात हिंदू वरील अत्याचार, हल्ला, आक्रमण उफाळलेला आहे. हिंदूंचे अस्तित्व संपून टाकण्याचा प्रयत्न चीन, पाकिस्तान, बांगलादेश करत आहे. भारतातील ईशान्येकडील सात राज्ये तसेच बंगाल आणि बिहारी यांना एकत्र करून ‘ग्रेटर बांगलादेश’ बनविण्याचे स्वप्न ते पाहतच आहे. एकूणच ईशान्य भारतात खूप काही तरी मोठे करण्याचा कट कारस्थान चीन, पाकिस्तान, बांगलादेश कडून होत आहे. देशाच्या सीमा तलवारीच्या टोकानेच निश्चित होतात आणि निश्चित झालेल्या सीमा बंद करणे हे राष्ट्राच्या हिताचे असते असे उद्गार काही वर्षांपूर्वी दूरदृष्टी असलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी काढले होते आणि ते किती महत्त्वाचे होते हे आज घडणाऱ्या घटनांवरून लक्षात येते. अरुणाचल प्रदेशातील भारत विरोधी कारवाया पहाता चीनसह बांगलादेश आणि पाकिस्तान यांना चेतावणी देणे आवश्यक आहे आणि पुढे जाऊन गरज पडली तर कठोर कारवाई करणे देखील आवश्यक आहे. हिंदूंवरील अत्याचार, त्यांचा होणारा विध्वंस रोखण्यासाठी देशात हिंदू राष्ट्र आणणे हे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

**लीना गाडगीळ**

## ३१ डिसेंबरला ‘एकादशी’

या वर्षी ३१ डिसेंबरला एकादशी आहे. एकादशी हा हिंदू धर्मातील आत्मसंयम, शुद्ध आहार-विहार आणि आध्यात्मिक साधनेसाठी पवित्र दिवस मानला जातो. अशा दिवशी मांसाहार, मद्यपान किंवा उथळ जल्लोष करणे हे आपल्या परंपरेशी सुसंगत नाही. इंग्रजी वर्ष बदलते ते फक्त कॅलेंडरवर; निसर्गात या काळात काहीही मूलभूत बदल होत नाहीत. त्यामुळे इंग्रजी वर्षाच्या स्वागतासाठी एका रात्रीचा दिखाऊ आनंद टाळल्याने आयुष्य थांबणार नाही किंवा कुठलेही नुकसान होणार नाही ; उलट, आत्मसंयमाने साजरा केलेला दिवस मनाला स्थैर्य आणि सकारात्मक ऊर्जा देतो. श्रद्धेची कास धरल्यास जीवन अधिक सुसंस्कृत आणि अर्थपूर्ण होते. आपल्या संस्कृतीत एकादशीसारखे पवित्र दिवस हे भोगासाठी नसून साधनेसाठी असतात. म्हणूनच, ३१ डिसेंबरला मद्य व मांसाहारापासून दूर राहून आपल्या संस्कृतीशी नाते दृढ करूया. या दिवशी साधेपणाने व्रतोपवास किंवा सात्त्विक आहार करून, जप-नामस्मरण करत श्रीहरीची भक्ती करूया.

**अनिकेत शेटे**

## सरत्या वर्षाला निरोप

२०२५ हे साल संपायला आणि नूतनवर्षारंभ व्हायला अगदी मोजक्याच दिवसांचा कालावधी राहिला असून काऊंटडाऊन सुरु झाले आहे त्यामुळे शहरी भागासह गावगाड्यात सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अवघी तरुणाई सज्ज झाली आहे. पाश्चिमात संस्कृतीचे फॅड घेवून आजचा तरुणवर्गाला ‘थर्टी फर्स्ट डे’ म्हणजे एक प्रकारची मेजवानीच असते. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री १२ वाजता फटाक्यांची आतषबाजी, डिजे, गाड्यांच्या पुंगळ्या काढून कर्णकर्कश मोठंमोठ्या आवाजाने प्रमुख मार्गावरुन गाडी पळवली जाते त्यामुळे अनेकांना त्रासाचे ठरु शकते कोणत्याही दिवस साजरा करताना उत्साह, आनंद असावा मात्र उन्माद नसावा आपला उत्साह दुसऱ्यासाठी धोक्याच्या अथवा त्रासाचा ठरेल असा कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. याची पुरेपूर काळजी तरुणाईने घेतली पाहिजे तरच त्या दिवसाचे सार्थक होईल. थर्टी फर्स्ट डे साजरा करण्यासाठी अनेकजण हॉटेल बुक करत आहेत तर काहीजण फार्म हाऊस, शेतशिवारात, रानमाळात, सर्व सोयीनुक्त ठिकाणाची निवड करताना दिसत आहेत तर नविन वर्षाची सुरुवात चांगल्या संस्कारातून व्हावी म्हणून विविध देवदेवतांच्या दर्शनासाठी तिर्थयात्रेच्या नियोजनात आहेत. काही ठिकाणी भजन, किर्तन, प्रवचन सोहळ्याचे नियोजन आहे तसे पाहायला गेले तर नविनवर्षारंभ मराठी महिन्यात गुढीपाडव्यापासून सुरु होते. या दिवशी उत्सव साजरा करण्यास काहीच हरकत नाही पण या उत्साहाला गालबोट लागू नये याची दक्षता घेतली पाहिजे. यंदा ३० आणि ३१ रोजी एकादशीचे सावट असल्याने काहींना अडचणीचे ठरत आहे तरीपण ३१ डिसेंबर दणक्यात साजरा व्हावा सर्वांच्या सलोख्याने, सरत्या वर्षाला निरोप देवून प्रत्येक व्यक्तीकडून सत्कर्म घडो अशी सदिच्छा!

**राजू जाधव**

## १ जानेवारीला जागतिक वर्षारंभ म्हणावे का ?

ज्यू लोकांमध्ये ग्रेगेरिअन कॅलेंडरप्रमाणे नववर्षाचे स्वागत सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात करतात. थायलंड आणि अन्य बौद्धबहुल देशांमध्ये १३ ते १५ एप्रिल असे तीन दिवस नववर्ष साजरे करतात. चिनी लोक नववर्ष ग्रेगेरियन कॅलेंडरनुसार पहिल्या चांद्र महिन्यातल्या पहिल्या दिवशी साजरे करतात. याखेरीज अशी अनेक राष्ट्रे आहेत ज्यांचे नववर्ष १ जानेवारीला सुरु होत नाही. १ जानेवारी हा खरेतर ख्रिस्ती धर्मियांचा नववर्षारंभ दिन आहे. ख्रिस्तपूर्व इ.स. ४०० पूर्वी ख्रिस्ती धर्मीय २१ मार्चला नववर्षारंभ साजरा करत असत. कालांतराने ख्रिस्तीबहुल देशांनीच आपापल्या सोयीनुसार नववर्षारंभ दिन पालटले. ज्यामुळे ख्रिस्त्यांचा गोंधळ होऊ लागला. पुढे रोमन सिनेटने पुढाकार घेऊन इसवीसन १५० मध्ये १ जानेवारीला वर्षारंभ होणारे सामायिक कॅलेंडर तयार केले. आजमितीला जगभरात ख्रिस्त्यांची संख्या सर्वाधिक आहे. ख्रिस्ती राष्ट्रेही अधिक आहेत. ही राष्ट्रे १ जानेवारीला नववर्षारंभ साजरा करतात. त्यामुळे १ जानेवारी हा जागतिक नववर्षारंभ आहे असा गैरसमज भारतीयांमध्ये निर्माण झाला आहे. १ जानेवारी हा ख्रिस्ती नववर्षारंभ असल्याने भारतातील ख्रिस्त्यांनी तो त्यांच्या रितीरिवाजानुसार अवश्य साजरा करावा; मात्र देशात बहुसंख्य असलेल्या हिंदूंनी गुढीपाडवा हाच खरा नववर्षारंभ आहे हे ध्यानात ठेवायला हवे. भारतीय संस्कृतीनुसार गुढीपाडवा हा केवळ हिंदूंचाच नव्हे तर पृथ्वीचाही आरंभ दिन आहे. ‘द्वादशमासैः संवत्सरः।’ असे वेदांमध्येही लिहिले आहे. त्यामुळे भारतीयांनी नववर्षाच्या शुभेच्छा १ जानेवारीला न देता गुढीपाडव्याला द्याव्यात.

**नरेश घरत**

## नवे वर्ष, नवे संकल्प

२०२५ संपून आता २०२६ सुरु होत आहे.या वर्षात आपण प्रत्येकानी काही तरी नवीन करण्याचा प्रयत्न करूया.आपण; व्यायाम करीत नसाल तर नवीन वर्षात दररोज व्यायाम करूया.विद्यार्थ्यांनी दररोज किमान दहा गणिते व इंग्रजीचे किमान दहा नवीन स्पेलिंग्स पाठ करूया . संस्कृत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी दररोज किमान एक तरी नवीन सुभाषित अर्थासह आत्मसात व पाठ करूया यामुळे पाठांतर शक्ती वाढेल . दररोज ठराविक वेळेला अभ्यास करूया व अभ्यासात सातत्य ठेवूया . गृहिणींनी किमान आठवड्यातून एक तरी नवीन पदार्थ शिकूया व स्वयंपाकात नावीन्य राखुया . तुम्ही संकल्प कोणतेही करा पण त्यात सातत्य हवे . यातून आपणास निश्चितच यश मिळेल . आपण दररोज काय केले याची दैनंदिनी किंवा डायरी ठेवा . यामुळे आपण दिवसभरात काय केले याचा आराखडा तयार होईल . दररोजचे दररोज या डायरीत लिहल्याने आपण खरेच दररोज काय करतो हे सुद्धा लक्षात येईल तर मग खरेच करूया नवीन वर्षात नवे संकल्प ....असे काहीतरी नवीन केल्याने आपण खरेच नववर्ष साजरे केल्याचे लक्षात येईल.हे नवीन वर्ष तुम्हा सर्वांना आनंदाचे व भरभराटीचे जातो तुमच्याकडून नवीन संकल्प घडोत.

**शांताराम वाघ**

## राजकारणातील ‘सोयीच्या’ युती आणि लपवलेले हेतू

**माझेही मत**

‘ताकाला जायचे आणि भांडे लपवायचे’ ही जुनी म्हण मराठीत आहे. आजच्या महाराष्ट्राच्या राजकारणाला तंतोतंत लागू पडते. आज आपण पाहतो की, कधी काळी एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले पक्ष ‘जनतेच्या आग्रहाखातर’ म्हणत गळ्यात गळे घालत आहेत. मग ते ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चा असोत, पवार कुटुंबातील विखुरलेले गट असोत, किंवा काँग्रेस आणि वंचितची संभाव्य युती असो. जेव्हा हे नेते सांगतात की, ‘आम्ही केवळ जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावनेचा आदर करून एकत्र आलो आहोत,’ तेव्हा सामान्य माणसाने विचार करण्याची गरज आहे. हा बदलत्या राजकीय परिस्थितीचा परिणाम आहे की खरोखरच लोकहित?

स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवणे, सत्तेच्या समीकरणात बसणे आणि मतविभाजन रोखणे हेच यामागचे मुख्य कारण असते. पण जनतेसमोर येताना मात्र ‘जनतेची मागणी’ असा मुखवटा चढवला जातो. हे राजकारण म्हणजे निव्वळ ‘ताक मागण्याचे’ निमित्त करून स्वतःचा ‘फायदा’ पदरात पाडून घेण्याचा प्रकार आहे. एखादी योजना असो वा नवीन युती, त्यामागे स्वतःचा हेतू लपवून जनतेचे नाव पुढे करणे ही आता एक फॅशन झाली आहे.

मतदार म्हणून आपण आता जागरूक होण्याची वेळ आली आहे. नेत्यांच्या अशा दुटप्पी भूमिकेला भुलू नका. जे नेते आपल्या फायद्यासाठी तत्त्वे बाजूला ठेवतात, ते जनतेच्या हिताचे रक्षण कसे करणार? जेव्हा राजकीय स्वार्थासाठी जनतेच्या नावाचा वापर होतो, तेव्हा लोकशाहीचा दर्जा खालावतो. त्यामुळे नेत्यांनी सांगितलेली ‘निरुपद्रवी कारणे’ न पाहता, त्यामागील ‘लपवलेले खरे कारण’ ओळखायला शिका. पारदर्शक राजकारण हीच काळाची गरज आहे, अन्यथा ‘भांडे लपवण्याचे’ हे खेळ असेच सुरू राहतील आणि सामान्य जनता केवळ प्रेक्षक बनून राहील.

**अविनाश देशपांडे**

# 'गडकरी साहेब, जेवायला या आणि आमचा पूल वाचवा

## मृत्यूचा सापळा बनलेल्या पुलासाठी महागावच्या तरुणाचे मंत्र्यांना आगळेवेगळे साकडे



### "प्रशासनाला जाग येत नसेल, तर साहेबांनाच साकडं घालावं लागेल!"

या अनोख्या पत्राबाबत बोलताना हरीश कामारकर म्हणाले की, "आमच्या भागातील पुस नदीवरील पूल आज मृत्यूचा सापळा बनला आहे. संरक्षक कठडे नसल्याने निष्पाप लोकांचे जीव जात आहेत, पण स्थानिक प्रशासन सुस्त आहे. नितीनजी गडकरी साहेबांचा शब्द आणि त्यांचा दौरा म्हणजे विकासाची गॅरंटी असते, हे आम्ही ऐकून आहोत. म्हणून, तक्रार करण्यापेक्षा आम्ही त्यांना प्रेमाचं निमंत्रण दिलं आहे. साहेब जेवायला आले, तर त्यांच्या स्वागतासाठी का होईना, पण हे प्रशासन रस्ते आणि पूल नक्कीच नीट करेल. जनतेचा जीव वाचवण्यासाठी यापेक्षा वेगळा मार्ग मला दिसला नाही."

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - "ज्या मार्गावरून नामदार नितीन गडकरी जाणार असतात, त्या भागातील रस्ते आणि पूल प्रशासन एका रात्रीत चकाचक करून देते," या लोकचर्चेचा आधार घेत महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथील एका तरुणाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना चक्क 'वन भोजनाचे' निमंत्रण दिले आहे. हे निमंत्रण केवळ भोजनापुरते मर्यादित नसून, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूचा सापळा बनलेल्या पुस नदीवरील पुलाची डागडुजी व्हावी, याकरिता पुकारलेला हा एक अनोखा एल्गार आहे.

हिवरा (संगम) येथील रहिवासी हरीश भीमराव कामारकर यांनी नितीन गडकरी यांना पाठवलेले हे पत्र सध्या राजकीय वर्तुळात आणि सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. या पत्रात त्यांनी विदर्भाच्या मातीतला पाहुणचार आणि शेतातल्या गावरान मेजवानीचा उल्लेख करत गडकरींना हिवरा परिसरात येण्याचे आमंत्रण दिले आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे, "साहेब, हे पत्र कोणत्याही तक्रारीसाठी नाही, तर एका प्रेमाच्या आग्रहासाठी आहे. शेतातली ताजी तुरीची आमटी, हरभऱ्याची भाजी आणि चुलीवरची गरम ज्वारीची भाकर असा बेत तयार आहे. आपण वेळ काढून या वनभोजनाचा आस्वाद घ्यावा, ही गावकऱ्यांची इच्छा आहे." मात्र, या निमंत्रणामागे एक अत्यंत गंभीर आणि वेदनादायी वास्तव दडलेले आहे. नितीन गडकरी हे महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी यवतमाळ जिल्ह्यातील हिवरा (संगम) जवळ पुस नदीवर एका पुलाची उभारणी केली होती. हा पूल परिसरातील १० ते १५ खेड्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, गेल्या काही काळापासून या पुलाचे संरक्षक कठडे तुटलेले असून पुलावर जागोजागी खड्डे पडले आहेत. पथदिव्यांचा अभाव आणि रस्त्याची झालेली चाळण यामुळे हा पूल आता 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. संरक्षक कठडे नसल्याने येथे अनेक भीषण अपघात झाले असून काहींना आपले प्राणही गमवावे लागले आहेत. स्थानिक प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याने, हरीश कामारकर यांनी उपरोधिकपणे गडकरींच्या कार्यतत्परतेचा दाखला दिला आहे. "तुम्ही येणार म्हटल्यावर प्रशासन खडबडून जागे होईल. आपल्या केवळ येण्याच्या बातमीनेच या पुलाचे आणि रस्त्याचे नशीब पालटेल. रखडलेले कठडे आणि पथदिव्यांचे काम युद्धपातळीवर पूर्ण होईल," अशी भावनिक साद या तरुणाने पत्रातून घातली आहे. एका बाजूला नितीन गडकरी देशभर रस्त्यांचे जाळे विणून 'हायवे मॅन' म्हणून ओळखले जात असताना, त्यांच्याच जुन्या कामाकडे स्थानिक प्रशासनाने केलेले दुर्लक्ष आता चव्हाट्यावर आले आहे. एका सामान्य नागरिकाला आपल्या भागातील पुलाच्या दुरुस्तीसाठी थेट देशाच्या कॅबिनेट मंत्र्याला अशा प्रकारे पत्र लिहावे लागते, हे यंत्रणेचे अपयश मानले जात आहे. आता या पत्राची दखल घेऊन गडकरी प्रशासनला काय आदेश देतात आणि या पुलाचे 'भाग्य' खरोखरच उजळते का, याकडे यवतमाळ जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# ग्राहक मंच हा तक्रार निवारण करणारा मंच आहे तेव्हा शोषणमुक्त समाज झाला पाहिजे : प्रा. प्रकाश देशमुख

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - अभा ग्राहक पंचायतची शाखा उमरखेड ग्राहक पंचायत असून त्यामध्ये ग्राहक मंच हा तक्रार निवारण निवारण करणारा मंच आहे त्यामध्ये आज दिनांक 24 डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमात उपस्थित असलेले ग्राहक तथा वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी उपस्थित राहून याच सभागृहात ग्राहकाने विचारलेल्या सर्व प्रश्नांची उकल होणे आवश्यक असून हाच ग्राहक पंचायतचा उद्देश असून त्यांच्या तक्रारीच्या निवारण करणारा हा मंच आहे व या सर्व तक्रारी सोडवणूक करून हा सर्व समाज शोषण मुक्त असा समाज झाला पाहिजे असे उद्गार उमरखेड तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रा प्रकाश देशमुख यांनी स्थानिक तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन या कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलताना काढले तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार विशंभर राणे यावेळी उपस्थित होते.

तर ग्राहकपंचायतचे कार्याध्यक्ष ॲड विलासराव देवसरकर उपाध्यक्ष राजेश गांजेगावकर दुसरे उपाध्यक्ष दत्ता गंगासागर सचिव आर डी बोरगडे कोशाध्यक्ष यशवंत गिरी पुरवठा अधिकारी अमोल महाजन मंचावर उपस्थित होते सर्वप्रथम सरस्वती पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाची सुरुवात जागो ग्राहक जागो या गीताने श्री मुटकुळे यांनी केले पुढे प्रा प्रकाश देशमुख म्हणाले की ग्राहक चळवळीची सुरुवात ही 1986 मध्ये साली ग्राहक कायदा तयार झाला परंतु २० जुलै 20 20 मध्ये सर्व बाबीने सुधारीत कायदा तयार झाला व त्यामुळे टीव्हीवरील येणाऱ्या फसव्या जाहिरातीविरुद्ध सुद्धा जाहिरात करणाऱ्या मोठा सेलिब्रिटी जरी असला तर ग्राहक कायद्यानुसार त्याच्यावर कारवाई होऊ शकते परंतु एवढे वर्ष उलटूनही म्हणावे तसे स्वरूप आजही ग्राहक चळवळीला आले नाही आजचा हा कार्यक्रम शासकीय कार्यक्रम असून आज या उपस्थितीत सर्व ग्राहकांच्या तक्रारीचा निपटारा उपस्थित विविध विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होऊन या सर्व तक्रारींचा उलगडा झाला तरच आजच्या या कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने महत्त्व प्राप्त होईल असे प्रा देशमुख यांनी सांगितले. यावेळी ग्राहकपंचायतचे कार्याध्यक्ष ॲड विलासराव देवसरकर यांनी ग्राहक पंचांच्या आजपर्यंतच्या कामकाजाची माहिती देऊन इतर अनेक प्रश्नांचा उहापोह यावेळी केला तर मागच्या बैठकीत उपस्थित केलेल्या पाणंद रस्त्याच्या प्रश्नावर तहसीलदाराकडून अहवालाची मागणी करण्यात आली तसेच ईसापुर धरणाचे पाणी सोडले असते वेळेवर सुटले असते तर एक महिना उशिरा सोडण्यात आले त्यामुळे शेतकऱ्यांनी यावेळी आंदोलन करण्याची टाळले सध्या सगळीकडे रस्त्याचे काम सुरू आहे सर्व नागरिक या धुळीमुळे श्वासोसास घेण्यास त्रास होत आहे तसेच दम्याच्या आजार वाढत आहेत बायपास रस्त्याच्या कामाबाबत कॉलेजपर्यंत तो आजपर्यंत का गेला नाही रस्त्याचे काम करीत असताना रस्त्याच्या आजूबाजूचे झाडे कापली जात आहेत बँकेत मध्ये पासबुक एन्ट्री मिळत नाही प्रिंटर्स बंद आहेत नगरपरिषद पाणी सोडण्याचा प्रश्न विद्युत बिलाच्या असंख्य तक्रारी मीटर बंद पडणे जंगली श्वापदाचे प्रश्न प्राणी येत आहेत शेतीमध्ये नुकसान करत आहेत तसेच एस टी महामंडळचे वाहक सुद्धा चिल्हर पैशासाठी प्रवाशांना त्रास देतात शासकीय अनुदानास नियम बहुतेक खात्यावर पैसे जमा होत नाहीत अर्ज दीर्घकाळ प्रलंबित राहतात माहिती अधिकार 2005 नुसार सेवा प्रक्रिया सेवाकाळ मर्यादा पुस्तिका दर्शनी भागावर असावी अशा विविध प्रश्नांची उत्तरे यावेळी उपस्थित ना तहसीलदार यांना मागितली व अनेक प्रश्नांवर शासनाला विचारणा केली तसेच अशा आशयाचे निवेदन मुळावा येथील ग्राहक पंचायत सदस्य हरिदास इंगोळकर यांनी ग्राहक पंचायत मार्फत ना तहसीलदार विश्वंभर राणे यांना यावेळी दिले यावेळी माजी गटविकास अधिकारी सुभाष पांडे यांनी ग्राहक संरक्षण कायद्याबाबत विस्तृत अशी माहिती देऊन ग्राहक पंचायत तक्रार दाखल केल्यानंतर त्याचा पाठपुरावा करावा लागतो वेगवेगळ्या तक्रारीद्वारे ग्राहकांना कसा फायदा झाला असे अनेक उदाहरणे त्यांनी देऊन ग्राहक आणि ग्राहक चळवळीत अग्रेसर राहून आपली हक्क अबादी त ठेवून लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले तर तहसील कार्यालयाचे ना तहसीलदार विश्वंभर राणे यांनी यावेळी सर्व प्रश्नांची उत्तरे दिली तर पांदण रस्त्याचा 75 टक्के प्रश्न रस्ते खुली करण्यात आले ते सांगून 25% रस्त्या करता अनेक अडचणी येत असल्याचे सांगितले तहसील मध्ये येणाऱ्या प्रत्येक जणांनी आपला अर्ज विहित नमुन्यात दिल्यास अर्जाचा निकाल लागण्यास वेळ लागणार नाही.

## वेचक

### यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक प्रतिनिधी म्हणून नटवरलाल उंटवाल यांची अविरोध निवड!




पुसद : येथील श्री राजराजेश्वर पतसंस्थेचे संचालक नटवरलाल गणेश उंटवाल यांची श्री राजराजेश्वर पतसंस्था र.न. ६७४ तालुका पुसद जिल्हा यवतमाळ यांचे वतीने यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक प्रतिनिधी म्हणून अविरोध निवड करण्यात आली. टवरं उंटवाल यांना सहकार क्षेत्राचा चांगला अनुभव व अभ्यास असल्याने व दलित समाजाचा व इतर समाजाचा त्यांना चांगल्या प्रकारे सहकार्य असल्याने त्यांची निवड सर्वानुमते करण्यात आल्याची विश्वसनीय माहिती आहे यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष पेन्शनवार उपाध्यक्ष ॲड.उमाकांत पापीनवार संचालक विनोद जिल्हेवार, अभिजीत चिद्दरवार, अभय गडम, अनिल उत्तरवार, संतोष वायकुळे, विजय उबाळे, सौ. प्रणिती डुबेवार, संगीता पदमवार, तज्ञ संचालक एडवोकेट उमेश चिद्दरवार, सुनील डुबेवार यांचे सहकार्य लाभले नटवरलाल उंटवाल हे दलित समाजाचे असून सुद्धा राज राजेश्वर पतसंस्थेने त्यांचे नावाची बँक प्रतिनिधी म्हणून निवड केल्याने सर्व स्तरातून राजराजेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष भारत अण्णा पेन्शनवर, विनोद जिल्हेवार, उमाकांत पपीनवार, अभिजित चिद्दरवार यांचे सह सर्व संचालक मंडळाचे कौतुक केल्या जात आहे.



### प्रेस वेलफेअरच्या अध्यक्षपदी अनिल बिलोरिया तर सचिवपदी सागर बोढे

वणी - येथील प्रेस वेलफेअर असोसिएशनची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून अध्यक्ष पदी अनिल बिलोरिया तर सचिव पदी सागर बोढे यांची निवड करण्यात आली आहे. प्रेस वेलफेअर असोशिएच्या कार्यकारणी निवडी करिता येथील नगर वाचनालयात बैठक आयोजित करण्यात आली होती या वेळी सर्वानुमते अध्यक्ष अनिल बिलोरिया, उपाध्यक्ष रमेश तांबे, सचिव सागर बोढे, सह सचिव जितेंद्र डाबरे, कोषाध्यक्ष पदी तुषार अतकारे तर कार्यकारणी मध्ये गजानन कासावर, विनोद ताजने, रवी बेलूरकर, डॉ किशोर चवणे, मंगल तेलंग,आसिफ शेख यांची निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दीपक नवले यांनी काम पाहिले.

### आसेगाव देवी येथून शामराव पवार यांची बँक प्रतिनिधी निवड



बाभुळगाव - तालुक्यातील आसेगाव देवी येथील ग्रामविकास विविध कार्यकारी सहकारी संस्था असेगांव देवी ग्रा. वि. का. सह. सहकारी बँकेचे प्रतिनिधी म्हूणन आसेगाव देवी गावातील शामराव पवार यांची मतदान पद्धतीने निवड करण्यात आली. संस्थेच्या कार्यालयात रवीवार दि २८ डिसेंबर रोजी निवड प्रक्रिया शांततेत पार पडली.गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### थंडीचा जोर कायम, पारा १०.४

यवतमाळ : यंदा हिवाळा लांबणार असल्याचे संकेत हवामान खात्याने दिले आहे. उत्तरेकडील राज्यात बर्फवृष्टी सुरू असल्याने थंड वारे दक्षिणेकडे वाहू लागले आहे. त्यामुळे पुढचा संपूर्ण महिनाचा थंडीचा कडाका राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे. रविवारी सुध्दा थंडीचा जोर कायम असून १०.४ अंश तापमानाची नोंद झाली आहे. सातत्याने पारा १० अंशावर स्थिरावत आहे. तर दिवसाचे तापमानही २९.४ अंशावर आले आहेत. थंडीचा जोर असल्याने दिवसभर उबदार कपडे घालून घराबाहेर पडावे लागत आहे. रात्री आठ नंतरच गारठा वाढत असल्याने शहरातील बाजारपेठेतही शुकशुकाट पहायला मिळत आहे. त्यामुळे दुकाने लवकरच बंद होत आहेत.

# जि.प.शाळा आरंभी येथील कलाशिक्षक मयूर राऊत यांची राज्यस्तरीय रांगोळी स्पर्धेसाठी निवड



**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य आयोजित शिक्षक कर्मचारी (विविध स्पर्धा) वाशिम येथे झालेल्या विभागीय रांगोळी स्पर्धेत पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा आरंभी, पंचायत समिती दिग्रस येथील कला शिक्षक श्री मयूर प्रदिपराव राऊत सर यांची राज्य स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. दिग्रस तालूक्याला भुषणावह अशी बाब आहे. श्री मयूर राऊत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. पंचायत समिती दिग्रसचे मा.गटशिक्षणाधिकारी श्री.मुकेश कोंडावार,मा. विस्तार अधिकारी श्री संतोष गवारे, आरंभी केंद्राचे मा.केंद्रप्रमुख श्री.प्रविण इंगळे यांनी श्री. राऊत सरांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ग्रामपंचायत श्रीरामपू येथिल खुल्या भुंकडावरील अतिक्रमणावर जेसीबी लावून हटविले!



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : ग्रामपंचायत श्रीरामपूर अंतर्गत येत असलेल्या सहारा पार्क या ठिकाणी ओपन पेस मध्ये धार्मिक स्थळाचे अवैधरित्या बांधकाम सुरू होते. त्याला सरपंच आशिष काळबांडे यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे रीतसर तक्रार करून सदरहू विवादित लोखंडी ढाच्या पाडण्याची रीतसर प्रक्रिया करून रोजी दि.२६/१२/२०२५ रोजी सरपंच आशिष काळबांडे यांनी स्वतः हजर राहून विवादित ढाच्या हा पाडण्यात आला. या कारणाने स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले व अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले. पुन्हा एकदा श्रीरामपूर येथे अतिक्रमणावर जेसीबीव्दारे हातोडा चालला अशी चर्चा सर्व जनसामान्यांमध्ये आहे व असा सरपंच सर्वच गावांना मिळावा जेणेकरून होत असलेले अतिक्रमण थांबेल.

महत्वाची बाब म्हणजे सरपंच आशिष काळबांडे यांनी यापूर्वीसुद्धा असे अनेक विवादित अतिक्रमण स्वतः हजर राहून काढले. यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गावंडे महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थिनी झळकल्या विद्यापीठ गुणवत्ता यादीत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

## रसायनशास्त्र विभागाची नेत्रदीपक यशाची परंपरा कायम

उमरखेड - येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील भक्ती देशमुख, स्वाती शिंदे व श्रुती शर्मा ह्या तीन गुणवंत विद्यार्थिनी शैक्षणिक वर्ष : २०२४-२५ च्या नुकत्याच जाहीर झालेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकल्या आहेत. विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये एकापेक्षा जास्त विद्यार्थी झळकण्याची महाविद्यालयाची नेत्रदीपक यशाची परंपरा यावर्षीही कायम राखली आहे, हे विशेष.

यंदा तीनही मुलीच मेरिट आल्या असून यापूर्वीही रसायनशास्त्र विभागातील तीन विद्यार्थी एकाचवेळी गुणवत्ता यादीत चमकले आहेत. आतापर्यंत रसायनशास्त्र विभागातील सुमारे पंधरा विद्यार्थी मेरिट आले आहेत, हे उल्लेखनीय म्हणावे लागेल. यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर यांनी लक्ष देऊन सातत्याने गावंडे महाविद्यालयाची विकासात्मक वाटचाल होण्यासाठी अनेक उपक्रम राबविले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या रोजगार कक्षाच्या माध्यमातून मेळावा आयोजित करीत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाली. अनेक विद्यार्थी नामांकित कंपनीत आणि विविध स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत नोकरीसाठी रुजू झाले. महाविद्यालयास मागील वर्षी नॅक संस्था, बंगलोर यांच्याकडून मूल्यांकन झाल्यानंतर 'अ' श्रेणी मिळाली आहे. भक्ती आशिष देशमुख ही दुसरी मेरिट, स्वाती रमेश शिंदे ही सातवी मेरिट व श्रुती सुशील शर्मा ही नववी मेरिट आली आहे. ह्या तीन विद्यार्थिनींनी अमरावती विद्यापीठाच्या एम.एस्सी. रसायनशास्त्राच्या अंतिम वर्षाच्या उन्हाळी परीक्षेत मोठे यश संपादन करून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे जून २०२५ च्या सेट परीक्षेत महाविद्यालयाचे चार विद्यार्थी प्राध्यापकपदासाठी आवश्यक असलेली राज्यस्तरीय पात्रता चाचणी, सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर, संस्थेचे सचिव डॉ. यादवराव राऊत, सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधवराव कदम, रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. शंकर वाघमारे, प्रा. डॉ. सुरेश राठोड, प्रा. डॉ. त्रिरत्न भगत, प्रा. अर्चना मिटके व इतर प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या तीनही विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

# राज्यस्तरीय अधिवेशनात पत्रकारांची उपस्थिती प्रेरणादायी

## युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : ग्रामीण पत्रकाराला एखाद्या वृत्तपत्रात काम करताना किती अडीअडचणींचा सामना करावा लागतो तसेच पत्रकारिता करीत असताना समाजातील समाजकंटकांकडून पत्रकार बांधवांवर होणारे भ्याड हल्ले या सर्व बाबीची दखल घेऊन युवा ग्रामीण पत्रकार संघाची मुहूर्तमेढ रोवून तसेच समाजातील प्रत्येक घटकांच्या, न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेली, भारतातील एकमेव संघटना म्हणजे युवा ग्रामीण पत्रकार संघ,आज महाराष्ट्र बरोबरच संपूर्ण देशात अग्रेसर असल्याने, महाराष्ट्र राज्यातील राज्यव्यापी अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा २०२६ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुणे येथे आयोजित करण्यात आलेला आहे,तरी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ परिवारातील सर्व पत्रकार तसेच बांधवांनी होणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवानी या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे युवा ग्रामीण पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेश भाऊ कचकलवार यांनी सांगितले. अतिशय कमी कालावधीत फक्त महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण भारतभर जिल्हा,तालुका व सर्कलनुसार आज युवा ग्रामीण पत्रकार संघ स्थापन करून जिथे छोट्या मोठ्या,ग्रामीण आणि शहरी भागातील पत्रकारांना वेगवेगळा दर्जा मिळत असल्याने,त्यांनी जि संकल्पना करून पूर्ण महाराष्ट्र तसेच भारतभरात कुठल्याही लहान मोठ्यांचा भेंगद नं करता सर्व पत्रकारांना सोबत घेऊन चालण्याचा जो विडा उचलेला आहे त्यास आज खरोखरच महाराष्ट्र व देशात यश मिळाले आणि याचे खरे कारण म्हणजे निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून गोर गरीब जनतेला सर्वतोपारी मदत होत असल्याने या संघटनेमध्ये राष्ट्रभरातून पत्रकार जुळलेले आहेत आणी एवढेच नव्हे तर भविष्यात संपूर्ण जगभरात निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना करू असे राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेशभाऊ कचकलवार यांनी यावेळी सांगितले.

# जगदंबा अभियांत्रिकीत येणार सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री स्पृहा जोशी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात वार्षीक स्नेहसंमेलन 'विंग्स २६' चे आयोजन २९ ते ३१ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले असून दिनांक ३१ डिसेंबर ला बक्षिस वितरण सोहळ्या करीता मराठी चित्रपटसृष्टीची सुप्रसिद्ध सिने तारीका स्पृहा जोशी उपस्थित राहणार आहे. अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी माय बाप, मोरया, सुर राहुं दे, बायस्कोप, पैसा पैसा, लॉस्ट ॲण्ड फाऊंड, मला काहिच प्रॉब्लेम नाही, देवा एक अतरंगी, होम स्वीट होम, विक्की वेलिंगकर, अटकन चटकन, कॉफी, एका लग्नाची दुसरी गोष्ट, उंच माझा झोका, एका लग्नाची तीसरी गोष्ट, सुख कळले, सुर नवा ध्यास नवा यांसारख्या चित्रपट व टि. व्हि. सिरियल मध्ये भुमिका साकारुन आपल्या अभिनयाची छाप रसिकांवर उमटवलेली आहे.

या वर्षी स्नेहसंमेलनात फॅशन शो, नृत्य स्पर्धा, फॅन्सी ड्रेस, जेसीईटी झुम, डिबेट, अंताक्षरी, नाट्यस्पर्धा, कबड्डी, क्रिकेट, खो-खो, फुटबॉल आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. वार्षीक स्नेहसंमेलन विंग्स २६ च्या बक्षिस वितरण सोहळ्यामध्ये क्रिडा स्पर्धाच्या विजेत्यांना पारितोषिके तसेच अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ च्या परिक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार स्पृहा जोशी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. महाविद्यालयामध्ये येत असलेल्या सुप्रसिद्ध सिने तारीकेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे व जल्लोषाचे वातावरण आहे. उपस्थित राहणाऱ्या पाहुन्यांच्या स्वागताकरीता महाविद्यालयीन प्रशासनाने जय्यत तयारी केली असल्याची माहीती संस्थेचे सचिव डॉ. शितल वातीले यांनी दिली.

# विहीरीत तोल गेल्याने साखरा येथील शेतकरी युवकांचा आकस्मित मृत्यू!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी : तालुक्यातील साखरा (खु ) येथील रामभाऊ भगवान मोहुर्ले वय अंदाजे 35 वर्षे यांचा शेतात काम करतांना तोल गेल्याने विहिरीत पडून आकस्मित मृत्यू झाल्याची घटना काल दुपारी घडली. रामभाऊ काल स्वतःच्या शेतात आई,वडीलआणि पत्नीसह काम करत होता, काम करतांना शेतात उपाशी बांधलेल्या बैलांना चारा टाकावा म्हणून मक्का कापून भारा डोक्यावर नेत असतांना शेतातील विहीरीपासूनच रस्ता असल्याने रामभाऊ बैलांकडे जात असतांना विहिरीजवळ पडलेला पाईप पायाला लागल्याने रामभाऊच्या डोक्यावरील भाऱ्यांसह यांचा तोल विहिरीत गेला विहिरीत अचानक तोल गेल्याने त्याचा दुर्दैवी आकस्मित मृत्यू झाला. विहिरीत अचानक कुणी तरी पडल्याचा आवाज आला असता शेतात काम करत असलेले आई, वडील आणि पत्नी धावत विहीरकडे आले आणि पाहताच रामभाऊ विहिरीत पडल्याचे निदर्शनास आले परंतु तो विहिरीच्या तळाशी गेल्याने तो वरती आलाच नाही ते पाहता वडिलांनी त्याला वाचविण्यासाठी विहिरीत उडी मारली परंतु विहिरीत खोलवर पाणी असल्याने वडील आपल्या मुलाला वाचवू शकले नाही ही माहिती पसरताच गावकऱ्यांनी गर्दी केली आणि सदर घटनेची माहिती पोलीस स्टेशन घाटंजी यांना दिली असता पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि गावाकऱ्यांच्या मदतीने मृत व्यक्तींची लाश विहिरी बाहेर काढून शवविछेदनासाठी ग्रामीण रुग्णालय घाटंजी येथे पाठविण्यात आले. रामभाऊ हा कुटुंबातील कर्ता पुरुष होता त्यांच्यामागे आई, वडील, पत्नी आणि दोन मुली आहे त्यात एक लहान मुलगी ही मतिमंद आहे त्यामुळे शासनाकडून त्याच्या कुटुंबाना आर्थिक मदत मिळावी अशी मागणी होत आहे.

# महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत स्टुडंट्स वेलफेअर इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुवर्णयश

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड : हिंगोली येथे पार पडलेल्या ८ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धा २०२५ मध्ये स्टुडंट्स वेलफेअर इंग्लिश मिडीयम स्कूल, दहागाव येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. या स्पर्धेत ईश्वरी अविनाश जाधव हिने ११ वर्ष वयोगटात कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत विशेष प्राविण्यासह सुवर्ण पदक मिळवले. तिच्या आत्मविश्वासपूर्ण खेळाने उपस्थितांची मने जिंकली.

तसेच श्रीनय शशिकांत आकरे याने १० वर्ष वयोगटात कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत विशेष प्राविण्यासह सुवर्ण पदक प्राप्त केले. त्याच्या तांत्रिक कौशल्यामुळे त्याने सर्व प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. याच स्पर्धेत गायत्री शशिकांत आकरे हिने केवळ ८ वर्ष वयोगटात कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत विशेष प्राविण्यासह सुवर्ण पदक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. लहान वयात मिळवलेले हे यश प्रेरणादायी ठरले आहे. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष दर्शन अग्रवाल, उपाध्यक्ष नारायण वड्डे, सचिव नितीन भुतडा, सपना अग्रवाल, संस्थेचे व्यवस्थापक आशिष लासीनकर, मुख्याध्यापक एम. पी. कदम व मुख्याध्यापिका पल्लवी पराते यांनी विजयी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शिस्तबद्ध सरावाचे विशेष उल्लेख करत त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शिवरामजी मोघे महाविद्यालयाच्या भूमिका गेडामची आंतरविद्यापीठ मुलींच्या क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा : स्थानिक शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर येथील बी.एस्सी. भाग दोनची विद्यार्थिनी कु. भूमिका गेडाम हिची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मुलींच्या क्रिकेट संघात ऑलराऊंडर म्हणून निवड झाली आहे. तिची ही निवड राजस्थान येथील वनस्थली विद्यापीठात होणाऱ्या वेस्ट झोन आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.

सदर वेस्ट झोन आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धा दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली असून, विद्यापीठ स्तरावर झालेल्या निवडीमुळे महाविद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण आहे. कु. भूमिका गेडाम ही एक उत्कृष्ट व अष्टपैलू क्रिकेट खेळाडू म्हणून ओळखली जाते. तिने यापूर्वी विविध आंतरमहाविद्यालयीन, जिल्हास्तरीय तसेच विद्यापीठस्तरीय क्रिकेट स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशामागे महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विनोद चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या निवडीबद्दल संस्थेचे सचिव श्री. विजयराव मोघे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके, डॉ. अमर वंजारी, तसेच सर्व प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कु. भूमिका गेडाम हिचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मालमत्ता करावरील शास्तीस १०० टक्के सूट

## ३१ डिसेंबरपर्यंत अंतिम संधी

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगर पालिकेच्या वतीने शहरातील सर्व मालमत्ता धारकांना महत्त्वाचे आवाहन करण्यात आले आहे. मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष सवलत योजनेअंतर्गत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत केवळ शेवटचे तीन दिवस मालमत्ता करावरील शास्ती (दंड) पूर्णतः १०० टक्के माफ करण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी मालमत्ता धारकांनी चालू वर्षाची मागणी तसेच मागील थकबाकीची संपूर्ण रक्कम एकरकमी भरणे आवश्यक आहे. अशी रक्कम भरल्यास संबंधित मालमत्ता करावरील शास्ती पूर्णतः माफ करण्यात येणार असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाने दिली आहे.



महानगरपालिकेच्या महसूलवाढीसाठी तसेच नागरिकांना वेळेत करभरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे ज्या मालमत्ता धारकांकडे अद्याप कर थकबाकी आहे, त्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन अंतिम तारखेपूर्वी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे की, ३१ डिसेंबर २०२५ नंतर शास्तीवर १०० टक्के सूट दिली जाणार नाही, तसेच त्यानंतर केवळ ७५ टक्के शास्ती सवलत लागू राहील. त्यामुळे नागरिकांनी कोणताही विलंब न करता महानगरपालिकेच्या कर संकलन केंद्रांवर किंवा अधिकृत ऑनलाइन माध्यमांद्वारे तात्काळ करभरणा करावा, असेही नमूद करण्यात आले आहे. करभरणा केल्यास शहरातील विविध विकासकामांना गती मिळेल तसेच नागरिकांच्या भविष्यातील अडचणी टाळता येतील. विशेषतः व्यापारी मालमत्ता धारक, गृहसंकुले, निवासी व अनिवासी मालमत्ता धारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# नामनिर्देशनपत्रे छाननी प्रक्रिया ३१ डिसेंबरपासून

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सध्या वेगात सुरु असून उमेदवारांच्या नामनिर्देशनाचा टप्पा अंतिम टप्प्यात आला आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी उद्या मंगळवार, ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आला आहे.

निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या सर्व उमेदवारांनी विहित नमुन्यातील नामनिर्देशनपत्रे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे निर्धारित वेळेत सादर करणे आवश्यक आहे. निर्धारित वेळेनंतर सादर करण्यात आलेली नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.त्यानंतर प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून करण्यात येणार आहे. छाननी प्रक्रिया संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.

# हव्याप्र मंडळाच्या डिसीपीई महविद्यालयाचा हिंदी विश्वविद्यालयाशी शैक्षणिक करार



**अमरावती/का.प्र.**

भारतीय पारंपारीक व आधुनिक खेळांचे गुरूकुल असलेले श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या (स्वायत्त) डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयासोबत नुकताच हिंदी विश्वविद्यालय वर्धा ने शैक्षणिक करार केला आहे.

या अंतर्गत दोन्ही संस्थांच्या विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यापक वर्गासाठी शारिरिक शिक्षण, क्रीडाशास्त्र, योग, आरोग्य आणि समग्र व्यक्तिमत्त्व विकास क्षेत्रात संयुक्त कार्यक्रम, कार्यशाळा, सेमिनार, संशोधन प्रकल्प आणि प्रशिक्षण आदी शैक्षणिक उपक्रम राबविल्या जाणार आहेत.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, डिसीपीई चे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, परीक्षा नियंत्रक डॉ. विजय पांडे तर हिंदी विद्यापीठ वर्धाकडून कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांच्या विशेष उपस्थितीत कुलसचिव कादर नवाज खान यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी तर मंडळच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशनतर्फे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांनी करारावर स्वाक्षरी केली.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या १३ गोवंशांची सुटका

## अंदाजे २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बेलोरा/वार्ताहर**

सहा चारचाकी वाहनांमध्ये निर्दयतेने कोंबून गोवंशांना कत्तलीसाठी नेण्यात येत होते; परंतु गुप्त माहितीवरून पोलिसांनी काबरा हायस्कूलजवळ नाकाबंदी करून सहाही वाहनांना ताब्यात घेऊन त्यामधून १३ गोवंशांची सुटका केली, तसेच बाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

२८ डिसेंबररोजी चांदूरबाजार पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, मोर्शी चांदूरबाजार मार्गावरून गोवंशाची अवैध वाहतूक होत आहे. या माहितीवरून सहा. पोलिस निरीक्षक उल्हास राठोड व त्यांचे पथक यांनी मोर्शी रोडने गस्तीवर जावून काबरा हायस्कूलजवळ नाकाबंदी केली. या नाकाबंदीमध्ये पोलिसांनी आरोपी चालक सौरव गुणवंतराव रबडे (२५) व मालक अंकुश चंपतराव खवसे दोघेही रा. मूर्ती ता. काटोल यांच्या



ताब्यातून टाटाएस क्र. एमएच ०४ एफयू ८९९६ मधून २ बैल किंमत अंदाजे ५० हजार रुपये तसेच दुसरे वाहन टाटाएसई क्र. एमएच ०४ सीक्यू ०३९ चा चालक अनिल लिलाधर मुंदे (५२) रा. मूर्ती ता. काटोल याच्या वाहनातून दोन बैल किंमत अंदाजे ५० हजार रुपये, तसेच चंपतराव खवसे यांच्या मालकीची बोलेरो पीकअप क्र. एमच ४० सीडी १५२९ मधून दोन बैल किंमत अंदाजे ५० हजार रुपये व त्याचा चालक अंकुश खवसे याला ताब्यात घेतले. चौथे वाहन टाटाएसई क्र. एमएच ०४ एफजे २३१६ चाचालक तौसीफ अहमद अब्दुल मुनाफ (२५) रा. फरीद कॉलनी मोर्शी याच्या वाहनातून एक गाय व एक गोन्हा किंमत अंदाजे ३० हजार रुपये, पाचवे वाहन टाटाएसई क्र. एमएच २७ एक्स ८४५० चा चालक निखिल अशोकराव शिनगारे (२७) रा.येरला ता.मोर्शी याच्या वाहनातून दोन गो-हे किंमत अंदाजे ४० हजार रुपये व सहावे वाहन क्र. एमएच ४८ एजी ५३८५ चा चालक राजेंद्र मधुकर वानखडे (४२) रा. चिखलसावंगी ता. मोर्शी यांच्या वाहनातून १ बैल व १ गोन्हा किंमत अंदाजे ५० हजार रुपये असे एकूण २ लाख ७० हजार रुपयांची जनावरे व १८ लाख रुपये किमतीची वाहने असा एकूण २० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेऊन सर्व आरोपीविरुध्द गुन्हे दाखल केले आहे.

## मिलिंद चौधरी यांचे निधन

**कुऱ्हा/वार्ताहर**



अंजनवती येथील अंगणवाडी सेविका कमलाबाई भास्करराव चौधरी यांचा मुलगा मिलिंद भास्करराव चौधरी यांचे वयाच्या ४३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# कोरम अपूर्ण असताना पार पडली मासिकसभा

## मालखेड (रेल्वे) ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

ग्रामपंचायतच्या अधिनियमानुसार दरमहा मासिक सभेचे आयोजन केल्या जाते. याकरिता सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, सदस्य यांची उपस्थिती कायदेशीररीत्या मासिक सभेला असणे अनिवार्य आहे; मात्र २९ ऑक्टोबर २०२५ ला मालखेड रेल्वे ग्रामपंचायतने बोलावलेल्या मासिक सभेत हा कोरम पूर्ण नसतानाही बेकायदेशीरपणे मासिक सभेचे आयोजन करणे म्हणजे अधिनियमांचे उल्लंघन असून ग्रामपंचायतने चालविलेला हा भोंगळ कारभार म्हणावा लागेल.

२० ऑक्टोबर २०२५ ला स्थानिक ग्रामपंचायतने मासिक सभेचा ठराव मंजूर करून नोटीस जाहीर केली. यानुसार २९ ऑक्टोंबर २०२५ ला मासिक सभा बोलविण्यात आली. या सभेला ग्रामपंचायतच्या ११ सदस्यांपैकी ५ सदस्य हजर होते. ग्रामविकास अधिकारी व इतर ६ सदस्यांची अनुपस्थिती होती. मासिक सभेकरिता हा कोरम अपूर्ण असल्याने, सभा तहकूब न करता सभेचे प्रोसिडींग सरपंचांनी ग्रामसेवकांच्या हस्ताक्षराने लिहून घेतले. तेव्हा ही मासिक सभा बेकायदेशीर असून या सभेला इतर सदस्यांनी मंजुरी दिली नाही. पुढे २४ नोव्हेंबर २०२५ ला झालेल्या मासिक सभेत २९ ऑक्टोबरला बेकायदेशीरित्या झालेल्या मासिक सभेचे प्रोसिडींग वाचून दाखविल्याने संबंधितांवर कार्यवाही करण्याची मागणी होत आहे. ग्राम विकास अधिकारी शंकर थोरवे हे मुख्यालयी राहत नसून ग्रा.पं. च्या कारभारावर त्याचे दुर्लक्ष आहे, तसेच त्यांचे हस्ताक्षर ओळखायला येत नसल्याने आर्थिक व्यवहारात अडथळे येत असल्याचे सदस्यांमध्ये बोलल्या जात आहे.

ग्रामपंचायतीच्या या बेकायदेशीर कारभाराची व ग्राम विकास आधिकाऱ्याच्या कामाची दखल घेत गटविकास अधिकारी पं. स. चांदूररेल्वे यांनी याबाबत कार्यवाही करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य विनोद निचत व प्रणिता डकरे यांनी एका लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

# नगराध्यक्ष रुपाली माथने यांचा न.प कार्यालयामध्ये प्रथम प्रवेश

**अचलपूर/वार्ताहर**

नगर परिषद नगराध्यक्ष म्हणून भाजपा पक्षाचे रुपाली अभय माथने यांचा आज ३० डिसेंबर रोजी अचलपूर न.प कार्यालया मध्ये पहिल्यांदा प्रवेशाच्या औचित्यावर अचलपूर मतदार संघाचे आ.प्रवीण तायडे सह भाजपा पक्षाचे नेते मंडळी चा उपस्थितीत रोजगार निर्मिती व्हावी यासाठी दीव्यांग बांधवांना तीन चाकी ई - बाईकचे वाटप होणार आहे.



यामुळे न. प कार्यालयात नगराध्यक्ष म्हणून पहिल्यांदा प्रवेश करणाऱ्या रुपाली माथने यांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.यावेळी विविध भागात दौरा करून नागरिकांशी संवाद साधत समस्या जाणून घेतल्या आहे .त्यांचे विविध प्रभागात नागरिकांनी स्वागत व सत्कारही केला.यावेळी ५ दिव्यांग बांधवांना तीन चाकी ई बाईक चे वाटप केले जाणार आहे.यावेळी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,भाजपा पक्षाचे विनोद वाघ,भाजपा पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रभूदास भिलावेकर,रविराज देशमुख ,गजानन कोल्हे,महामंत्री सुधीर रसे,नयना जोशी,भाजयुमो जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे आदी उपस्थितीत राहणार आहे. स्व खर्चातून आज ५ दीव्यांग बांधवांना तीन चाकी ई बाईक चे वाटप केले जाणार असून आगामी एका वर्षात ५० दीव्यांग बांधवांना तीन चाकी ई बाईकचे वाटप करणार असल्याचा संकल्प असल्याचे मत नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी व्यक्त केला.

# आपण भाषा गमावलेला समाज निर्माण केला-डॉ.दीपक पवार

**अमरावती/का.प्र.**

आपली भाषा प्रचंड जुनी असली तरी आपल्या भाषेबद्धल कोणालाच काही पडलेले नाही.किंबहुना आपली भाषा गमावलेला समाज आपण गेल्या काही वर्षात निर्माण केला असून मराठी भाषेचा विचार केल्याशिवाय महाराष्ट्र धर्माचा विचार करता येत नाही, असे प्रतिपादन मुंबई येथील भाषा अभ्यासक व संशोधक डॉ.दीपक पवार यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवात आयोजित 'डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते.या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे होते. या व्याख्यानाला आयोजन समितीचे अध्यक्ष ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर व सचिव प्राचार्य डॉ.अंबादास कुलट प्रामुख्याने उपस्थित होते.'महाराष्ट्र धर्म'या विषयावर व्याख्यान देताना डॉ.दीपक पवार पुढे म्हणाले की, मराठे हा शब्द प्रदेश वाचक आणि भूगोल वाचक म्हणून वापरल्या गेला असून या प्रांतातला प्रत्येक माणूस मराठा आहे व या प्रदेशाची भाषा मराठी आहे हा दृष्टीकोन बाळगणे आवश्यक आहे.

# प्राथमिक शिक्षकांवर मानसिक व शारीरिक ताण

## विचारमंथनाची गरज;शासनाने अतिरिक्त कामे देऊ नये

**अमरावती/का.प्र.**

प्राथमिक शिक्षण हे गुणवत्तापूर्ण, सातत्यपूर्ण व सर्वकष असायलाच हवे यात शंकाच नाही! परंतु, अध्यापनाच्या कामाशी संबंधित प्राथमिक शिक्षकांना, अध्यापनाविरहित करावे लागणारे अतिरिक्त काम, अशैक्षणिक काम, कुटुंब आणि समाजाप्रतीचे योगदान, तक्रारींवर वारंवार द्यावी लागणारी उत्तरे, अधिकाऱ्यांच्या मर्जीने तालुका, जिल्हा गुणांकनात यावा या अट्टाहासापाई भरून घेतली जाणारी अनेक लिंक्स, पोर्टल्सवरील काम तसेच प्राथमिक शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या अतिरिक्त, अशैक्षणिक कामांमुळे शिक्षकांचा मानसिक ताण वाढत आहे का? या प्रश्नावर आता विचारमंथनाची आवश्यकता आहे.

गेल्या काही महिन्यात काही प्राथमिक शिक्षकांना अचानक हृदयविकाराने गाठले. तसेच अनेक शिक्षक उच्च रक्तदाब, मधुमेह, स्ट्रेस आदी विकारांनी त्रस्त आहेत. त्याची कारणे व्यक्तीपरत्वे निरनिराळी असू शकतात. परंतु पेशाच्या दृष्टीने विचार करता, ऑनलाईन माहित्यांचा फार्स, तात्काळ माहितीच्या मागण्या, अध्यापन, निवडणूक कामकाज, स्थानिक सुसंवाद राखण्याची गरज, ऊंऊं परीक्षेची सक्ती, या परीक्षेत पास होईल की नाही याची सततची काळजी यांमुळे प्राथमिक शिक्षक आपले आरोग्य गमावत आहेत.सततचा ताण त्यांना मृत्युच्या दिशेने घेऊन जात आहे का? असा प्रश्न आता अनेक




शिक्षकांना पडू लागले आहेत.

शिक्षकांच्या वाढीव कामाबद्दल शिक्षक संघटनांनी अनेकदा आवाज उठवला आहे आणि उठवत देखील आहेत.काही वर्षापूर्वी शिक्षकाची नोकरी ही सुखवस्तू नोकरी समजली जात होती. पंचवीस ते तीस वर्षांच्या कालावधीत जसे अनेक क्षेत्रात बदल झाले तसे शिक्षण क्षेत्रात देखील झाले. अनेक बदल झाले. बदलती शिक्षण धोरणे, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, सोशल मिडीयाचा उदय, कामकाजाचे ऑनलाईनकरण, ग्रामविकासाच्या विविध कार्यक्रमात शिक्षकांची वाढती भूमिका, शासन स्तरावरून नित्य नवे येणारे आदेश आणि शाळांत साजरे करण्यात येणारे दिवस, सप्ताह, पंधरवडे यांचे अलीकडील काळात वाढलेले प्रमाण! एकाच शैक्षणिक वर्षात राबवावे लागणारे शेकडो उपक्रम, त्यांच्या फाईल्स, अहवाल लेखन, घ्याव्या लागणाऱ्या सभा, त्यांचे इतिवृत्त, पोषण आहाराची माहिती, ऑनलाईन उपस्थिती, यांमुळे शिक्षक मेटाकुटीला आले आहेत. याचाच परिणाम म्हणून आजकाल शिक्षक होण्याकडे वीस – तीस वर्षांपूर्वी असणारा कल दिसून येत नाही.

### प्रतिक्रिया

- शिक्षण क्षेत्रात सततचा होणारा लिंक अटॅक शिक्षकांसाठी जीवघेणा ठरत आहे. तात्काळ, अतिमहत्वाचे, कालमर्यादित, ताबडतोब इत्यादी गोंडस शब्दांच्या नावाखाली प्रशासन शिक्षकांना विद्यार्थ्यांपासून दूर लोटत आहे. आमची नेमणूक नक्की कशासाठी? विद्यार्थ्यांचे हित जोपासण्यासाठी की प्रशासकीय माहिती पुरवण्यासाठी? असा प्रश्न शिक्षकांना पडला आहे.मागच्या काही दिवसात जवळपास पाच ते सहा शिक्षकांचा नाहक बळी गेला आहे. ऑनलाइन कामाच्या वाढत्या ताणाच्या संदर्भात जर प्रशासनाने योग्य व विश्वासहार्य भूमिका घेतली नाही तर, संपूर्ण जिल्ह्यात सर्व शिक्षक संघटनेमार्फत तीव्र आंदोलन उभारण्यात येईल.

**-राजेश सावरकर,**
राज्य प्रसिध्दी प्रमुख,प्राथमिक शिक्षक समिती.

- ऑनलाईन कामे, ॲपचा वाढता वापर यांमुळे शिक्षकांवर दडपण येत आहे. काम आत्ताच पूर्ण हवे अशा आदेशामुळे त्यात अधिकच वाढ़ होत आहे. ऑनलाईन कामाची जबाबदारी शिक्षकांवरून काढावी. आता तर परीक्षा देखील ऑनलाईन घ्यायला सुरुवात केली आहे. शाळांवर ऑपरेटर नेमायला हवेत. दहा-दहा वर्षांची ऑडिट माहिती एकत्र भरून घेतली जाते. हे थांबायला हवे.

**–प्रविणा कोल्हे,** राज्य महीला प्रतिनिधी शिक्षक समिती

## संक्षिप्त

### आज चांदूररेल्वेत भाकप कार्यालय उद्घाटन व शताब्दी समारोह

चांदूर रेल्वे-भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेला २०२५ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत असून, या ऐतिहासिक शताब्दी वर्षानिमित्त चांदूररेल्वे येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नवीन कार्यालयाचा उद्घाटन सोहळा व शताब्दी समारोह आयोजित करण्यात आला आहे. आज ३० डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता पंचायतसमिती समोरील भाकप कार्यालयात हा कार्यक्रम होणारआहे, अशी माहिती पत्रकार परिषदेतून देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाकपचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. तुकाराम भस्मे राहणार असून, उद्घाटन कॉ. पी. संदोष कुमार (खासदार, राज्यसभा - केरळ) यांच्याहस्ते होणार आहे, तसेच मार्गदर्शन कॉ. डॉ. भालचंद्र कानगो (राष्ट्रीय सचिव, भाकप नवी दिल्ली) करणार आहेत. कार्यक्रमाला भाकप महाराष्ट्र राज्याचे सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे, सहसचिव कॉ. श्याम काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. शताब्दी समारोहाच्या निमित्ताने दुपारी रॅलीचे आयोजनसुध्दा करण्यात आले असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास हारार्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ही रॅली चंद्रशेखर आझाद पुतळामार्गे जुना मोटर स्टँड येथे येईल. त्यानंतर दुपारी ३ वाजता जाहीर सभेचे आयोजन तहसिल कार्यालयासमोर करण्यात आले आहे.

### वैज्ञानिकांनी तालुकास्तरीय प्रदर्शनीमध्ये पटकावला द्वितीय क्रमांक



**लेहेगाव**-नुकत्याच संपन्न झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत साफल्य विद्यालय, सावरखेड पिंगळाई चा द्वितीय क्रमांक सावरखेड साफल्य विद्यालयातील बालवैज्ञानिकांनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. या प्रदर्शनीत विद्यालयातील सावरी वानखडे व अमितेश आठवले यांनी 'ऑटोमॅटिक ओव्हरलोड डिटेक्टर' ही प्रतिकृती सादर केली होती. याकरिता या विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक नरेंद्र भि. सुळे व गणित शिक्षक श्रीराम गुंजीटे यांचे मार्गदर्शन लागले. मोर्शी पं. स.चे गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे यांनी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. मुख्याध्यापक प्रशांत आजनकर यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे व विज्ञान शिक्षकांचे कौतुक केले. तसेच साफल्य ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजय मडके,उपाध्यक्ष डॉ. विनोद भोजने, सचिव संजय मंगळे, कोषाध्यक्ष अनिल भोजने, सहसचिव अरुण पातुरकर, शाळा समितीचे सदस्य निचीत, शाळा समितीचे सदस्य व ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष कैलाससिंह ठाकूर इत्यादींनी द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### प्रा. सचिन पंडित यांना पीएच. डी.



**अमरावती**-शैक्षणिक क्षेत्रातील नामवंत शैक्षणिक संस्था म्हणून सर्वत्र परिचित असलेलीश्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती चे प्रशासकीय अधिकारी प्रा. सचिन पंडित यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, संलग्नित विदर्भ शासकीय ज्ञान विज्ञान संस्था अमरावती, येथून डॉ. जयंत चौधरी, इंग्रजी विभाग GVISH. Amravati यांच्या मार्गदर्शनात इंग्रजी या विषयात 'अ क्रिटिकल स्टडी ऑफ जेंडर इक्वलिटी इन द सिलेक्ट नोवेल्स ऑफ सुधा मूर्ती' या प्रबंधावर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती येथून डॉक्टर पदवी प्राप्त केली प्रा सचिन पंडीत हे उत्कृष्ट संघटक आणि प्रशासक असून चांगले प्रशिक्षक म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांचे 'बिझिनेस कम्युनिकेशन'पुस्तक प्रकाशित झाले असून त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या यशाचे श्रेय ते त्यांचे GVISH येथील प्राध्यापक, मित्र परिवार, कुटुंबीय,आई-वडील त्यांची पत्नी व मुलगा तसेच वरिष्ठ आचार्य डॉ.कमलताई रा. गवई व दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टअमरावतीच्या अध्यक्ष कीर्ती अर्जुन, राजेश अर्जून , धरम अर्जून, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस व श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट परिवाराला देतात. त्यांना पीएचडी मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून परिक्षा व मूल्यांकन संचालक डॉ. नितीन कोळी, प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, प्राचार्य डॉ.मल्लू पडवाल, प्राचार्य डॉ. संजय देशमुख, डॉ. शीतल तायडे,प्रा. प्रीतेश पाटील,प्राचार्य पियुष चक्रपाणी, डॉ. प्रवीण वानखडे,डॉ. नवल पाटील, डॉ. रवींद्र तायडे, डॉ. पंडित राठोड प्रा. ज्ञानेश्वर गटकर यांच्या सह श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट मधील प्राध्यापक शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि मित्रपरिवाराने अभिनंदन केले आहे.

### डिसीपीई द्वारे अंदमान त्सुनामी बळींना श्रद्धाजंली

**अमरावती**-६ डिसेंबर २००४ रोजी अचानक आलेल्या भीषण त्सुनामीने प्रलयकारी रूप धारण करत संपूर्ण परिसर उद्ध्वस्त केला. या नैसर्गिक आपत्तीत अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण गेले, तर कोट्यवधींची वित्तहानी झाली. त्या भयावह घटनेची आठवण आजही अंगावर शहारा आणणारी आहे. या दिवसाचे स्मरण करीत मंडळाच्या डीसीपीई महाविद्यालयाच्या वतीने भव्य कॅन्डल मार्चचे आयोजन करण्यात आले होते. या कॅन्डल मार्चमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी सहभागी होत अंदमान मृतांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन महाविद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांनी हातात मेणबत्त्या घेऊन विद्यार्थ्यांनी शांततेत मार्गक्रमण करत मानवतेचा संदेश दिला. कॅन्डल मार्चदरम्यान डिसीपीई मध्ये शिकणाऱ्या अंदमान येथील विद्यार्थ्यांनी त्या भयावह घटनेची त्यांनी पाहिलेली व अनुभवलेली माहिती उपस्थितांना दिली. आज अंदमान पुर्वस्थीतीमध्ये असून प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. मात्र, त्या घटनेमुळे शांतता, मानवता आणि एकात्मता याचे महत्व मानवी समाजासाठी, देशासाठी महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगीतले. या मार्चमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाली असून, इतिहासातील त्या काळ्या दिवशी प्राण गमावलेल्या अंदमान येथील बळींना सामुहिक भावपुर्ण श्रद्धाजंली अर्पण करण्यात आली.

# भूतकाळातून बोध, भविष्याकडे वाटचाल

नवर्ष म्हणजे केवळ कॅलेंडरवरील तारीख बदलण्याचा क्षण नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा, संकल्पांचा आणि नव्या आशांचा प्रारंभ असतो. सरत्या वर्षाला निरोप देत आणि येणाऱ्या वर्षाचे स्वागत करताना आपण काय कमावले, काय गमावले आणि पुढे काय साध्य करायचे याचा विचार होणे आवश्यक ठरते. विशेष म्हणजे २०२६ हे वर्ष राज्यासाठी 'भरती वर्ष' म्हणून घोषित झाल्याने सुशिक्षित बेरोजगारांच्या मनात नव्या संधींची आशा पल्लवित झाली आहे. त्यामुळे हे नववर्ष उत्सवापुरते न राहता रोजगार, जबाबदारी आणि परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्याचे प्रतीक ठरणार आहे. सन २०२६ हे वर्ष महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'भरती' वर्ष म्हणून ५ ऑक्टोबर २०२५ रोजी घोषित केले आहे. केव्हा एकदा २०२६ साल सुरू होऊन भरती होते असे राज्यातील सुशिक्षित बेकारांना वाटत आहे. त्यामुळे राज्यामधील सुशिक्षित बेरोजगारसुद्धा नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तयार आहेत. नवीन वर्षामध्ये रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होणार आहेत. त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत करताना सुशिक्षित बेरोजगारांच्या दृष्टिकोनातून भरती वर्ष म्हणून नववर्षाचे स्वागत केले जाणार आहे. आपण अजून चार दिवसांनी सरत्या वर्षाला 'गुड बाय' आणि नववर्षाला 'वेलकम' करणार आहोत. असे आपण दरवर्षी करत असतो. मात्र त्यातून आपण काय शिकलो याचा आपण सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे. नववर्षाच्या पहिल्या दिवशी आपण आनंद व्यक्त करीत असताना मागील वर्षात माझे काय चुकले याचे प्रत्येकांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

आज आपला देश ७९ व्या स्वातंत्र्य वर्षांत वावरताना इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला तरी देशात खरंच आपण स्वातंत्र झालो का? याचा विचार सुद्धा होणे आवश्यक आहे. असे असले तरी बऱ्याचवेळा मागील वर्षामध्ये आलेली संकटे विसरून नवीन आठवणी जतन करीत असतो. अनेक लोक घरामध्ये रोषणाई व घराच्या समोर फटाक्यांची आतषबाजी करतात. म्हणे झाले गेलं विसरून नवीन जीवनाला सुरुवात करूया. महत्त्वाची बाब म्हणजे मागील वर्षाचा अनुभव गृहीत धरून, नव्या वर्षात नवीन उद्दिष्टे लक्षात घेऊन नवीन जीवनाला सुरुवात करू शकतो. यातून नवीन संधी मिळून नवीन दृष्टिकोन स्वीकारला जातो. म्हणजे आपल्या जीवनात सुधारणा करण्याची हीच वेळ असते. यातूनच नवीन प्रवास करण्याची अचूक वेळ मिळते. तेव्हा प्रत्येकांनी नवीन वर्षाची सुरुवात करताना आपल्या मागील वर्षातील चुका सुधारून नवीन वर्षात आपल्याला कसा फायदा होईल याचा शोध घेणे गरजेचे असते. यातूनच आपली प्रगती होत असते. नवीन वर्ष, नवीन सुरुवात असे जरी म्हणालो तरी यातून परिवर्तन होत असते. यासाठी नवीन संकल्प अतिशय महत्त्वाचा असतो. यातूनच विकासाची नवीन संधी प्राप्त होत असते. यात काही उद्दिष्ट्ये लक्षात घेता प्राधान्यक्रमानुसार सोडवू शकतो. यातूनच आपला उत्साह वाढण्यास मदत होते. आपल्या मनातील भीती दूर होऊन चांगल्या संधीचा मार्ग मोकळा होतो. त्यामुळे आपण नवीन वर्षानिमित्ताने जी उद्दिष्ट्ये डोळ्यांसमोर ठेवतो त्याविषयी आपला आत्मविश्वास वाढून आपण प्रेरित होतो. नवीन वर्षाचे स्वागत करून नवीन वर्षाची सुरुवात करीत असतो तेव्हा मागील वर्षाचा विचार करणे गरजेचे आहे. आपण सर्वजन विविध क्षेत्रांत काम करत असताना आपण केलेले




चांगले काम आणि काही कामात आलेले अपयश त्याचा आढावा घ्यावा. तसेच आपण मागील वर्षी कोणकोणती कामे केली अथवा नाही केली याचे चिंतन करून सुधारणा करण्यात याव्यात. आता वर्ष सुरू झाल्यावर आपली उद्दिष्टे निश्चित करून विविध क्षेत्रांनुसार वर्गवारी करावी. त्यानंतर त्यांची क्रमवारी लावून त्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. असे टप्प्याटप्प्याने करावे. म्हणजे वर्षभरामध्ये निश्चित केलेली उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली याची सहज कल्पना येते. याचा परिणाम पुढील काळात विकासाची दिशा ठरवू शकतो. असे असले तरी प्रत्येक उद्दिष्टांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. यामुळे आपल्या प्रगतीची कल्पना येते. तेव्हा आपल्याला प्रेरणा कशी मिळेल या दृष्टिकोनातून काम करावे.

जेणेकरून आपण जी उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत त्या संदर्भात सकारात्मक दृष्टिकोन असायला हवा. आपले लक्ष विचलित होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. यासाठी चांगल्या लोकांच्या सहवासात राहणे, नियमितपणे व्यायाम, मान्यताप्राप्त पुस्तकांचे वाचन करावे. इतकेच नव्हे तर आपल्या मनाची सुद्धा तयारी असणे आवश्यक आहे.

एखादा कठीण वाटणारा विषय कसा सोपा करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. आपण ठरविलेली उद्दिष्टे इतरांना सुद्धा सांगा. उद्दिष्टांच्या प्रगतीचा वेळच्या वेळी आढावा घ्या. ज्या उद्दिष्टांमध्ये आपण यशवंत झालो असू त्यांचा छोटेखानी यशस्वी विजय म्हणून साजरा करा. यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊ नये. नवीन वर्ष म्हणजे अंतिम परीक्षेचे वष. 'त्यामुळे होणारी बोर्डाची परीक्षा विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा त्यांनी आपले लक्ष अभ्यासाकडे केंद्रित करावे. आता २०२६ या नवनिर्वाचित वर्षात पदार्पण करीत असताना प्रत्येकांनी लक्षात ठेवले पाहिजे की, नवीन वर्ष आहे तेव्हा मागील वर्षातील काही कटू अनुभव आलेले असतील, तर त्यांना बाजूला ठेवून परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करूया. भूतकाळ विसरून भविष्यकाळाचा विचार करूया. हे वर्ष भरती वर्ष असून वर्षभरात कशाप्रकारे भरती केली जाणार आहे याची सुद्धा सर्वांना कल्पना येणार आहे. तेव्हा भरती सत्र चालू असताना कोणावर अन्याय होणार नाही यावर करडी नजर ठेवायला हवी.

कारण लोकशाहीप्रधान भारत देशाचे आपण सुजाण नागरिक आहोत याची जाणीव सर्वांना आहे. त्यामुळे आपला २०२६ या वर्षातील प्रवास सुखद होण्यासाठी वचनबद्द होऊ या.

**रवींद्र तांबे**

# नववर्ष : स्वागत, संकल्प आणि अपेक्षा !

नवर्ष गुरुवारी येणार आहे.ती गेल्या काही दिवसांपासून जिची आतुरतेने वाट पाहिली जाते आहे ती एरव्ही ड्राय डे म्हणून नकोशी वाटणारी, पण पगाराचा दिवस म्हणून हवीहवीशी वाटणारी ती-पहिली तारीख ! यावेळी ही पहिली तारीख केवळ नवीन महिना नाही, तर नवीन वर्ष २०२६ घेऊन येत आहे. म्हणजेच २१ व्या शतकाने आता सव्वीसाव्या वर्षात पाऊल टाकले आहे. या निमित्ताने सरत्या वर्षाचा मागोवा, नववर्षाचे स्वागत, त्याकडून असलेल्या अपेक्षा आणि नववर्षात केले जाणारे संकल्प- या साऱ्यांवर थोडक्यात, पण विचारपूर्वक नजर टाकणे अपरिहार्य ठरते.

**सरत्या २०२५ वर्षाचा आढावा**

२०२५ हे वर्ष जागतिक व राष्ट्रीय पातळीवर अनेक अर्थांनी संक्रमणाचे वर्ष ठरले. भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बाबतीत आपली वाटचाल अधिक भक्कम केली. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, डिजिटल शिक्षण आणि स्टार्ट-अप संस्कृती यांचा प्रभाव सर्वसामान्यांच्या आयुष्यात अधिक ठळकपणे जाणवू लागला. मात्र, दुसरीकडे जागतिक पातळीवर युद्धसदृश परिस्थिती, हवामान बदलाचे वाढते परिणाम, नैसर्गिक आपत्ती, तसेच महागाई व बेरोजगारी सारख्या समस्या कायम राहिल्या. समाजमाध्यमांच्या अतिवापरामुळे मानसिक आरोग्याचा प्रश्न अधिक प्रकर्षाने पुढे आला.२०२५ ने आपल्याला हे स्पष्टपणे शिकवले की विकास आणि विवेक यांची सांगड घातल्याशिवाय प्रगती टिकाऊ ठरत नाही.

**नववर्षाचे संकल्प : आशेचा नवा डाव**

डिसेंबर संपत आला की मनात




नकळत एक नवा हिशोब सुरू होतो.गेले ते गेले आता नवं काहीतरी करूया! अशी उमेद नववर्षाच्या उंबरठ्यावर उभी राहते. आरोग्य सुधारणा, नियमित व्यायाम, तणावमुक्त जीवन, कुटुंबासाठी वेळ, वाचन, सामाजिक सलोखा, आणि पर्यावरणपूरक सवयी-हे संकल्प दरवर्षी नवे वाटतात, पण त्यांचे महत्त्व कधीच जुने होत नाही.

Ipsos या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षण संस्थेने विविध देशांतील नागरिकांमध्ये केलेल्या अलीकडील अभ्यासानुसार, २०२६ मध्येही लोकांचे संकल्प 'स्वतःच्या आरोग्यापासून समाजाच्या आरोग्यापर्यंत' या प्रवासाभोवतीच फिरत राहतील, असे चित्र दिसते. वैयक्तिक प्रगतीबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढते आहे, ही दिलासादायक बाब आहे.

**२०२६ कडून अपेक्षा**

घ्ंदे आणि ऍ्रँ यांच्या सर्वेक्षणांतून २०२६ बाबत जगभरातील लोकांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा आणि चिंता काहीशा समान स्वरूपाच्या दिसतात. त्या पुढीलप्रमाणे:

बहुतांश लोकांना हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्र होतील, असे वाटते.

महागाई ही समस्या पूर्णतः आटोक्यात येणार नाही, अशी भावना अनेकांची आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) शिक्षण, उद्योग, आरोग्य आणि प्रशासनात अधिक खोलवर शिरकाव करेल, असा कयास व्यक्त केला जातो.

डिजिटल व्यवहार, डिजिटल चलन आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व वाढेल, अशी अपेक्षा आहे.

नवीन आजार, मानसिक तणाव आणि जीवनशैलीजन्य रोग याबाबत चिंता कायम आहे.

आंतरराष्ट्रीय संघर्षांपैकी काही निवळतील, पण पूर्ण शांतता लगेच प्रस्थापित होईल, अशी आशा मर्यादित आहे.

तरुण पिढीमुळे नवीन विचार, सहिष्णुता आणि नवकल्पनांचा प्रभाव वाढेल, असा आशावादही दिसतो.

ही आकडेवारी आणि मतप्रवाह सूचित करतात की २०२६ हे वर्ष आव्हानांचेही असेल आणि संधींचेही.

**विधायक बदलांसाठी पुढाकार**

नववर्ष हे केवळ कॅलेंडर बदलण्याचे निमित्त नसते; ते स्वतःकडे आणि समाजाकडे नव्या नजरेने पाहण्याची संधी असते.पर्यावरणस्नेही सवयी, विवेकी तंत्रज्ञान वापर, आरोग्याबाबत जागरूकता, आणि सामाजिक सलोखा, हे सर्व घटक जर आपण प्रत्यक्ष आचरणात आणले, तर बदल शक्य आहेत.शासन, संस्था आणि नागरिक, सर्वांनी मिळून महागाई, आरोग्य आणि रोजगार यांसारख्या प्रश्नांवर ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.कारण भविष्य आपोआप उज्ज्वल होत नाही; ते घडवावे लागते.नववर्ष २०२६ चे स्वागत करताना,सकारात्मकता, समर्पण आणि सामाजिक जाणीव या तीन मूल्यांचा संकल्प आपण सर्वांनी करुया.हे वर्ष वैयक्तिक समाधानाबरोबरच सामूहिक प्रगतीचे ठरावे, हीच मनापासून अपेक्षा!

**प्रा. विजय कोष्टी**

**संपूर्ण २०२५ या वर्षात जादूच्या दिव्यातून गुंतवणूकयोग्य अनेक समभाग बाहेर पडले! या संपूर्ण वर्षात भांडवल बाजाराने अनेक आव्हानांशी सामना केला, अनेक चढउतार पाहिले. त्यातून तावून-सुलाखून शेअर बाजार सुखरूप बाहेर पडला आणि त्याने नवनवी उंचीही गाठली.**

# नववर्षात लागेल तेजीची चाहूल

विद्यमान वर्षात बाजाराने लोकांना काय दिले याचा विचार मनात आला. वर्षभरात बाजाराने अनेक आव्हाने स्वीकारली: टेरिफ, सिंदूर ऑपरेशन, जागतिक दबाव, अर्थजगतात होणारे आव्हानात्मक बदल, परदेशी गुंतवणूकदारांचा भागविक्रीचा जोर, रुपयाचे अवमूल्यन अशा नानाविविध गोष्टींची दखल घेत वर्षातील तिमाहीतील आणि चालू महिन्यातील अखेरच्या शुक्रवारी सर्वोच्च पातळीवर नकारात्मक पण सावध प्रतिक्रीया दाखवत मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचे निर्देशांक अनुक्रमे ८५,०४१ (-३४२) व २६,०४२ (-९९) असे बंद झाले.




२०२५ मध्ये गुंतवणूकदारांना कधीकधी चांगला परतावा मिळाला; पण बऱ्याचवेळी गुंतवणूकदारांना संयम दाखवणे भाग पडले. तरीही गुंतवणूकदारांनी नाराज व्हायचे कारण नाही. २०२१ ते २०२५ या पाच वर्षांत केलेल्या गुंतवणुकीला किती परतावा मिळाला याचा विचार त्यांनी यावेळी करावा त्यामुळे एखादे वर्ष किंवा १५-१८ महिने वाईट गेले म्हणून काळजी करण्यासारखे काही नाही. गुंतवणुकीतील सातत्य आणि संयम यापुढे तुम्ही दाखवलात तर चांगली रक्कम किंवा गुंतवणूक पुढे उभी राहील.

एकंदरीत आपल्या बाजाराकडे बघितल्यास किंवा आपल्या अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास, एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेवरून चार ट्रिलियन व्हायला आपल्याला साधारण १२ वर्ष लागली. पण पुढील १० ट्रिलियन अर्थव्यवस्था व्हायला आपल्याला फार कमी वेळ लागेल. अर्थात हा सांख्यिकी अभ्यास पटकन साधारण गुंतवणूकदारांना लक्षात येणार नाही. अर्थव्यवस्था वाढीचा वेग लक्षात घेतलात, की खरी बाजाराची गंमत तुम्हाला कळेल. गेली १२ वर्ष ही जमीन नांगरण्याची किंवा झाड लावण्याची होती आणि पुढील १० वर्ष त्याची फळे आणि मजा अनुभवन्याची आहे.

जागतिक अर्थकारण बघता यापुढे जागतिक महासत्ता हे बिरुद मिरवणारी अमेरिका कशी वाढेल हे सांगणे कठीण आहे. सध्या सोने-चांदी आणि इतर गोष्टींत होणारी वाढ हे ते स्पष्ट दाखवून देत आहेत. पण चीन, भारत, जपान आणि इतर काही देश यांची अर्थव्यवस्था ही मात्र सातत्याने वाढत राहील एवढे मात्र नक्की. अर्थात आव्हाने, संकटे, अचानक येणारे धोके या गोष्टी आल्याचे पण या देशांचे अर्थकारण नक्कीच वेगळे असेल. गुंतवणूकदारांनीसुद्धा पारंपरिक समभाग सोडून पुढील किमान १५-२० वर्ष जे समभाग आणि कंपन्या बाजारात उभ्या राहू शकतात त्यावर लक्ष केंद्रित करावे. फेब्रुवारीत येऊ घातलेला अर्थसंकल्प पुढील दिशादर्शक असेल


अशी अपेक्षा करूया. क्रयशक वाढवण्यावर देण्यात आलेला यावेळी पुन्हा भांडवली खर्चाव असेल, असा अंदाज आहे. त्यामुळे यावेळच्या अर्थसंकल्पातून पगारदार आणि मध्यमवर्गाला काही मिळेल, असा समज किंवा अपेक्षा जराही कुणी ठेऊ नये. भांडवल बाजारात परदेशी वित्तसंस्था गुंतवणूकदार परत कसे येतील, त्यात काय बदल केल्याने या क्षेत्रातील गुंतवणूक वाढेल, गुंतवणुकीचा कालावधी वाढेल यावर लक्ष द्यावे लागेल.

मध्यंतरी भारत सरकारने सार्वभौम सुवर्णरोखे विकण्यास काढले होते. त्यात मोठा आर्थिक फटका सरकारला आर्थिक स्वरूपात बसला असून तेही अर्थमंत्री कसा हाताळतात हे बघावे लागेल. पूर्वीसारखे रेल्वेचे स्वतंत्र बजेट नसल्यामुळे त्याकरिताही मोठी आर्थिक तरतूद करणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांत रेल्वे मध्ये सगळ्याच बाबतीत मोठे बदल आपण अनुभवले आहेत. रेल्वेबरोबरच संरक्षण, पॉवर बँकिंग टेक्नॉलॉजी या क्षेत्रांतही खूप बदल घडून येत आहेत आणि त्यात बदल घडवले जात आहेत. वर्षाखेरीचा आठवडा असल्यामुळे फार काही या आठवड्यात घडेल असे वाटत नाही. पण येणार २०२६ वर्ष पुढील तेजीची चाहूल दाखवत असून त्याची पायाभरणी चालू आहे. फार मोठा नाही पण गेल्यावर्षी न मिळालेला १५% ते २०% साधारण परतावा पुढील वर्षात मिळेल अशी अपेक्षा धरायला हरकत नाही. तेव्हा आपल्या देशाच्या भारताच्या चांगल्या भविष्याची अपेक्षा धरून नवीन वर्षाचे स्वागत करूया !(साभार म.टा)

**केदार ओक**

# २०२५ मध्ये मराठी चित्रपटांनी प्रेक्षकांवर केले राज्य

मराठी सिनेसृष्टीसाठी यंदाचे वर्ष अद्वितीय आणि तितकेच आव्हानात्मक ठरले. यंदाच्या वर्षी शंभरहून अधिक मराठी सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला आले; ज्यांनी केवळ प्रेक्षकांचं मनोरंजन नव्हे; तर सामाजिक आरसाही दाखवला. सिनेमाच्या संहितेतील विविधता आणि नवकल्पनांमुळे प्रेक्षक आणि सिनेमागृहातील नाळ जोडून राहिली. आर्थिक जुळवाजुळवीपासून ते थिएटर व ओटीटीवर जागा मिळवण्यापर्यंत निर्मात्यांची धावपळ पाहायला मिळाली. मराठी सिनेसृष्टीसाठी आत्मपरीक्षण, धाडसी प्रयोग आणि प्रेक्षकांच्या बदलत्या अभिरुचीची जाणीव करून देणारे हे वर्ष होते; असे जाणकार सांगतात. एका बाजूला कोकणची लोककला, अध्यात्म, निसर्गसंवर्धन यांसारखे विषय मोठ्या पडद्यावर ठळकपणे मांडले गेले, तर दुसरीकडे क्राइम थ्रिलर, हॉरर, कौटुंबिक विनोद आणि भावनिक कथा यांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केलं, बिग बजेट चित्रपट अपेक्षेप्रमाणे गाजले नाहीत, मात्र आशयप्रधान आणि मध्यम बजेट सिनेमांनी प्रेक्षकांवर




आपली छाप सोडली. २०२५चा मराठी सिनेमा 'कन्टेंट इज किंग' हे अधोरेखित करणारा ठरला.

मराठी सिनेमाचे मोठे चित्रऐतिहासिक आणि आध्यात्मिक कथांपासून ते गूढ, रहस्य, थरार, सामाजिक, हॉरर आणि विनोदी असे सर्व प्रकारचे सिनेमे आले.-दशावतार' सारख्या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर बाजी मारली, तर 'जारण', 'जिलबी', 'देवमाणूस', 'रीलस्टार' सारख्या सिनेमांनी थ्रिलर प्रकारात आपलं स्थान प्रस्थापित केलं. याचबरोबर 'फसक्लास दाभाडे', 'गुलकंद', 'सुशीला सुजित' सारख्या कौटुंबिक आणि विनोदी चित्रपटांनी प्रेक्षकांना थिएटरकडे खेचून आणलं.

**थरार, भयपटांचा वाढता प्रभाव**

यंदा थरार आणि भय हे प्रकार विशेष लक्षवेधी ठरले. 'दशावतार 'ने लोककला आणि गूढ यांची सांगड घातली, तर 'जारण'ने अंधश्रद्धा, मानसिक अस्वस्थता आणि भय यांचा प्रभावी वापर केला. 'पीएसआय अर्जुन', 'जिलबी' आणि 'असंभव' सारख्या क्राइम थ्रिलर सिनेमांनी शहरी प्रेक्षकांना आकर्षित केले. यावरून, मराठी प्रेक्षक आता केवळ कौटुंबिक किंवा हलक्याफुलक्या कथांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, हे दिसून आलं.

**कौटुंबिक विनोद आणि भावनिक कथा**

थ्रिलरच्या जोडीला २०२५मध्ये कौटुंबिक विनोद आणि भावनिक सिनेमांचीही संख्या लक्षणीय होती. 'फसक्लास दाभाडे'नं कुटुंब, नातेसंबंध आणि लग्नसोहळ्याभोवती फिरणारी गोष्ट मांडत प्रेक्षकांना आपलंसे केले. ' गुलकंद 'नं वैवाहिक आयुष्यातील गोड-आंबट अनुभव विनोदातून मांडले, तर 'सुशीला सुजित' नं बंद खोलीतील प्रसंगातून




भन्नाट कॉमेडी निर्माण केली. या सिनेमांनी हे सिद्ध केलं की, साध्या पण प्रामाणिक कथांमधूनही मोठे मनोरंजन घडू शकते.




'झापुक झुपूक', 'माझी पारथना', 'आरपार', 'सजना', ''बिन लग्नाची गोष्ट', 'साबर बोंडं', 'तू बोल ना', 'प्रेमाची गोष्ट २' सारख्या सिनेमांनी प्रेमाची अनोखी व्याख्या उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला.

**ज्येष्ठ कलाकारांची कमाल**

दिलीप प्रभावळकर (दशावतार), अशोक सराफ व वंदना गुप्ते (अशीही जमवा जमवी), महेश मांजरेकर व रेणुका शहाणे (देवमाणूस), निवेदिता सराफ (फसक्लास दाभाडे), प्रशांत दामले (मु. पो. बोंबिलवाडी)

**कलंदर कलाकारांच्या लक्षवेधी भूमिका**

भरत जाधव व सिद्धार्थ जाधव (आता थांबायचं नाय), सोनाली कुलकर्णी (सुशीला सुजीत), स्वप्निल जोशी (जिलबी), अमृता सुभाष व अनिता दाते (जारण), समीर चौघुले व सई ताम्हणकर (गुलकंद), मुक्ता बर्वे व प्रिया बापट (असंभव), मंगेश देसाई (मुक्काम पोस्ट देवाचे घर, पुन्हा शिवाजीराजे भोसले), उमेश कामत (ताठ कणा), योगेश सोमण (अभंग तुकाराम), वीणा जामकर (कुर्ला टु वेंगुर्ला), छाया कदम (सलाते सलानाते), सिद्धार्थ बोडके (देवमाणूस, पुन्हा शिवाजीराजे भोसले), ऋता दुर्गुळे व ललित प्रभाकर (आरपार), अभिनय बेर्डे (उत्तर), रिंकू राजगुरू (आशा), साजिरी जोशी (एप्रिल मे ९९), नेहा नाईक (संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई), सूरज चव्हाण (झापुक झुपूक)

**दमदार दिग्दर्शकीय पदार्पण**

सुबोध खानोलकर (दशावतार), शिवराज वायचळ (आता थांबायचं नाय), क्षितिज पटवर्धन (उत्तर), रोहन मापुस्कर (एप्रिल मे ९९), विजय कलमकर (कुर्ला टु वेंगुर्ला), रोहन कानवडे (साबर बोंडं), शशिकांत धोत्रे (सजना), जयंत सोमळकर (स्थळ), संतोष डावखर (गोंधळ)

**वादाच्या भोवऱ्यात**

ऐतिहासिक आणि श्रद्धेच्या संदर्भावर आधारित चित्रपटांभोवती वाद नवे नाहीत, मात्र अलीकडील दोन प्रकरणांनी मराठी सिनेसृष्टीत खळबळ उडवली. राष्ट्रीय पुरस्कार विजेता दिग्दर्शक राज प्रीतम मोरे याचा 'खालिद का शिवाजी' हा सिनेमा प्रदर्शनापूर्वीच इतिहासाचं विकृतीकरण केल्याच्या आरोपांमुळे विरोधाच्या केंद्रस्थानी आला. विविध संघटनांनी तीव्र आक्षेप नोंदवला आणि हा मुद्दा थेट विधिमंडळात पोहोचल्यानं राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला. दुसरीकडे, मृण्मयी नयी देशपांडे दिग्दर्शित 'मनाचे श्लोक' या शीर्षकावर समर्थ रामदास स्वामींच्या अनुयायांनी आक्षेप घेतला. पुण्यातले शो थांबवले गेले आणि वाढता विरोध पाहता अखेर निर्मात्यांना सिनेमाचे नाव बदलावे लागले.

# मनपा निवडणूक : नामांकनांच्या गर्दीत दिग्गजांची उपस्थिती

## सहा झोनमधून १ २५ उमेदवारांनी दाखल केले अर्ज; आजी–माजी महापौर रिंगणात

■ प्रतिनिधी | अकोला ■

*महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवसाच्या पूर्वसंध्येला शहरातील राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला आहे. सोमवारी सहा झोनमधून तब्बल १ २५ इच्छुक उमेदवारांनी आपापले नामांकन अर्ज दाखल केल्याने मनपा निवडणूक रंगतदार व चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. विशेष म्हणजे, यामध्ये आजी व माजी महापौरांसह अनेक दिग्गज नेत्यांचा समावेश असल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे.*



मनपा निवडणुकीसाी आज मंगळवार हा नामांकन अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने विविध पक्षांच्या कार्यालयांत तसेच निवडणूक विभागात दिवसभर गडबड पाहायला मिळण्याची शक्यता आहे. सोमवारी दाखल झालेल्या नामांकनांमुळे आधीच राजकीय वातावरण तापले असून, अंतिम दिवशी आणखी किती उमेदवार रिंगणात उतरतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, अनेक उमेदवारांनी आपल्या नामांकन अर्जासोबत पक्षाचे नाव जोडले असले, तरी अधिकृत एबी फॉर्म अद्याप सादर करण्यात आलेला नाही, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे अंतिम क्षणापर्यंत उमेदवारी निश्चित न झाल्याचे चित्र आहे. कोणाला पक्षाची अधिकृत उमेदवारी मिळणार आणि कोण बंडखोर म्हणून मैदानात उतरणार, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. दुसरीकडे, महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. सातत्याने बै'का होत असल्या तरी तोडगा न निघाल्याने इच्छुक उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. अंतिम दिवशीच उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता असल्याने अनेकांनी खबरदारीचा उपाय म्हणून नामांकन अर्ज दाखल केल्याचे बोलले जात आहे.

आजच्या अंतिम दिवशी उमेदवारीचे चित्र स्पष्ट होणार असून, त्यानंतर खऱ्या अर्थाने निवडणूक प्रचाराला वेग येणार आहे. दिग्गज नेत्यांची उपस्थिती, वाढती इच्छुकांची संख्या आणि आघाड्यांतील अंतर्गत घडामोडी यामुळे अकोला महानगरपालिकेची निवडणूक यंदा अत्यंत चुरशीची होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

■ प्रतिनिधी | अकोला ■

नियोजन भवन येथे राष्ट्रीय ग्राहक दिन आज साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी वर्षा मीना कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. डिजिटल न्यायाद्वारे ग्राहक तक्रारींचे कार्यक्षम आणि वेगवान निवारण या विषयावर केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार मार्गदर्शन व जनजागृती यावेळी करण्यात आली. जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना निमजे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास जिल्हा पुरवठा कार्यालय अकोला व तहसील अकोला येथील अधिकारी, कर्मचारी व मोठ्या प्रमाणावर ग्राहक उपस्थित होते. संजय पाठक, कैलास बगडे यांनी ग्राहकांच्या हक्काबाबत ग्राहकांना मार्गदर्शन केले. जिल्हा ग्राहक मंच अकोलाचे अध्यक्ष श्री. कुलकर्णी यांनी यावेळी 'डिजिटल न्यायाद्वारे ग्राहक तक्रारींचे कार्यक्षम आणि वेगवान निवारण या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## ज्येष्ठ नेते हरिशभाई अलीमचंदानी यांची भाजपात घरवापसी



■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत माजी नगरसेवक हरीश आलीमचंदानी यांनी पुन्हा भाजपमध्ये कार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या निलंबनाचा निर्णय मागे घेण्यात आला असून, गुरुवारी पक्षात त्यांच्या घरवापसीचे औपचारिक स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी खासदार अनूप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, जयंत मसने, संतोष शिवरकर, वसंत बाचुका, रंजीत खेडकर, बालटाले, रवींद्र भन्साली, गिरीश जोशी, अजय शर्मा, माधव मानकर, डॉ. अमित कावरे, संजय गोटफोडे, नितेश पाली यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना हरीश आलीमचंदानी म्हणाले की, आगामी काळात भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे. पक्ष नेतृत्व जो आदेश देईल, त्याचे निष्ठेने पालन करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच, पक्षाच्या प्रदेश व स्थानिक नेतृत्वाचे आभार मानत त्यांनी भाजपमध्ये पुन्हा संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भाजप नेतृत्वानेही आलीमचंदानी यांच्या पुनर्प्रवेशाचे स्वागत करत आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन मजबूत करण्यावर भर दिला.

**Change In Name**

I have change my name From **SHIVARAJ NANDU KHANDALKAR** (Wrong Name) To **SHIVRAJ NANDKISHOR KHANDALKAR** (New Name as per on Two Photo ID) My Residential Address is- Gourakshan Road, Opp. Gajanan Floor Mill, Sahakar Nagar, VTC-Akola, Dist: Akola, State: Maharashtra Pin Code: 444004 (Address as per on Two Photo ID)

## क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या अमरावती विभागातील मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळेमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा तसेच क्रीडा नैपुण्य विकसित होण्यासाठी विभागांतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अमरावती विभागातील ५ जिल्ह्यातील मुला-मुलींची शासकीय निवसी शाळांचे विभागीय स्तरावरील स्नेहसंमेलन, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. ३० डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने स्पर्धेमध्ये अंदाजे ८०० ते ८५० विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित राहणार आहे.

क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न होणार आहे, यात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या पाचही जिल्ह्यातील समाज कल्याण विभाग यांचा नियंत्रणातील पाचही जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळा सहभागी होणार आहेत.

## पाणी सोडण्याच्या मागणीसाठी चार तास ठिय्या आंदोलन

**खेट्री :** पातूर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव परिसरात रब्बी पिकांसाठी धरणातील पाणी तातडीने सोडण्यात यावे, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी अकोला येथील जलसंधारण कार्यालयात चार तास ठिय्या आंदोलन केले. सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या नेतृत्वाखाली २९ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हे आंदोलन सुरू होते.



सावरगाव परिसरातील शेतकऱ्यांनी व्याजाने पैसे काढून रब्बी हंगामातील गहू, हरभरा आदी पिकांची पेरणी केली आहे. खरीप पिकांच्या कर्जाची परतफेड होईल या आशेवर पुन्हा कर्ज काढून पेरणी करण्यात आली; मात्र धरणात पुरेसा पाणीसाठा असतानाही पाणी सोडण्यात दिरंगाई होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. वेळेत पाणी न मिळाल्यास पिकांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान 'शेतकरी वाचवा, रब्बी पिकांना पाणी द्या' अशा घोषणा देण्यात आल्या. चार तासांच्या ठिय्या आंदोलनानंतर जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून लवकरच धरणातील पाणी सोडण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र तातडीने पाणी न सोडल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्यासह शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी सागर लाड, ज्ञानेश्वर डवंगे, निलेश बोराडे, राहुल पायघन, देविदास चोंडकर, प्रमोद चोंडकर, दीपक इंगळे, रामेश्वर लाड, बबलू इनस्कार आदी शेतकरी उपस्थित होते.

**चौकशीची जाहीर नोटीस**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला.**

**सार्वजनिक न्यास :-** श्री. द्वारकेश्वर संस्थान ट्रस्ट, अडगाव बु., ता. तेल्हारा, जि. अकोला अ- १३६ (अकोला)

ने. तारिख :- २९/०१/२०२६

चौकशी क्रमांक :-२२/२०२५- कलम 50A(1) नुसार जाहिर नोटिस

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम 50A(1) अन्वये

**अर्जदार :-** १)श्री.संतोष लक्ष्मीकांत धाके रा. प्लॉट नं. २०१, रचना तारांगण अपार्टमेंट, गंगोत्री नगर जवळ, आयुष पार्क, अमरावती. २)श्री.अनिल सांबा आपा धाके रा. वार्ड नं.४, सावकार पुरा, अडगाव बु ता. तेल्हारा जि. अकोला सर्व संबंधितांना याजाहीर नोटीस व्दारे कळविण्यांत येते की, **श्री. द्वारकेश्वर संस्थान ट्रस्ट, अडगाव बु., ता. तेल्हारा, जि. अकोला अ - १३६ (अकोला)** या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्यरितीने चालावा या दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

२) हयाअर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्यालोकांना सदर न्सासाचे योजने विषयी काही निवेदन / हरकत करावयाची असेल तर त्यांनीही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० ( तीस ) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन / हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२७८/२०२५ — प्रोसेस नं.२०६२२/२०२५
चौ.ता. ०६/०२/२०२६ — दिनांक : १६/१२/२०२५

**अर्जदार :** १. इंदीरा बापुराव कसुरकर रा. गड्डमवाडा, सागर प्रोव्हिजन जवळ, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला. २. मिनल जगदीश ढोरे रा. रामधन प्लॉट, दुर्गाश्रय अपार्टमेंट मागे, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्रिती विनोद धोरण रा. ज्ञानेश्वर हाईटस, फ्लॅट क्र. १०१, विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ४. सचिन बापुराव कसुरकर रा. दुर्गाश्रय अपार्टमेंट मागे, रामधन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ५. तृप्ती बापुराव कसुरकर रा. दुर्गाश्रय अपार्टमेंट मागे, रामधन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ६. अमोल बापुराव कसुरकर रा. सागर प्रोव्हिजन जवळ, गड्डम वाडा, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : बापुराव भाउराव कसुरकर
**पत्ता :-** रा.सागर प्रोव्हिजन जवळ, गड्डम वाडा, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बापुराव भाउराव कसुरकर यांचे दि. ०१/१०/२०२४ रोजी कोरडे हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय
(व. स्तर), अकोला

## पथनाट्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती

### 'अकोलेकर वोट कर'चा निनाद; मनपाचा उपक्रम



■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर अकोला महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागात लोककला व पथनाट्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने सोमवारी (दि. २९) तहसील कार्यालयासमोर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, आकोट फैल परिसरात प्रभावी पथनाट्य सादरीकरणातून मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये आणि अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. पातूर येथील स्व. विनायक राखोंडे प्रतिष्ठानच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पथनाट्य व लोककला कार्यक्रमाने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

युवाश्री विशाल राखोंडे लिखित पथनाट्यातून वासुदेव, गोंधळी आदी लोककलांचे सजीव सादरीकरण करण्यात आले.

लोककवी सागर राखोंडे, सुखदेव उपर्वट, प्रकाश इंगोले, गजानन आवटे, कैलास शिरसाट, गणेश देवकर, श्याम उगले, विष्णू सदार, प्रज्वल इंगळे आदी कलावंतांनी लोकगीत व पथनाट्याच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व अधोरेखित केले. 'अकोलेकर वोट कर' या घोषवाक्यातून नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच वृद्ध व दिव्यांग मतदारांना मतदानासाठी सहकार्य करण्याचे आणि मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे संदेश देण्यात आले.

यावेळी मनपा शिक्षणाधिकारी तथा मतदार जनजागृती नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा यांच्यासह मनपाचे अधिकारी-कर्मचारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पथनाट्याच्या प्रभावी सादरीकरणामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक जागृती निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

## आस्की किड्स पब्लिक स्कूलमध्ये 'इन्फिनिटी कनेक्ट' गणित परिषद उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोट ■

मानवी उत्क्रांतीपासून ते आधुनिक तंत्रज्ञानापर्यंत मानवी विकासात गणिताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. हीच संकल्पना अधोरेखित करणारी 'इन्फिनिटी कनेक्ट' ही गणित विषयावरील कॉन्फरन्स आस्की किड्स पब्लिक स्कूल व आस्की ज्युनिअर कॉलेज फॉर एक्सेलन्स येथे उत्साहात पार पडली.

कॉन्फरन्सची सुरुवात औपचारिक कार्यक्रमाने झाली. गणित विषयातील सेवानिवृत्त प्राध्यापक तथा विविध राष्ट्रीय-राज्यस्तरीय गणित परिषदांमध्ये योगदान देणारे प्रा. गजानन मासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांनी गणिताकडे केवळ अभ्यासविषय म्हणून न पाहता जीवनातील विविध क्षेत्रांत गणितीय कौशल्यांचा प्रभावी वापर करून मानवी क्षमतेचा व्यापक विकास साधावा, असे आवाहन प्रमुख वक्त्यांनी केले.



विद्यार्थ्यांच्या क्रियाशील सहभागाने व अभ्यासपूर्ण सादरीकरणाने प्रभावित होत, अकोटच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात शालेय स्तरावर अशा स्वरूपाची गणित परिषद प्रथमच आयोजित करण्यात आल्याचे अध्यक्षांनी मनोगतातून नमूद केले.

औपचारिक कार्यक्रमानंतर प्रत्यक्ष कॉन्फरन्सला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांना 'मॅथ्स किट' वितरित करण्यात आले. बांबूपासून निर्मित राऊंड टेबल्स आसनव्यवस्था असलेल्या आकर्षक 'कॉन्फरन्स हॉल'मध्ये परिषद संपन्न झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी क्लिष्ट गणितीय संकल्पना सोप्या पद्धतीने समजून घेण्यावर आधारित संशोधन सादर करत पीपीटीच्या माध्यमातून प्रभावी प्रात्यक्षिके मांडली. सात गटांत विभागलेल्या ३५ विद्यार्थ्यांनी या परिषदेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मिलिंद झाडे, प्रमुख वक्ते प्रा. गजानन मासकर, सचिव नितीन झाडे, मुख्याध्यापिका नेहा झाडे, पर्यवेक्षक पवन चितोडे आदी उपस्थित होते. गणित शिक्षक नवनाथ उबाळे व गौरी झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आशिष पवार, प्रियांका देशमुख, अंकिता पोटे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जितेंद्र लांडगे, राजेंद्र गावंडे, शक्ती तायडे यांनी परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले.

# कापूस चोरी करणारी टोळी गजाआड

### अकोट ग्रामीण पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट ग्रामीण पोलिसांनी शेतातील कापूस चोरी करणाऱ्या टोळीवर मोठी कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

दि. २८ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दर्यापूर रोडवर रात्रपाळी गस्तीदरम्यान पोलीस हवालदार वासुदेव ठोसरे यांना दोन संशयित इसम दुचाकीवर कापसाचे गाठोडे घेऊन जात असल्याचे आढळून आले. त्यांना थांबण्याचा इशारा देण्यात आला असता ते न थांबल्याने पोलिसांनी पाठलाग करून दोघांना ताब्यात घेतले.चौकशीत त्यांनी आपली नावे दीपक सुरेश गवते (वय २०) व राजेश पन्नालाल कासदेकर (वय २३), दोन्ही रा. चिपी गायराण, ता. तेल्हारा, जि. अकोला अशी सांगितली. मात्र, कापूस कुठून आणला याबाबत समाधानकारक उत्तरे न दिल्याने त्यांना पुढील



चौकशीसाठी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात आणण्यात आले. दरम्यान, अब्दुल सलीम अब्दुल रफिक (वय २८, व्यवसाय शेती, रा. सोमवार वेस, खतीबपुरा, अकोट) हे पोलीस ठाण्यात हजर होऊन त्यांच्या शेतातील कापूस चोरीस गेल्याची तक्रार दिली. तक्रारदाराने दुचाकीवरील कापसाचे गाठोडे पाहून याच आरोपींनी चोरी केल्याची खात्री केली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता सुमारे १ क्विंटल कापूस (अंदाजे किंमत ८,००० रुपये) चोरी झाल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही आरोपींनी चोरीची कबुली दिली.

पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली एमएच ३० टी ४५०० क्रमांकाची दुचाकी (कि.अं. ५०,००० रुपये) व चोरीचा कापूस असा एकूण ५८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत बी. रेड्डी व सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे, पोउपनि. मिनाक्षी काटोले, पो.है.कॉ. वासुदेव ठोसरे, निलेश खंडारे, विठ्ठल चव्हाण, आठवले, पोशी गोपाल जाधव व पांडव यांनी पार पाडली.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# कापसाला उत्पादन खर्चानुसार भाव द्या

## शेतकऱ्यांचा आक्रोश, बेभाव खरेदी, वाढती महागाई आणि शासनाच्या उदासीनतेमुळे कापूस उत्पादक संकटात

**साहूर/जनमाध्यम**
कापूस हे विदर्भासह परिसरातील शेतकऱ्यांचे मुख्य पीक असून सध्या कापूस हंगाम जोमात सुरू आहे. मात्र महागाईचा भडका, खत-बियाणे, कीटकनाशके, मजुरी यांचा वाढलेला खर्च आणि त्याच्या तुलनेत कापसाला मिळणारा अत्यल्प दर यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडला आहे. किमान उत्पादन खर्चाच्या आधारे तरी कापसाला भाव देण्यात यावा, अशी जोरदार मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

सततची नापिकी, अस्मानी-सुलतानी संकटे आणि वाढती महागाई यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहे. घरात कापूस येऊ लागल्याने काहीसा दिलासा मिळत असतानाच यंदा उत्पादन घटले असून बाजारभावात अपेक्षित वाढ झालेली नाही. वर्षभर कष्ट करून, मोठा खर्च करून पीक जोपासल्यानंतरही शेवटी हातात काहीच उरत नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.आज सोन्याचे भाव एक लाख ३५ हजार रुपयांवर पोहोचले असताना कापसाचे भाव मात्र सात हजार रुपयांच्या आतच फिरत आहेत. ही तफावत शेतकऱ्यांसाठी अत्यंत वेदनादायक आहे. शासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने खाजगी व्यापाऱ्यांकडून बेभाव खरेदी सुरू आहे. विशेषतः ग्रामीण भागात सावकार-व्यापारी पैशांच्या अटीवर अत्यल्प दरात कापूस खरेदी करत असून गरीब शेतकऱ्यांची उघडपणे पिळवणूक होत आहे.परिसरात मोठ्या




प्रमाणात कापूस उत्पादन घेतले जाते. मात्र अर्ध्याहून अधिक शेतकऱ्यांकडे सिंचनाची सोय नसल्याने शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. उत्पन्नाची कोणतीही खात्री नसताना शेतकरी बँक व सावकारांकडून कर्ज काढून शेती करतो. त्यातच पावसाचा लहरीपणा, रोगराई आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे कापूस उत्पादक शेतकरी अधिकच अडचणीत सापडला आहे. शासनाने जाहीर केलेला आठ हजार रुपयांचा हमीभाव प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मिळत नसून सात हजार रुपयांच्या आतच सर्रास खरेदी केली जात आहे. दुसरीकडे भाजीपाला ८० ते १०० रुपये किलो दराने विकला जात असताना विदर्भाचे मुख्य पीक असलेला कापूस मात्र ६० ते ७० रुपये किलोच्या दरात विकावा लागत आहे. ही परिस्थिती शेतकऱ्यांसाठी शोकांतिका ठरत असून पुढील हंगामात कापूस पिक घ्यावा की नाही, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.शासन, प्रशासन तसेच विरोधी पक्षांकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकरी करत असून, उत्पादन खर्चाच्या आधारे कापसाला तातडीने न्याय्य दर देण्यात यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी दिला आहे.

# ७५ वर्षांचा शहरी कर, पण जलतरण तलाव शून्य

## नगरपालिकेच्या उदासीनतेचा फटका तरुणांना

**सिंदी रेल्वे /मोहन सुरकार**
इ.स. १९४८ मध्ये स्थापन झालेल्या क वर्ग सिंदी रेल्वे नगरपालिकेला ७५ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. मात्र आजही शहरात मूलभूत क्रीडा सुविधांचा अभाव कायम असून, जलतरण तलावासारखी अत्यावश्यक सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सिंदी रेल्वे शहर विदर्भात कबड्डीचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. शहराने महाराष्ट्राला अनेक कबड्डीपटू दिले असले, तरी जलतरणसारख्या महत्त्वाच्या खेळात येथील तरुणांना संधीच मिळालेली नाही. शहरात मोठी नदी नसल्याने पोहण्याचे प्रशिक्षण घेण्याचा पर्याय उपलब्ध नाही. शहरातून वाहणारी नंदा नदी सांडपाणी व कचऱ्यामुळे गटाराचे स्वरूप धारण करत आहे. त्यामुळे नैसर्गिक जलतरणाची शक्यताही



संपुष्टात आली आहे. परिणामी, शहरातील विद्यार्थी व तरुण जलतरण खेळापासून वंचित राहत आहेत.नगरपालिकेकडून नागरिकांकडून नियमितपणे शहरी कर वसूल केला जातो. दर पाच-दहा वर्षांनी कराचे फेरमूल्यांकन करून करदर वाढवले जातात. मात्र या कराच्या मोबदल्यात शहरात मूलभूत सुविधाच मिळत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. शहरात आजही नियमित व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध नाही.मागील पाच वर्षांत काही बगीचे व क्रीडांगणे उभारण्यात आली असली तरी ती अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. ७५ वर्षांचा इतिहास असलेल्या शहरात आजपर्यंत जलतरण तलाव उभारण्यात न आल्याने नगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत स्पष्ट बहुमताचे सरकार सत्तेवर आले आहे. राज्यातील सत्ताधारी पक्षाचीच सत्ता नगरपालिकेत असल्याने, पुढील पाच वर्षांत तरी सिंदी रेल्वे शहराला वंचित राहिलेल्या शहरी व क्रीडा सुविधा मिळतील का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### तीन वर्षीय चिमुकलीचा विहिरीत बुडून दुर्दैवी मृत्यू

**वर्धा**-नालवाडी भागातील प्राजक्ता कॉलनी परिसरात तीन वर्षीय चिमुकलीचा विहिरीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. विधी ऊर्फ ग्रंथा धीरज सेडमाके असे मृत बालिकेचे नाव आहे.विधी चुकून विहिरीत पडल्याचे लक्षात येताच नागरिकांच्या मदतीने तिला बाहेर काढून सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

### गोवंशाची पोलिसांकडून सुटका

**आर्वी** - स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धडक कारवाई करत कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतूक करण्यात येत असलेल्या तीन जनावरांची सुटका केली. या कारवाईत जनावरांसह मालवाहू वाहन जप्त करण्यात आले.या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध आर्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# दोन महिन्यांतच 'नव्या' पुलाचे वाजले बारा

## नगरपालिकेचा भोंगळ कारभार उघडा, जनतेच्या पैशांची सरळ लूट

**हिंगणघाट/जनमाध्यम**
नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी बांधल्याचा दावा करण्यात आलेला यशवंत नगर परिसरातील लहान पूल अवघ्या दोन महिन्यांतच कोसळल्याने नगरपालिकेचा ढिसाळ आणि बेजबाबदार कारभार चव्हाट्यावर आला आहे. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी मोठ्या गाजावाजात उद्घाटन झालेला हा पूल २९ डिसेंबर २०२५ रोजी पूर्णपणे पाडून पुन्हा बांधण्याचा निर्णय घ्यावा लागणे, हेच या कामाच्या दर्जावर शिक्कामोर्तब करणारे आहे.

गजानन महाराज मंदिराजवळील नाल्यावर उभारलेला हा पूल परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग होता. जुना, जर्जर पूल पाडून 'नवीन आणि मजबूत पूल' बांधल्याची ढोलताशांत जाहिरात करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात निकृष्ट साहित्य, घाईघाईने केलेले बांधकाम आणि अभियंते व अधिकाऱ्यांची निष्काळजी देखरेख यामुळे हा पूल काही आठवड्यांतच धोकादायक ठरला. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी नगरपालिकेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.इतक्या कमी कालावधीत पूल कोसळतो, म्हणजे बांधकामात किती मोठा



भ्रष्टाचार झाला असेल, असा थेट आरोप नागरिक करत आहेत.लाखो रुपयांचा खर्च झाला, पण तो खर्च कामावर झाला की कुणाच्या खिशात गेला, असा प्रश्न उपस्थित होत आहे.या रस्त्यावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी आणि पादचाऱ्यांची वर्दळ असते. पुलाची अवस्था दिवसेंदिवस ढासळत असल्याने मोठ्या अपघाताचा धोका निर्माण झाला होता.

सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांचे प्राण धोक्यात आले होते, हे नाकारता येत नाही.आता पुन्हा नव्याने पूल बांधण्याचा निर्णय घेतला असला, तरी त्यामुळे नागरिकांचा वेळ,

कररूपाने भरलेला पैसा आणि प्रशासनावरील विश्वास सगळंच वाया गेले आहे.स्थानिक नागरिकांची ठाम मागणी आहे की निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर तातडीने गुन्हे दाखल करावेत, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी आणि नव्या पुलाचे काम उच्च दर्जाच्या साहित्याने, पारदर्शक पद्धतीने करावे.

हा प्रकार म्हणजे 'विकास' नव्हे, तर जनतेच्या पैशांची उघड उधळपट्टी असून, कागदावर काम पूर्ण दाखवण्यापेक्षा प्रत्यक्षात टिकाऊ आणि सुरक्षित काम करण्याची वेळ आता तरी प्रशासनावर आली आहे, असा संतप्त सूर हिंगणघाटकर व्यक्त करत आहेत.

# गिरड गावातील जिओ नेटवर्क ठप्प

## ग्राहक त्रस्त, तात्काळ ५G टॉवरची मागणी

**गिरड/जनमाध्यम**
गिरड गावातील जिओ मोबाईल वापरकर्ते संपूर्ण नेटवर्क अयशस्वी झाल्यामुळे तिसऱ्या दिवसापासून त्रस्त झाले आहेत. गावाच्या संपूर्ण रेंजमध्ये नेटवर्क गायब असल्याने साधा कॉलसुद्धा लागत नाही, तर ऑनलाईन कामे पूर्णपणे ठप्प आहेत. नागरिकांनी तात्काळ ५उ टॉवर बसवण्याची मागणी केली आहे.

गिरड गावाची लोकसंख्या अंदाजे १६ हजार असून घरांची संख्या २५०० च्या आसपास आहे. प्रत्येक घरात किमान दोन मोबाईल वापरकर्ते असल्यास, आणि महिन्याला एका मोबाईलचा खर्च ३०० रुपये धरल्यास, दर महिन्याला मोबाईल सिम कंपनीला ३० लाख रुपये निधी जमा होतो.पर्यटनस्थळ असल्यामुळे दर रविवारी हजारो पर्यटक गावात येतात, ज्यामुळे नेटवर्क जाम होते. परिणामी, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधणे कठीण बनते.गिरड व परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून एअरटेल, जिओ, वोडा-आयडिया, आयडिऑटलसारख्या कंपन्यांचे टॉवर उभारले गेले आहेत. मात्र ग्राहकांना नेटवर्क मिळत नसल्याने



दैनंदिन कामे अडथळ्यात येत आहेत. अनेक ग्राहक कॉलसाठी उंच झाडावर चढत आहेत किंवा इतर उंच जागांचा आधार घेत आहेत.शाळा-कॉलेज विद्यार्थी, व्यापारी, कर्मचारी तसेच सरकारी व अर्ध-सरकारी कार्यालयातील महा-ई-सेवा केंद्रांचे कर्मचाऱ्यांनाही नेटवर्क समस्येमुळे काम ठप्प करावे लागते. बाहेरून आलेल्या ग्राहकांना सेवा न मिळाल्याने त्रास सहन करावा लागतो. ग्राहक महागडे रिचार्ज करूनही कॉल किंवा ऑनलाईन कामे करू शकत नाहीत, त्यामुळे संताप निर्माण झाला आहे.परिसरातील नागरिक आणि मोबाईल ग्राहक म्हणतात, मोबाईल कंपन्यांनी तात्काळ तांत्रिक बिघाड दुरुस्त करून दर्जेदार सेवा उपलब्ध करून द्यावी.ग्राहकांचा राग वाढला आहे कारण महागडे रिचार्ज करूनही कॉल किंवा ऑनलाईन कामे व्यवस्थित होत नाहीत. परिणामी दैनंदिन जीवन, शिक्षण आणि व्यवसाय प्रभावित होत आहे.

# प्राचीन खेळ संकटांशी सामना करण्याचे धाडस वाढवतात : मोहन अग्रवाल

## नागपूर विभागीय शालेय आष्टेडो आखाडा क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन

**वर्धा/जनमाध्यम**
भारतीय संस्कृतीत प्राचीन मैदानी खेळांना अनन्यसाधारण महत्त्व असून, या खेळांमुळे शारीरिक-मानसिक विकासासह सामाजिक कौशल्ये व नेतृत्वगुण विकसित होतात. खेळातील स्पर्धा आणि आव्हानांमुळे जीवनातील संकटांचा सामना करण्याचे धाडस निर्माण होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवी मोहनबाबू अग्रवाल यांनी केले.

जिल्हा क्रीडा परिषद वर्धा, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धा आणि आष्टेडो आखाडा वर्धा जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने २७ डिसेंबर रोजी सिंचन सांस्कृतिक भवन येथे आयोजित नागपूर विभागीय शालेय आष्टेडो आखाडा क्रीडा स्पर्धा २०२५-२६ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टेडो आखाडा फेडरेशन (भारत) चे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही होते. प्रमुख पाहुणे म्हणून आष्टेडो आखाडा फेडरेशनचे संस्थापक संचालक



महागुरु राजेश तलमले, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, लॉयन्स क्लबचे अध्यक्ष निखिल रोकडे, माजी अध्यक्ष विजय सत्यम, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय सचिव किरण फुलझले, समाजसेवी अविनाश दुपारे, राजू लभाणे आदी मान्यवर उपस्थित होते. आष्टेडो आखाडा असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष उल्हास वाघ, जिल्हा संचालक मोहन मोहिते यांच्यासह अनेक पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात इमरान राही यांनी सांगितले की, प्राचीन मैदानी खेळांमुळे ऊर्जा व उत्साह वाढतो. त्यामुळे दैनंदिन जीवनातील कामे अधिक सुलभ होतात. सकारात्मक विचार विकसित होऊन सामाजिक जीवन समृद्ध होते. हे खेळ शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरतात. यावेळी महागुरु राजेश तलमले यांनीही प्राचीन खेळांच्या परंपरेचे महत्त्व विशद केले.या विभागीय शालेय स्पर्धेत सुमारे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची प्रस्तावना उल्हास वाघ यांनी केली. संचालन अमोल मानकर यांनी केले तर आभार प्रदर्शन साहिल वाघ यांनी केले.

# १५ वषीय मुलगा बेपत्ता

**समुद्रपूर/प्रतिनिधी**
येथील माउंट कॉन्व्हेंट परिसरातील १५ वर्षीय मुलगा बेपत्ता झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तेजस असे बेपत्ता अल्पवयीन मुलाचे नाव असून तो घराबाहेर गेल्यानंतर परत न आल्याने कुटुंबीय चिंतेत आहेत.नातेवाईक, मित्रमंडळी तसेच परिसरात सर्वत्र शोध घेऊनही त्याचा काहीही ठावठिकाणा लागलेला नाही. या प्रकरणी समुद्रपूर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांकडून शोधमोहीम सुरू आहे. अल्पवयीन मुले बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# वारकरी महिला भजनांनी गाजविले मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान

## समाजप्रबोधन आणि विकासाचा जल्लोष



**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**
आष्टी तालुक्यातील लहान आर्वी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या अभियानाला श्री संत पांडुरंग महाराज वारकरी महिला भजन मंडळ, लहान आर्वी यांनी सादर केलेल्या भक्तीपूर्ण भजनांनी आणि सामाजिक संदेशांनी विशेष रंगत आणली. कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण गावात उत्सवाचे व सकारात्मक वातावरण पाहायला मिळाले. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावात राबविण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. शासनाच्या लोककल्याणकारी योजना, स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन, आरोग्य सुविधा, महिला सक्षमीकरण तसेच पंचायत राज व्यवस्थेचे महत्त्व याविषयी ग्राम संघाच्या अध्यक्षा सौ. रत्नाताई गायकी यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमात वारकरी महिला भजन मंडळाने सादर केलेल्या अभंग, भजन आणि कीर्तनातून समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. स्वच्छ गाव समृद्ध गाव, एकात्मतेतून विकास आणि महिलांचा सहभाग म्हणजे गावाचा विकास असे संदेश भजनांच्या माध्यमातून मांडत ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. अभियानाच्या समारोपप्रसंगी सर्व उपस्थितांनी समृद्ध पंचायत, सक्षम महिला आणि विकसित गाव या संकल्पनेचा एकमुखाने संकल्प केला. लहान आर्वी येथे पार पडलेल्या या उपक्रमामुळे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाला मोठे यश मिळाले असून गावकऱ्यांमध्ये विकासकामांबाबत नवचैतन्य व सकारात्मकता निर्माण झाली आहे.या कार्यक्रमात वारकरी महिला भजन मंडळातील रत्ना गायकी, वंदना आमले, महानंदा भगत, बेबी इंगळे, सुशिला वाटकर, गंगुबाई इंगळे, सुवर्णा जामोदकर, शिला राऊत, मनिषा प्रांजळे, गायत्री गायकी, रंजना गाडे, आशा नवलकर, लताबाई गायकी, प्रिती वाटकर आदी महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवून यशस्वी करण्यासाठी मोलाची भूमिका बजावली.

## कराटे सामाजिक कौशल्यांचा शिल्पकार; प्राविण्यप्राप्त खेळाडूंचा दिमाखदार सत्कार

# आत्मसंरक्षणासह व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम-नगराध्यक्ष

**वर्धा/जनमाध्यम**
कराटे हा केवळ खेळ नसून तो शिस्त, आत्मविश्वास, आत्मसंरक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. करातेमुळे मानसिक संतुलन, भावनिक नियंत्रण तसेच सामाजिक कौशल्यांचा विकास होतो. विशेषतः महिला व मुलांसाठी हा खेळ सुरक्षितता आणि आत्मविश्वास वाढवणारा ठरतो, असे प्रतिपादन नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी केले. हवालदारपुरा येथील एकलव्य मार्शल आर्ट अकॅडमीमध्ये स्पोर्ट शोतोकान कराटे डो असोसिएशन ऑफ इंडिया व एकलव्य मार्शल आर्ट अकॅडमी वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्राविण्यप्राप्त कराटे खेळाडूंच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकलव्य मार्शल आर्ट अकॅडमीचे संचालक पवन तिजारे होते.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून स्पोर्ट कराटे असोसिएशन वर्धा जिल्ह्याचे संरक्षक व ज्येष्ठ साहित्यिक इमरान राही, माजी सहाय्यक पोलीस आयुक्त गंगाधर पाटील, दक्ष नागरिक फाउंडेशनचे अध्यक्ष प्रकाशजी खंडार, विश्व सिंधी सेवा संगमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भगवानदासजी आहुजा, स्पोर्ट



कराटे असोसिएशनचे उपाध्यक्ष मोहन मोहिते, सहसचिव हरीश पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.सन २०२५-२६ या कालावधीत आंतरशालेय व फेडरेशनच्या कराटे स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या खेळाडूंचा यावेळी गौरव करण्यात आला. बारामती (पुणे) येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरशालेय कराटे स्पर्धेत १७ वर्षाआतील गटात देवांशू प्रकाश लाखे व १९ वर्षाआतील गटात पियुष अनुज सिंग यांनी प्रथम क्रमांक मिळवून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. याशिवाय प्रतीक कन्नाके, रुजान बाघमोरे, भार्गव खेवले, जानवी नांदुरकर, रोमिशा वाघमारे यांनी केलेल्या उत्कृष्ट प्रदर्शनाबद्दल त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते पदक व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन स्पोर्ट शोतोकान कराटे डो असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष व जिल्हा संघटनेचे सचिव शिहान मंगेश भोंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाराष्ट्र ब्रांच ॲडव्हायझर सेन्साई चेतन जाधव व रामनगर शाखाप्रमुख सेन्साई पूजा गोसटकर यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक सेन्साई कार्तिक भगत यांनी केले. संचालन जानवी नांदुरकर यांनी केले, तर आभार भगवानदास आहुजा यांनी मानले.कराटेच्या माध्यमातून शिस्त, आत्मसंयम व सामाजिक जाणिवा रुजत असल्याचे या सोहळ्याने पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ३५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# चायनीज मांजा व प्लास्टिक विरोधात मनपाची कारवाई

## २५ आस्थापनांची तपासणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले (झोन क्र. १) यांच्या निर्देशानुसार आज दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी झोन क्र. १ अंतर्गत रामपुरी कॅम्प परिसरातील प्रविण नगर व शेगाव नाका भागात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान पतंग विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये चायनीज मांजा तपासणी, प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी करण्यात आली. एकूण २५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून तपासणीअंती अनेक आस्थापनांमध्ये कापडी, कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे प्लास्टिक वापरात असल्याचे आढळून आले.

तसेच ८ पतंग विक्री करणाऱ्या आस्थापनांची स्वतंत्र तपासणी करण्यात आली असता कुठेही चायनीज मांजा विक्री होत असल्याचे आढळले नाही. संबंधित आस्थापनांमध्ये बरेली मांजा, साधा तागा तसेच पतंग व चरख्यांची विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले.

मोहिमेदरम्यान एका आस्थापनात डस्टबिन नसल्याने तसेच काही ठिकाणी उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल प्रविण गुप्ता यांना १००० रुपये व आशिष इंगळे यांना १००० रुपये असा एकूण २००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

या कारवाईत प्लास्टिक निर्मूलन नोडल अधिकारी विनोद टांक, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी तसेच सय्यद, इम्रान खान, आकिब शेख, प्रविण उसरे, निखिल खंगाळे व रोहित हडाले उपस्थित होते. महानगरपालिकेने शहरात चायनीज मांजा व प्लास्टिक वापरास प्रतिबंध करण्यासाठी अशा तपासणी मोहिमा पुढेही सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# टपाल विभागात 'डाक जीवन विमा' प्रतिनिधींची भरती

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय डाक विभागाच्या अमरावती विभागांतर्गत डाक जीवन विमा विना मध्यस्थी नेमणूक करण्यात येणार आहे. या पदासाठी इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी २० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग यांनी केले आहे.या भरतीसाठी उमेदवाराचे वय १८ ते ५० वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक असून, किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण (किंवा समतुल्य) असणे अनिवार्य आहे. उमेदवारांची निवड ही मुलाखतीतील कामगिरी, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व आणि विमा क्षेत्रातील प्राथमिक ज्ञानावर आधारित केली जाईल. निवड झालेल्या उमेदवारांना ५ हजार रुपयांची सुरक्षा अनामत रक्कम (NSC किंवा KVP स्वरूपात) जमा करावी लागेल. प्रशिक्षणानंतर उमेदवारांना सुरुवातीला तात्पुरता परवाना दिला जाईल. मात्र, नियुक्तीच्या तीन वर्षांच्या आत आयआरडीएची परवाना परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे, त्यानंतरच हा परवाना कायमस्वरूपी केला जाईल. ही नियुक्ती पूर्णपणे कमिशन तत्त्वावर असेल. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी आपले मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि पासपोर्ट आकाराचे फोटो घेऊन प्रवर अधीक्षक कार्यालय, कॅम्प, अमरावती - ४४४६२० येथे प्रत्यक्ष उपस्थित राहावे. निवड प्रक्रियेबाबतचे अंतिम अधिकार भारतीय डाक विभागाने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

# ऑटोमध्ये महिलेचे मंगळसूत्र लंपास

## वडाळी पूल ते मालटेकडी दरम्यान चोरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नाला जाण्यासाठी निघालेल्या महिलेच्या बॅगेतील सोन्याचे मंगळसूत्र ऑटो रिक्षामधून अज्ञात प्रवाशाने चोरल्याची घटना १७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी वडाळी पूल ते मालटेकडी दरम्यान घडली. याप्रकरणी २८ डिसेंबर रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी महिला (रा. एसआरपीई कॅम्प, अमरावती) या दर्यापूर येथे लग्नाला जाण्यासाठी घरातून मैत्रिणीसोबत मोपेडने वडाळी पुलापर्यंत आल्या. सुरक्षेच्या दृष्टीने त्यांनी गळ्यातील मंगळसूत्र काढून छोटी पर्समध्ये ठेवून ती बॅगमध्ये ठेवली होती. दुपारी सुमारे ३.३० वाजता त्या बसस्थानकाकडे जाण्यासाठी एका ऑटो रिक्षात बसल्या. त्या ऑटोमध्ये आधीच एक अनोळखी पुरुष प्रवासी बसलेला होता. प्रवासादरम्यान मालटेकडी परिसरात ऑटोचे भाडे काढण्यासाठी फिर्यादीने बॅग उघडली असता त्यातील छोटी पर्स गायब असल्याचे लक्षात आले. शोध घेतल्यानंतरही पर्स न मिळाल्याने ती घरीच विसरली असावी, असा सुरुवातीला अंदाज बांधण्यात आला. त्यामुळे वडाळी बसस्टॉप येथे उतरून ऑटोचालकाला फोन-पेद्वारे भाडे देऊन त्या दर्यापूरला निघून गेल्या. दुसऱ्या दिवशी घरी परतल्यानंतर पर्सचा शोध घेतला असता ती घरीही न मिळाल्याने चोरी झाल्याची खात्री झाली. ऑटोचालकाचा मोबाईल क्रमांक (९२०९४८१७०८) फोन-पे व्यवहारातून मिळाल्यानंतर संपर्क साधला असता त्याने कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले. त्यामुळे ऑटोमध्ये बसलेल्या अनोळखी प्रवाशानेच चोरी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. चोरीस गेलेले मंगळसूत्र हे १०२ सोन्याचे मणी व पेंडॉल असलेले, अंदाजे ९.५० ग्रॅम वजनाचे असून त्याची किंमत सुमारे ३० हजार रुपये आहे. अनोळखी आरोपीचे वर्णन गोरा रंग, सडपातळ बांधा, वय अंदाजे ५० वर्षे, काळे केस, शर्ट-पॅन्ट परिधान केलेला असे आहे. याप्रकरणात महिला फिर्यादीच्या जबानी अहवालावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ आज नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याची अंतिम मुदत

## -छाननी प्रक्रिया ३१ डिसेंबरपासून

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सध्या वेगात सुरु असून उमेदवारांच्या नामनिर्देशनाचा टप्पा अंतिम टप्प्यात आला आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आला आहे.

निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या सर्व उमेदवारांनी विहित नमुन्यातील नामनिर्देशनपत्रे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे निर्धारित वेळेत सादर करणे आवश्यक आहे. निर्धारित वेळेनंतर सादर करण्यात आलेली नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

त्यानंतर प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी बुधवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून करण्यात येणार आहे. छाननी प्रक्रिया संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पाडण्यावर प्रशासनाचा भर असून सर्व उमेदवार, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व नागरिकांनी निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पुढील टप्प्यांबाबतची माहिती वेळोवेळी अधिकृत माध्यमांतून जाहीर करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# विद्यापीठात 'हेल्थ अँड फिटनेस वीक'चे भव्य आयोजन

## मतदार जनजागृतीसह आरोग्य व तंदुरुस्तीचा प्रभावी संदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या एम.पी.एड. शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्या प्रांगणात 'हेल्थ अँड फिटनेस वीक' चे भव्य आयोजन करण्यात आले. आरोग्य, तंदुरुस्ती, शारीरिक शिक्षण आणि सामाजिक जाणीव यांचा समन्वय साधणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला. प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच नागरिकांचा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रकाश मेश्राम, शिक्षण अधिकारी, अमरावती महानगरपालिका उपस्थित होते. तसेच सर्व शिक्षण विभाग प्रमुख डॉ. तनुजा राऊत, शारीरिक शिक्षण विभागातील प्राध्यापकवर्ग, कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांनी आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, 'शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, खेळ व सकारात्मक जीवनशैली आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते.' प्रमुख अतिथी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला. तसेच विद्यार्थ्यांनी मतदार दूत म्हणून कार्य करताना आपल्या नातेवाईकांना, शेजाऱ्यांना तसेच आई-वडिलांना मतदानासाठी प्रवृत्त करावे, असे आवाहन त्यांनी केले. 'हेल्थ अँड फिटनेस वीक' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.


## जाहीर सुचना

सर्वत्र आम जनतेस सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **कृष्णकुमार जिवनपंत चर्जन** यांना वारस हक्काने सहकार विभागामार्फत हंस्तातरण लेख नोंदणीकृत करुन घ्यावयाचा आहे, त्यास इतर वारसांची संमती आहे. माझे पक्षकाराचे वडिल नामे **जिवन रामचंद्र चर्जन, रा.पंचवटी कॉलनी, अमरावती, ता. जि.अमरावती** यांनी खालील वर्णनातील स्थावर मिळकतीचे दिनांक १३.०१.१९९० रोजीच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.६ नुसार सभासदत्व धारण केले होते.माझे पक्षकाराचे वडिल दिनांक १४.०६.२०२५ रोजी मरण पावले. त्याचे वर्णन येणेप्रमाणे -

मौजे-नवसारी, प्रगणे -नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्वे क्र. ४४/१, मधील लेआउट मंजुर प्लॉट क्र.३७, क्षेत्रफळ २००० चौ.फुट (१८५.९३ चौ.मी.) याची चतुःसिमा-

**पुर्वेस - २५ फुट रुंद रस्ता,**
**पश्चिमेस - प्लॉट क्र.३६,**
**उत्तरेस - शेत सर्वे क्र. ४४/१/अ,**
**दक्षिणेस - प्लॉट क्र.३८,**

येणेप्रमाणे वर्णन असलेली स्थावर मिळकत वर कोणाचाही ताबा, हक्क, गहाण, बोजा, वारसाची भानगड, हितसबंध, न्यायालयीन वाद इत्यादी असल्यास जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसाचे आत लेखी पुराव्यासह खालील दिलेल्या पत्यावर संपर्क साधावा. विहीत मुदतीनंतर कोणाचाही उजर ऐकल्या जाणार नाही, माझे पक्षकार उपरोक्त स्थावर मिळकत विकत घेण्यास मोकळे राहतील, याची कृपया नोंद घ्यावी

दिनांक - २८.१२.२०२५
अमरावती

**सही/-**
**पक्षकारातर्फे अधिवक्ता**
**(अॅड.वैभव वि.देशमुख)**
**लक्ष्मीनारायण चौक, अमरावती**
**मो.क्र.९०९६९१६९८५**

## जाहीर सुचना

**अर्जदार :- अजय रामेश्वर बिजवे**
वय वर्षे ५२, धंदा-नोकरी, रा.अमरावती

**विषय :- कै.रामेश्वर गो. बिजवे यांच्या घराचे मुळ (ओरिजनल ) दस्तऐवज, बांधकाम परवाना, मुळ नकाशा व घरा सबंधित इतर सर्व कागदपत्रे हरविल्याबाबत.**

**मा.महोदय,**

मी **अजय रामेश्वर बिजवे** आपणास सविनय विनंती अर्ज सादर करतो की, मी माझे वडिल **कै.रामेश्वर गो. बिजवे** यांच्या नावे असलेली (स्वतःच्या मालकीची) मालमत्ता गणेश कॉलनी येथील रजि.पोट जिल्हा अमरावती शहर व मनपा अमरावती हददीतील **मौजे-** राजापेठ, **प्रगणे-**बडनेरा, ता.जि.अमरावती मधील शेत सर्वे नं.४२/३ यातील लेआउट कन्व्हरटेड **प्लॉट नं.३०, क्षेत्रफळ ३१५० चौ.फुट** यापैकी दक्षिणेकडील प्लॉट त्याचे क्षेत्रफळ **१६५० चौ.फुट (१५३.३९० चौ.मी.)** याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे -

१) **पुर्वेस - ३० फुटाचा रोड**
२) **पश्चिमेस - १५ फुटाची सर्विस लाईन**
३) **दक्षिणेस - ३० फुटाचा रोड**
४) **उत्तरेस - कै. गंगाधर गोविंदराव बिजवे यांचे बांधलेले घर**

अमरावती येथे दि.१८/०३/१९८५ रोजी नोंदणीकृत झालेले दस्ताऐवज क्र.२४८६१/१९८५ दि.१२/१२/२०२५ रोजी गणेश कॉलनी ते राजापेठ या परिसरात माझ्या दुचाकीने जात असता सायंकाळी ७.०० ते ८.०० वाजता दरम्यान वरील नमुद घराचे मुळ कागदपत्र माझ्या अनावधानाने हरविलेले आहे. करिता जाहीर सुचना देत आहे.

**अजय रामेश्वर बिजवे**

**DHAMANGAON EDUCATION SOCIETY'S**
**SAU. DHAPUDEVI BHATTAD ENGLISH MEDIUM PRE- PRIMARY SCHOOL & ENGLISH MEDIUM PRIMARY SCHOOL, DHAMANGAON RLY DIST. AMRAVATI**

**REQUIRED**

| S. No. | Post | No. of Post | Edu. Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary School Teacher | 2 | HSC, Montessori Trained, who can speak & write English Fluently & Correctly |

क्र. ०३/०१/२०२६ ३.३०

s/d
Head Master
English Medium Primary School
Dhamangaon Rly

## जाहीर सुचना

१. सर्व जनतेस या जाहीर नोटीस व्दारे सुचित करण्यात येते की, **श्री प्रविण परशराम शेलोकर व सौ संगीता प्रविण शेलोकर** यांच्या मालकीची खालील वर्णन केलेली शेत जमीन माझे पक्षकाराने विकत घेण्याचा सौदा केला आहे त्या शेत जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मालमत्तेचे वर्णन**

**अ)** नोंदणी पोट तुकडी चांदूर रेल्वे, जिल्हा परिषद अमरावती, ग्राम पंचायत दहिगाव (धावडे) चे कक्षेतील, सब रजिष्ट्रार चांदूर रेल्वे च्या हददीतील मौजे दहीगाव (धावडे), ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील गट क्र.२३५ क्षेत्रफळ ०२ हे २४ आर, शेत सालीम कोरडवाहू शेत जमीन त्यातील झाडझुडपासह खोडबारासह या शेताची चतुःसिमा पूर्वेस- दहीगाव ते धानोरा माली शिव रस्ता, पश्चिमेस- श्री जगताप यांचे शेत, उत्तरेस- श्री चाफले व धुराट यांचे शेत,दक्षिणेस- श्री ठाकरे यांचे शेत.

**ब)** नोंदणी पोट तुकडी चांदूर रेल्वे, जिल्हा परिषद अमरावती, ग्राम पंचायत दहिगाव (धावडे) चे कक्षेतील, सब रजिष्ट्रार चांदूर रेल्वे च्या हददीतील मौजे दहीगाव (धावडे), ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील गट क्र.२३६ क्षेत्रफळ ०४ हे ९८ आर, पैकी ०१ हे.९७ आर.,शेत सालीम कोरडवाहू शेत जमीन त्यातील झाडझुडपासह खोडबारासह या शेताची चतुःसिमा पूर्वेस- श्री वंजारी यांचे शेत, पश्चिमेस- श्री गजानन साखराम यमगर यांचे शेत, उत्तरेस- सीताबाई रामेश्वर खराबे यांचे शेत, दक्षिणेस- श्री निर्मळ यांचे शेत.

**२.** सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्तेवर कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसबंध, गहाण, बोजा, वारसा, इजमेंटरी हक्क, सरकारी, निम सरकारी अथवा खाजगी कर्ज अथवा अन्य कोणतेही हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत माझे कडे घ्यावी. कोणत्याही प्रकारची हरकत माझेकडे न आल्यास माझे पक्षकार करारा मध्ये ठरल्याप्रमाणे यांचे कडून वरील नमूद मालमत्तेची/शेताची खरेदी करतील, नंतर कोणाचाही उजर चालणार नाही, तरी सर्वानी याची नोंद घ्यावी.

दिनांक - २९.१२.२०२५

**सही/-**
**(अॅड.अतुल सोहोनी)**
**सोहनी कॉम्प्लेक्स, विवेकानंद कॉलनी,**
**अमरावती - ४४४६०६**
**मो.क्र.९४२३६२२५३४.**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.७९७/२०२५ ने.ता.०४.०२.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.चक्रधर श्रीधर मालपे, वय ५९ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.दिलीप श्रीधर मालपे, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.प्रभाकर श्रीधर मालपे, वय ५५वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. सौ.इंदु ज्ञानेश्वर घाटोळ, वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.जालनापूर, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
५. सौ.उषा गुणवंतराव अकर्ते, वय ५२ वर्षे, धंदा - शेती
रा.वार्ड नं.७, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे श्रीधरराव परसराम मालपे** हे दि.**२४.०३.२०२४** रोजी **अंबाडा,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई नामे **सुमित्राबाई श्रीधरराव मालपे** ही दिनांक **१५.०१.२०२०** रोजी अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १९.१२.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.८११/२०२५ ने.ता.०७.०२.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.आनंदराव पांडुरंगजी गावंडे , वय ८० वर्षे, धंदा - शेती
२. श्री.सतीश आनंदराव गावंडे, वय ४४ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.मंगेश आनंदराव गावंडे, वय ४० वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ची पत्नी तर अर्जदार नं.२ व ३ ची आई **नामे पंचफुला आनंदराव गावंडे** ही दिनांक **२८.०८.२०२४** रोजी धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. तिचे मृत्यूनंतर तिचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक .१२.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.८०८/२०२५ ने.ता.२८.०१.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती माधुरी सिध्दार्थराव मोहोड, वय ३२ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्रीमती इंदुबाई संतोषराव मोहोड, वय ७५ वर्षे, धंदा - घरकाम
दोघीही रा.भाईपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ चा मुलगा **नामे सिध्दार्थ संतोषराव मोहोड** हे दिनांक **२०.०९.२०२५** रोजी AIMS Hospital, Nagpur, Tq.Dist. Nagpur येथे मरण पावलेले आहे. वरील अर्जदाराशिवाय त्यांना ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक .१२.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## E-Tender Notice

MAHA

Separate digitally sealed and signed in Two Bid System e-Tenders are invited from Registered and Experienced Licensed Electrical Contractors, for work providing skilled administering staff for Consumer Facilitation Center CFC at Urban Division, Amravati under O&M Circle, Amravati towards **E-tender No. SE/AMT/T/CFC/2025-26/T-21.** On line sale of Tender Documents on MSEDCL's website **www.mahadiscom.in** or **https://etender.mahadiscom.in** from **Dt. 29.12.2025 to Dt. 06.01.2026 upto 23.55 hrs.** Last date for EMD payment is **Dt. 06.01.2026 up to 17.00 hrs. Contact person** Executive Engineer (Adm) **Tel. No.0721-2663640**

PRO No.252

Superintending Engineer
M.S.E.D.C.Ltd. O&M Circle Office, Amravati

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९३६/२०२५
**शेख -वि- निरंक**
पुढील ता.२८.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shaikh Anis Shaikh Mubarak, Age 55 Yrs. Occu.: Labour
2. Sharifa Bi Sheikh Ais, Age 57 Yrs. Occu.: Household
Both R/o Chilam Chavani, Sindi Bk., Amravati.
3. Firdous Jaha Shaikh Sohel, Age 31 Yrs. Occu.: Household
4. Sana Sadaf Shaikh Sohel, Age 10 Yrs. Occu.: Education
5. Shaikh Hasnain Shaikh Sohel, Age 07 Yrs. Occu.: Education
(Appli.No.3 for herself and as a natural guardian mother for Appli.No.4 & 5)
Applicant No.3 to 5 R/o University Road, Near Rehebr Kirana Chamanshahwall Camp, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शेख सोहेल शेख अनिस** हे दिनांक 01.04.2021 रोजी **चिंचवड, जि.पुणे** येथे मयत झाले. अर्जदार **शेख व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेख व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२२.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.८०९/२०२५ ने.ता.०५.०२.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.बाळू बापुरावजी ठोंबरे, वय ७० वर्षे, धंदा - शेती
२. श्री.त्र्यंबक बापुरावजी ठोंबरे, वय ६८ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.दत्ता बापुरावजी ठोंबरे, वय ६३ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. सौ.प्रतिभा रमेश साबळे, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.येरला, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. सौ.रत्ना अशोकराव गायकी, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लहान आर्वी, ता.आष्टी, जि.वर्धा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे बापुराव दौलतराव ठोंबरे** हे दि.**२७.१२.२०२४** रोजी **ममदापूर,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई नामे **शकुंतला बापुराव ठोंबरे** ही दिनांक **१९.०४.२०१९** रोजी **काटपूर,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाली. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २४.१२.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.८१०/२०२५ ने.ता.२८.०१.२०२५

**अर्जदार -**
१. श्रीमती निर्मला सुधाकर गिरी, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. सौ.चित्रा दयाल भारती, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.नरदोळा (आलमपूर) पो.कान्होली, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. सौ.प्रमिला सतीश गिरी, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.घर नं.४०, प्रजापती नगरजवळ, कृष्णकूंज नगर, आमराई, यवतमाळ
४. सौ.सुलभा गजानन पुरी, वय ६६४७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.यावली शहीद, ता.जि.अमरावती
५. सौ.माला भादेस गिरी, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.१०/३ रामबाग इंदौर, ता.जि.इंदौर (म.प्र.)

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील **सुधाकर तुकाराम गिरी** हे दि.**२१.०९.२०२४** रोजी **पोरगव्हाण,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २४.१२.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ८२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### एमबीए. विभागाच्या तीन विद्यार्थीनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरवती विद्यापीठातील मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एम.बी.ए.) विभागाच्या तीन विद्यार्थीनी मोहिनी संजय राऊत, नेहा गजानन वासू आणि हर्षाली शरद पाचगडे यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. समर्पित अभ्यास, शिस्तबध्द जीवनशैली आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर या विद्यार्थीनींनी हे यश संपादन केले आहे. मोहिनी राऊत ही इन्फ्रिजीडेट इंजिनिअर्स इंडिया प्रा.लि., अमरावती येथे एक्झिक्युटिव्ह अकाऊंटंट म्हणून, नेहा वासू ही ई.एस.ए.एफ. स्मॉल फायनान्स बँक लि. येथे सेल्स एक्झिक्युटिव्ह, तर हर्षाली पाचगडे ही डव्ह गारमेंट्स प्रा.लि., अमरावती येथे सेल्स एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. दीपक चाचरकर यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.



### पी.आर.पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात उपचार शिबीर

**अमरावती -** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद यांच्या विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाज प्रबोधन संस्था गुरुकुंज कॉलनी अमरावती येथे भव्य मोफत आयुर्वेद निदान आणि उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराला सर्वसाधारण रोगनिदान तपासणी, व वातव्याधी आदि आजारांची तपासणी व औषधोउपचाराचा ११० रुग्णांनी लाभ घेतला. या शिबिराचे उद्घाटन म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाज प्रबोधन संस्था चे अध्यक्ष राजेंद्र मळसने उपाध्यक्ष सदस्य यांच्या हस्ते करून, रुग्ण तपासणी व उपचार करण्यासाठी डॉ.दिपाली नवले, डॉ.प्रणय सावरकर यांनी तज्ञ चिकित्सक म्हणून आपली सेवा दिली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी पराग डफ्फर,शुभांगी ठाकरे, रोशनी पेठे व रोशन बगणे यांनी परिश्रम घेतले.

### पेट्रोल पंपाजवळ भीषण अपघात

**चिखलदरा -** कुणाल ढेपे मार्गावरील ओसवाल पेट्रोल पंपाजवळ भरधाव टिप्परने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात अचलपूर येथील भाजीपाला अडत व्यापाऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.या अपघातात संतोष सीताराम गौर (वय ४५,रा.बुंदेलपुरा, अचलपूर) यांचा मृत्यू झाला आहे. संतोष गौर हे नेहमीप्रमाणे अचलपूर येथून परतवाडा येथील भाजीपाला अडतमध्ये दुचाकीने जात असताना भरधाव वेगाने येणाऱ्या टिप्परने जोरदार धडक दिली.

### श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथे भागवत कथा

**तिवसा-**श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूरयेथे भागवत कथेला प्रारंभ झाला असून हभप चंदाताई काटे व संजय महाराज ठाकरे यांचे प्रबोधन वाण्यातून भाविक भक्त घेत आहे विदर्भाची पंढरी जगात जननी आई रुक्मिणी माता मंदिर श्री अंबिका माता व सकल संतांच्या अस्मित कृपेने व सर्व भक्तांच्या सहकार्याने कौंडण्यपूर येथे अखंड हरिनाम सप्ताह भागवत कथेचे आयोजन १ जानेवारी २०२६ पर्यंत आयोजन करण्यात आले आहे.२५ डिसेंबर पासून सुरू करण्यात आले आहे.

### सांताक्लॉज बनून चिमुकल्या रेनायरा हिने कामगारांना वाटल्या भेटवस्तू



**अमरावती-**क्रिसमस म्हणजे आनंदाचा क्षण. या आनंदाच्या दिनी लहान मुलांना छोट्या छोट्या भेट वस्तू देऊन त्यांना आधिक आनंदी करण्यावर प्रत्येकाचा भर असतो. लहान मुलांना ख्रिसमसच्या भेटवस्तू मिळाल्या तर त्यांचा आनंद गगनात मावेनासा होतो.कॉंग्रेस नगर रोडवरील सर्वोदय कॉलनीत मात्र एका लहानग्या चिमुकलीने ख्रिसमसदिनी सांताक्लॉज बनून अमरावती महानगरपालिकेच्या गाडीतून सकाळी कचरा जमा करणाऱ्या कामगारांना भेटवस्तू देऊन त्यांना आकस्मिकरित्या आनंद दिला. बँक ऑफ महाराष्ट्र च्या मुख्य शाखेत कार्यरत असणारे श्रीयुत नवीनचंद्र खडतर व खुशबू खडतर यांची कन्या रेनायरा हिने अगदी पहाटेच्या समयी सांताक्लॉज बनून अमरावती महानगरपालिकेच्या वाहनातून प्रत्येक घरासमोरील कचरा गोळा करणारे रामाजी वरखेडे व योगेश गाढवे (ड्रायव्हर) यांना भेटवस्तू देऊन या कामगारांना आश्चर्याचा धक्का दिला. दोन्ही कामगारांनी रेनायरा कडून आनंदाने भेटवस्तू स्विकारून तिला शुभाशीर्वाद दिले.कु.रेनायरा चे सर्वत्र कौतुक होत आहे.

### अज्ञात युवकाची आत्महत्या

**धामणगाव रेल्वे -** स्थानकावर एक दुर्दैवी घटना घडली. कुर्ला एक्स्प्रेस धामणगाव रेल्वे स्थानकात येत असताना एका अनोळखी युवकाने रेल्वेखाली झोपून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदर युवक प्लॅटफॉर्म क्रमांक दोनच्या विरुद्ध बाजूस उभा होता. रेल्वे स्थानकात कुर्ला एक्सप्रेस येत असल्याचे लक्षात येताच त्याने आपला मोबाईल फोन रेल्वे ट्रॅकवर ठेवला व त्यानंतर इंजिनजवळ येऊन ट्रॅकवर झोपून आत्महत्या केली. या घटनेमुळे स्थानक परिसरात एकच खळबळ उडाली.

## भारनियमना विरोधात शेकडो शेतकऱ्यांची उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक

# हिवरखेड, दापोरी, डोंगरयावली, घोडदेव परिसरातील शेतकरी भारनियमनाला वैतागले

### दिवसा विजपुरवठा सुरू करण्यासाठी आंदोलनाचा इशारा



**अमरावती/का.प्र.**
मोर्शी तालुक्यातील हिवरखेड ३३ केव्ही उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या दापोरी डोंगर यावली सालबर्डी घोडदेव हिवरखेड बोपलवाडी इस्माइलपुर भागात अघोषित भारनियमनाने शेतकऱ्यांना वैतागून सोडले आहे. परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा विजपुरवठा न करता कडाक्याच्या थंडीमध्ये रात्री वीज मिळत असल्याने हा वीज पुरवठा त्यांच्या जीवावर उठला आहे.ओलिताची सोय आहे; मात्र शेतातील मोटारपंप मनमानी भारनियमनाने चालत नसल्याने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

महावितरण कंपनीने भारनियमन सुरू केल्यामुळे आंबिया बहार घेण्यासाठी संत्रा झाडांना व शेती पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री अपरात्री घराबाहेर पडावे लागत असल्याने जीव मुठीत घेत ओलित करावे लागत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे दिवसा भारनियमन न करता विजपुरवठा खंडित न करता दिवसा कायम वीज द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांच्या नेतृत्वात उप विभागीय अधिकारी, कार्यकारी अभियंता महावितरण यांच्या कार्यालयात शेकडो शेतकऱ्यांना सोबत घेऊन धडक मोर्चा काढून निवेदन देऊन करण्यात आली. यावर्षी संत्राचा खरीप हंगाम अवकाळी पाऊस, अतिवृष्टीमुळे वाया गेला. मात्र त्याची कसर रब्बी हंगामातून काढण्याच्या दृष्टीने बळीराजा तयारीस लागला असतांना महावितरणकडून दापोरी हिवरखेड घोडदेव डोंगर यावली सालबर्डी भागामध्ये अचानक दिवसा विजपुरवठा खंडित करत रात्री तो देण्यात येत असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अमरावती जिल्ह्यामध्ये सर्वच ठिकाणी शेतीसाठी दिवसा थ्री फेज वीज पुरवठा सुरू असतांना मोर्शी तालुक्यातील हिवरखेड उपकेंद्रांमध्ये भारनियमन करून चार दिवस रात्री आणि तीन दिवस दिवसा वीज मिळत असून महिन्यातून किमान सतरा दिवस हे रात्रीचे शेतकऱ्यांना वीज मिळनार असल्याने रात्रीच्या अंधारात त्यांना आपल्या पिकांना पाणी द्यावे लागत आहे. यादरम्यान साप, विंचूसह इतर हिंस्र प्राण्यांची दहशत असतांना सुद्धा जीवाची बाजी लावून पिकांना पाणी द्यावे लागत असल्याचे चित्र आहे. परिसरात सध्या बिबट्याची दहशत असून अनेक ठिकाणी त्याने प्राण्यांवर हल्ला करत त्यांचा जीव घेतला आहे. त्यामुळे महावितरणने शेतकरी हिताचा विचार करून वीज कंपनीने सद्या अघोषित भारनियमन थांबवावे व शेतकऱ्यांचे पीक वाचविण्यासाठी सहकार्य करावे अन्यथा शेतकऱ्यांच्या भावनेचा उद्रेक होवून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन भारनियमन थांबवावे अशी मागणी उप विभागीय अधिकारी रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता, उप अभियंता महावितरण कंपनी यांना निवेदन देऊन करण्यात आली त्यावेळी उप विभागीय अधिकारी यांनी या विषयावर तोडगा काढण्यासाठी संबंधित विभागांची बैठक ५ जानेवारी रोजी तहसील कार्यालय मोर्शी येथे आयोजित केली असून त्यामध्ये तोडगा न निघाल्यास महावितरण कंपनी विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला त्यावेळी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अंकुश घारड, राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष रुपेश वाळके, उपसरपंच कांचन कुकडे, प्रमोद दंडाळे, भगवत राऊत, अनिल कुकडे, मुकेश राऊत, प्रशांत समुद्रे, विशाल डेहनकर, प्रमोद देवघरे, निखिल देवताळे, अमोल बोडखे, महादेव पाटील, पावन गणोरकर, नंदकुमार ढोमणे, विजय ढोरे, वामन भडके यांच्यासह आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवलाजीबाबा विद्यालयाचे यश



**नांदगाव पेठ -** श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित नवलाजी बाबा विद्यालय, मंगरूळ भिलापूर या विद्यालयाने झेनित कन्सेप्ट स्कूल, मोर्शी येथे नुकत्याच झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक विभागात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी हर्ष राऊत आणि इयत्ता आठवीचा विद्यार्थी संस्कार दाभणे या दोन विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षिका मंगला मरस्कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा सायबर सिक्युरिटीमध्ये उपयोग' या अत्यंत समसामायिक व नाविन्यपूर्ण विषयावर प्रभावी प्रयोग सादर केला. या प्रदर्शनाच्या बक्षीस वितरण सोहळ्यात गटशिक्षणाधिकारी नितीन उंडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक रविंद्र जावरकर यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही त्यांचे कौतुक करत जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.

## रक्तदानातून मानवतेची सेवा

# १०१ युवकांनी केले स्वयंस्फूर्त रक्तदान

**नांदगाव पेठ/वार्ताहर**
सामाजिक दायित्वाची जाण ठेवत संत काशिनाथ बाबा संस्थानच्या वतीने आज रविवारी काशिनाथ धाम येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. संत काशिनाथ महाराजांच्या सेवाभावी विचारांचा वारसा जपत आयोजित या शिबिराला युवकांसह विविध वयोगटातील रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात तब्बल १०१ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तपणे रक्तदान करून मानवतेच्या सेवेत आपले योगदान दिले.



श्री संत काशिनाथ महाराज संस्थानच्या वतीने करण्यात आलेल्या आवाहनाला विशेषतः युवक वर्गाने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत रक्तदानासाठी पुढाकार घेतला. संस्थानच्या माध्यमातून दरवर्षी रक्तदान शिबिरे, पायदळ वारी, बाल वारकरी संप्रदाय शिबिर यांसारखे अनेक सामाजिक व अध्यात्मिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. याच परंपरेचा भाग म्हणून आयोजित या रक्तदान शिबिरामुळे संस्थानच्या सामाजिक कार्याची दखल नागरिकांमध्ये घेतली जात आहे.

भविष्यातही समाजोपयोगी, आरोग्याविषयक व जनकल्याणकारी उपक्रम सातत्याने राबविले जातील, असा विश्वास संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलाया रक्तदान शिबिरासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील रक्तपेढीच्या अनुभवी वैद्यकीय पथकाने उत्कृष्ट सेवा बजावली. डॉ. राहुल खराटे, डॉ. प्रफुल्ल पेंदाम, योगेश पानझडे, गजानन इंगळे, संगीता गायधने, जयवंत गावंडे व प्रवीण कळसकर यांनी अत्यंत शिस्तबद्ध, सुरक्षित रक्त संकलनाची प्रक्रिया पार पाडली. या यशस्वी आयोजनासाठी संस्थानचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

## अ.भा. आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स (पुरूष व महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती/का.प्र.**
राजीव गांधी युनिर्व्हसिटी ऑफ हेल्थ सायन्स, कर्नाटक येथे १२ ते १६ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स (पुरूष व महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.



पुरुष संघ (ॲथलेटिक्स) चमूंमध्ये बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराचा वैभव गवळी, स्वराज भोपाळे, नितीन हिवराळे, पार्थ सावरकर, आदिराज पाटील, रितेश लोणे, संकेत वायाळ, विकास वाघ व कुणाल चौधरी, कला व वाणिज्य महाविद्यालय, जरूडचा राहुल गवई, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा रिचर्ड ब्रॉन, हर्ष मोहन व रौनक दुबे, दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा सोहम झाटे, जे.बी. आर्टस् महाविद्यालय, चन्नी पातुरचा कृष्णकांत राखोंडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा रेवण क्षीरसागर, एस.सी.पी.ई., अमरावतीचा मुन्सिफ शेख, श्री शिवाजी महाविद्यालय, चिखलीचा वैभव बरडे याचा समावेश आहे.महिला संघ (ॲथलेटिक्स) चमूंमध्ये मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणाची पुनम बंगाळे, बी.एस. पटेल महाविद्यालय, पिंपळगांव काळेची नेहा जाधव व दिव्या जाधव, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. प्रियांका कुंडू, बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराची वैष्णवी लवाळे, श्रीमती एस.आर. मोहता महिला महाविद्यालय, खामगांवची कु. प्रणाली शेगोकार आणि गुलाम नबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळीची कु. नंदिनी गायकवाड हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. पुरुष व महिला चमूंचा प्रशिक्षण वर्ग डी.सी.पी.ई., अमरावती येथे दि. ३१ डिसेंबर, २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## मनपातर्फे प्रतिबंधित प्लॅस्टिकबाबत नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**अमरावती/का.प्र.**
आयुक्त सौम्या शर्मा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या ठोस मार्गदर्शनाखाली व प्रत्यक्ष नेतृत्वाखाली अमरावती महानगरपालिकेमार्फत शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधात जोरदार मोहीम राबविण्यात येत आहे.



या मोहिमेअंतर्गत कडवी बाजार परिसरातील श्री. कृष्ण मिनी ट्रान्सपोर्ट येथे अचानक छापा टाकून दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत सदर ठिकाणाहून १२७० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक साहित्य जप्त करण्यात आले असून संबंधितांकडून नियमानुसार ५,०००/- इतका पहिला दंड वसूल करण्यात आला आहे.याच मोहिमेअंतर्गत माहुली ट्रान्सपोर्ट, बालाजी ट्रान्सपोर्ट व कोहिनूर ट्रान्सपोर्ट येथेही सखोल तपासणी करण्यात आली असून प्लॅस्टिक साठा व वाहतुकीबाबत कडक सूचना देण्यात आल्या.या संपूर्ण कार्यवाहीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कारवाईचे प्रभावी नियोजन, मार्गदर्शन व नियंत्रण केले. त्यांच्या नेतृत्वामुळे ही कारवाई अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक आणि परिणामकारक ठरली.सदर कारवाईत प्लॅस्टिक कारवाई नोडल अधिकारी श्री. विनोद टांक, स्वच्छ भारत मिशन शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक सोपान माहुलकर, मिथुन चावरे, दर्शन देशमुख, कोल्हे तसेच अतिक्रमण विभागाची संपूर्ण टीम सक्रियपणे सहभागी होती.अमरावती महानगरपालिकेमार्फत शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर, साठा व वाहतूक करणाऱ्यांविरोधात यापुढेही कडक, सातत्यपूर्ण व धडक कारवाया राबविण्यात येणार असून नियमभंग करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# विकासात तपोवनला प्राधान्य देऊ-आ.सुलभा खोडके

### दाजीसाहेब पटवर्धन यांचा १३५ वा जयंती सोहळा उत्साहात

**अमरावती-का.प्र.**
तपोवन केवळ अमरावती शहराचा लोकगौरव नसून तपोवन जनसेवा कार्याचा अखंड दिपस्तंभ आहे. समाजाने नाकारलेले कुष्ठबांधव व उपेक्षीतांकरीता महान तपस्वी पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांनी विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन संस्थेची स्थापना केली.



दाजी साहेब यांच्या पश्चात नियामक समिती दाजीसाहेबांच्या विचारांवर संस्था चालवित होते. नवनवीन उपक्रम, उद्योगांना चालना व शासन-प्रशासन स्तरावर संस्थेच्या विकासाकरीता एक यशस्वी पाऊल टाकले आहे. दाजीसाहेबांच्या विचारांचे पाईक असलेले मी व आ. संजय खोडके यांनी मागील काही महिन्यामध्ये तपोवन संस्था व कुष्ठ बांधवांच्या सक्षमीकरणाकरीता अनेक प्रस्ताव मान्य करून घेतले आहे. येत्या काही महिन्यामध्ये तपोवन संस्थेच्या विकास कार्याला गती मिळणार असून अमरावती लोकगौरव असलेल्या तपोवन संस्थेच्या सर्वांगीण विकासाकरीता खोडके दाम्पंत्य कटीबद्ध असून तपोवन संस्थेचा निश्चितपणे विकास होणार अशी ग्वाही आ. सुलभाताई खोडके यांनी दिले.विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन येथे संस्थापक पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटर्वधन यांचा १३५ वा. जयंती सोहळ्याचे आयोजन शिव उद्यान येथे आयोजीत करण्यात आला होता. या जयंती सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून आ. सुलभा खोडके बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मातोश्री कमल गवई, सुदर्शन गांग, डॉ. गोविंद कासट, प्राचार्य दिपक धोट, तपोवन नियामक समिती सदस्य विवेक अरूण मराठे, अमरावती विद्यापीठाचे श्रीकांत पाटील, प्रा. संजय रेड्डी, प्रदीप जैन, प्रतिक राठी, सचिव सहदेव गोळे, अश्वीन आळशी, भिमराव ठवरे, ऋषिकेश देशपांडे, विद्याताई देसाई, योगेश करडे, डॉ. जामोदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दाजीसाहेबांच्या पुर्णाकृती पुतळ्याला हारार्पण करून झाली.कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपसचिव ऋषिकेश देशपांडे यांनी केले. संचलन प्रा. माधुरी सहारे यांनी तर आभार सचिव सहदेव गोळे यांनी मानले. जयंती सोहळ्याला माजी विद्यार्थी, संस्थेचे नियामक समिती सदस्य, संस्थेतील कर्मचारी, पदाधिकारी, विद्यार्थी आणि मोठया संख्येने नागरीक उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



### माजी नगरसेवक इंगोले, शेख जफर, अग्रवाल, हरमकर, कुरीलसह दिग्गज मैदानात

# सोमवारी ५१ उमेदवारांनी दाखल केले नामांकन

## -३११ अर्जाची उचल

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीची नामांकन प्रक्रिया सुरू आहे. मंगळवारी नामांकन दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यापूर्वी सोमवार २९ डिसेंबर रोजी माजी महापौर विलास इंगोले, माजी उपमहापौर शेख जफर शेख जब्बार, माजी नगरसेवक प्रवीण हरमकर, वैशाली हरमकर, राधा कुरील, संजय





अग्रवाल, प्रशांत डवरे सह अनेक दिग्गज्जांनी नामांकन दाखल केले. महानगरपालिकेच्या ७ झोन कार्यालयातून ३११ नामांकन आज उचलण्यात आले. प्रचंड उत्साह नामांकन दाखल करताना



दिसला. ढोल ताशे वाजवत दिग्गजांनी आपले नामांकन भरले. नामांकन दाखल करणाऱ्यांमध्ये प्रभाग क्रमांक सात जवाहर स्टेडियम मधून माजी नगरसेवक संजय अग्रवाल, अंजली महल्ले, माजी ☞(पान २ वर)

### ■ आज नामांकनाचा शेवटचा दिवस

महानगरपालिका निवडणुकीत नामांकन दाखल करण्याचा मंगळवार ३० डिसेंबर शेवटचा दिवस आहे. शेवटच्या दिवशी नामांकन दाखल करण्यासाठी उमेदवारांची प्रचंड गर्दी असणार आहे. उद्या बुधवार ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता निवडणूक अधिका-यांच्या अध्यक्षतेमध्ये नामांकनाची तपासणी केली जाणार आहे. ३ जानेवारी रोजी उमेदवारांची अंतिम यादी प्रकाशित होऊन निवडणूक चिन्ह वितरित करण्यात येणार आहे. यानंतर प्रचाराचा जोर वाढणार आहे.

# राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ६० उमेदवार फायनल



## एबी फॉर्म वितरित

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीची नामांकन प्रक्रिया सुरू आहे. मंगळवारी नामांकन भरण्याचा शेवटचा दिवस आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाने स्वबळाचा नारा दिला आहे. महानगरपालिकेच्या ८७ जागेवर पार्टी ने निवडणूक लढण्याची तयारी केलेली आहे. अशात पार्टीच्या वतीने ६० उमेदवारांची यादी घोषित करण्यात आली आहे.

पक्षाच्यावतीने त्यांना एबी फॉर्म वितरित करण्यात आले आहे. यामधून काही उमेदवारांनी आज नामांकन दाखल केले तर काही मंगळवारी करणार आहेत. पार्टीकडून प्रभाग क्रमांक १ शेगाव रहाटगांव मधून मेघा रत्नदीप बागडे, चंदू खेडकर ,प्रशांत धर्माळे, प्रभाग २ संत गाडगेबाबा प्रभागातून मीनल सवई, राजश्री क्षीरसागर, प्रमोद महल्ले, प्रभाग ३ नवसारी मधून प्रिया धनाडे ☞(पान २ वर)

# बहिरम यात्रेत पार्किंगच्या नावावर भक्तांची आर्थिक लूट?

### -मानवी दवाखानाही बंद -प्रशासनाविरोधात भक्तांचा संताप

**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील सव्वा महिना चालणारी प्रसिध्द बहिरम यात्रा २० डिसेंबरपासून सुरू झाली आहे .अवघ्या ७-८ दिवसांतच यात्रेतील गैर व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने, बहिरम यात्रेत भाविक दाखल होत असतात.अशातच शनिवार व रविवारला यात्रेत लाखोंची गर्दी असते.परिणामी खाजगी वाहनांची संख्याही यात्रेत खूप मोठी असते.या वाहनांसाठी यात्रा व्यवस्थापनाने , खाजगी वाहनतळाची ही व्यवस्था केली आहे . या ठिकाणी पार्किंग




करिता,वाहना नुसार दर ही ठरवून दिले आहेत.मात्र यात्रेतील सदर पार्किंग व्यवस्थेचे चालक यात्रेत येणाऱ्या भाविकांकडून,पार्किंगच्या नावांवर अव्वा च्या सव्वा पैसे घेत आहेत. परिणामी बहिरम यात्रेत पार्किंगच्या नावांवर , भाविकांची आर्थिक लुट केल्या जात आहे.तसेच यात्रेतील आरोग्यसेवेसारख्या , मूलभूत सुविधेकडेही यात्रा व्यवस्थापणाकडून दुर्लक्ष केल्या जात आहे. त्यामुळे यात्रेतील असुविधेमुळे भाविकांकडून , प्रशासनाविरूध्द संताप व्यक्त केल्या जात आहे.

बहिरम यात्रेत वाहन तळाच्या जागा लिलावात आधीच, दुचाकी व चार चाकी वाहनांसाठी दर ठरवून दिले जातात . त्यानंतर वाहन तळाच्या जागेचा लिलाव केल्या जातो.त्यामुळे ठरवून दिलेल्या दरा पेक्षा, वाहनधारकाकडून जादा पैसे घेणे.ही आर्थिक☞(पान २ वर)

# कुख्यात दुचाकी चोर गजाआड

### -फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सातत्याने घडणाऱ्या दुचाकी चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये वाढत असलेली अस्वस्थता लक्षात घेता फ्रेजरपुरा पोलिसांनी निर्णायक कारवाई करत एका सराईत वाहनचोराला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन चोरीच्या दुचाकी जप्त करून वाहनचोरीच्या साखळीचा पर्दाफाश केला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव नीरज प्रवीण नेवारे (वय १९, रा. समाधान नगर, खापर्डे बगीचा) असे असून, तो यापूर्वीही वाहनचोरीच्या गुन्ह्यांमध्ये



सक्रिय असल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या तीन दुचाकींची एकूण किंमत सुमारे १ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाचा उलगडा एका दुचाकी चोरीच्या तक्रारीतून झाला. बियाणी चौक परिसरात पार्क केलेली मोपेड अचानक गायब झाल्याची तक्रार फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि तांत्रिक तपास यांच्या आधारे संशयितावर लक्ष केंद्रित करण्यात आले. ताब्यात घेतल्यानंतर चौकशीत आरोपी नीरज नेवारे याने आपल्या एका साथीदारासह तसेच एका अल्पवयीन मुलाच्या मदतीने शहरातील विविध भागांतून दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. विशेष म्हणजे, फ्रेजरपुरा, नांदगावपेठ आणि सिटी कोतवाली पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ☞(पान २ वर)

# प्रदीप हिवसे भाजप तर धीरज हिवसे काँग्रेसमध्ये

### दोन माजी नगरसेवकांनी बदलले पक्ष

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना मागच्या निवडणुकीत प्रभाग १२ स्वामी विवेकानंद रुक्मिणी नगर येथून काँग्रेसच्या तिकीटवर निवडून आलेले प्रदीप उर्फ बंडू हिवसे तथा प्रभाग ५ महेंद्र कॉलनी नया कॉटन मार्केट परिसरातून भाजपाच्या तिकीटवर निवडून आले धीरज हिवसे या दोन्ही माजी नगरसेवकांनी ऐनवेळेवर पक्ष बदलला आहे.आप आपला पक्ष सोडून दोघे इकडून तिकडे गेले आहे. यामुळे गेल्यावेळी काँग्रेस कडून नगरसेवक राहणारे प्रदीप हिवसे भाजपा आणि भाजपाचे नगरसेवक राहणारे धीरज हिवसे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. यामुळे चर्चा जोरावर आहे. नामांकन प्रक्रिया संपण्यापूर्वी झालेल्या या परिवर्तनामुळे राजकिय समीकरण बदलले आहेत.





२०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत प्रभाग १२ मधील चार मधून तीन सीटवर भाजपा उमेदवार विजयी झाले होते. ड वर्गामधून प्रदीप हिवसे यांनी बाजी मारली होती. या प्रभागात काँग्रेसला एकमेव सीट मिळाली होती.☞(पान २ वर)

### कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी

# पोलीस अधिनियम कलम ३६ अन्वये आदेश जारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात ३० डिसेंबर रोजी महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने तसेच नामांकन पत्र दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्यादिवशी मोठ्या प्रमाणात उमेदवार नामांकन पत्र दाखल करण्याची शक्यता आहे. अशावेळी सभांचे आयोजन व मिरवणूक काढण्यात येतात. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू करण्यात आली आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये सर्व पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातील सर्व पोलिस ठाणेदार, अंमलदार व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना दि. १० जानेवारी २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ अन्वये आदेश जारी करुन प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करण्याचे आदेश पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी निर्गमित☞(पान २ वर)

# युवा सेनेचे विभागीय सचिव सागर देशमुख यांचा राजीनामा

### -राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या चार वर्षापासून युवा सेनेत अमरावती विभागीय सचिव म्हणून कार्यरत सागर देशमुख यांनी पार्टीच्या कार्यप्रणालीवर नाराजी व्यक्त करत आपल्या सदस्यतत्त्वाचा राजीनामा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना दिला आहे. राजीनामा दिल्यानंतर त्यांनी आमदार सुलभा आणि संजय खोडके यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केल्याची माहिती आहे. सागर देशमुख यांनी सांगितले की गेल्या चार वर्षापासून ते, युवासेना विभागीय सचिव म्हणून युवा सेनेच्या कार्याचा विस्तार आणि संघटनेची बांधणी करण्यासाठी कार्य करत होते. या काळात त्यांनी पक्ष संघटनेचा विस्तार आणि तरूण कार्यकर्त्यांच्या जडणघडणीत योगदान दिले. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, वरूण सरदेसाई यांनी आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थकी ठरविला आहे. पक्षाच्या विपरित काळात देखील आजवर मी आणि माझ्यासह अनेक युवासैनिकांनी साथ न सोडता पक्षावर आलेल्या संकटांना तोंड देत कार्य केले आहे. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिकवण आम्हाला नेहमीच प्रेरणा देणारी ठरली आहे.मात्र गेल्या काही वर्षात स्थानिक पातळीवर अंतर्गत गटबाजी☞(पान २ वर)

# दैनिक हिंदुस्थान व्रतस्थ पत्रकारितेचा मानदंड

### कै.व्यंकटेश जहागीरदार स्मृती सेवागौरव पुरस्कार प्रसंगी मान्यवरांचे मनोगत

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वातंत्र्यपूर्व काळापासून अव्यहातपणे लोक जागृतीचे आणि समाज प्रबोधनाचे कार्य दै. हिंदुस्थानने केले आहे. हिंदुस्थानचे संस्थापक संपादक स्व .बाळासाहेब मराठे हे स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांच्या अंतःकरणात देशभक्ती ओतप्रोत भरली होती. त्यांची लेखणी आणि वाणी दै. हिंदुस्थानच्या माध्यमातून समाजमनावर संस्कार करत होती. दै. हिंदुस्थानने कधीही नकारात्मक पत्रकारिता न करता सकारात्मक विचारांची पेरणी केली. हे कार्य



व्रतस्थपणे करणारे दैनिक हिंदुस्थान म्हणजे पत्रकारितेचा मानदंड आहे असे गौरवोद्गार कै. व्यंकटेश ब्रह्मदेव जहागीरदार स्मृती सेवा पुरस्कार वितरणप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी काढले.


सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. दि.व्यं जहागीरदार व त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचे तीर्थरूप व आदर्श शिक्षक कै. व्यंकटेश ब्रह्मदेव जहागीरदार यांच्या स्मृती जपण्यासाठी 'कै. व्यंकटेश ब्रह्मदेव जहागीरदार स्मृती सेवा गौरव पुरस्कार' सुरू केला आहे. २०२५-२६ चा हा पुरस्कार ७५ वर्षे समाजाचे प्रबोधन करणाऱ्या दै. हिंदुस्थानला ससन्मान प्रदान करण्यात आला. कार्यगौरवपत्र ५१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दै. हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे यांनी दै. हिंदुस्थान परिवाराच्यावतीने तो स्वीकारला. डॉ. के. एम. कुलकर्णी या पुरस्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाच्या☞(पान २ वर)

# रेल्वे ट्रॅक परिसरात प्रवाशांवर बिबट्याची झेप?

### गोपालनगरमधील व्हायरल व्हिडीओवर संशय , -एआय फसवणुकीचा धोकादायक प्रकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** गोपालनगर रेल्वे ट्रॅक परिसरात बिबट धावत येत थेट रेल्वे डब्याकडे झेप घेत असल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड वेगाने व्हायरल झाला असला, तरी या थरारक दृश्यामागे कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) करामत असल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात येत आहे. या व्हिडीओमुळे शहरात भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

सदर व्हिडीओमध्ये रेल्वे ट्रॅकवरून बिबट वेगाने धावत येतो, रेल्वेजवळ पोहोचतो आणि प्रवाशांवर हल्ला करतो, असे दृश्य दाखवण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र गोपालनगर परिसरात बिबट्याच्या हालचालींची कोणतीही नोंद नाही, तसेच अशा घटनेबाबत रेल्वे प्रशासन किंवा वनविभागाकडून कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही.



व्हिडीओ व्हायरल होताच अनेक नागरिकांनी घाबरून चौकशी सुरू केली. मात्र तज्ज्ञांनी या क्लिपचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर त्यामध्ये हालचालीतील कृत्रिमता, प्रकाशछटांतील विसंगती, तसेच पार्श्वभूमीतील अस्वाभाविक बदल स्पष्टपणे जाणवत असल्याचे निदर्शनास आणले. त्यामुळे हा व्हिडीओ एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करण्यात आल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. विशेष म्हणजे, हा व्हिडीओ नेमका कोणी तयार केला, तो प्रथम कोणी प्रसारित केला, याबाबत अद्याप ठोस माहिती समोर आलेली नाही. मात्र, अशा प्रकारचे फेक आणि एआय-निर्मित व्हिडीओ समाजात अनावश्यक भीती निर्माण करतात, तसेच प्रशासनावर ताण वाढवतात,☞(पान २ वर)

# वडिलांची हत्या करून फरार झालेला मुलगा ताब्यात

### -मध्यप्रदेश पोलिसांची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- मध्यप्रदेश राज्यातील बैतुल जिल्हयामध्ये आपल्या वडिलांची हत्या करून गेल्या तीन महिन्यापासून फरार असलेला आरोपी मुलगा हेमराज रामसा इवणे (रा.घुघरी म.प्र.) याला पोलिसांनी अमरावती शहरातील पलाश लाईन परिसरातून ताब्यात घेतले आहे.

माहितीनुसार बैतूल



जिल्ह्यातील भैसदेही पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली होती. आरोपी हेमराज ने आपले वडील रामसा ईवणे यांची तीन महिन्यापूर्वी हत्या केली होती. तेव्हा पासून तो फरार होता. त्याच्याविरुद्ध कलम ३०२ अन्वये ☞(पान २ वर)

# लोतवाडा ग्रा.पं. सरपंचपदी प्रिती गावंडे

### उपसरपंचपदी विनायक मानकर अविरोध निवड



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा येथील तत्कालीन सरपंच दुर्गा सुधीर गावंडे, उपसरपंच ओंकार बबन कात्रे व ग्रामपंचायत सदस्य शुभांगी अतुल भदे यांना शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याप्रकरणी अप्पर आयुक्त यांनी दि. १० ऑक्टोबरला पदमुक्त केले होते.त्यानंतर ग्रामपंचायतच्या प्रशासकपदी☞(पान २ वर)

# चिखलदरा येथील वनवे वाहतूक व्यवस्था दोन दिवस राहणार

### पर्यटकांच्या सुविधेसाठी जिल्हा प्रशासन सज्ज



**अमरावती/प्रतिनिधीः-** सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदरा येथे पर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. ही गर्दी आणि घाट रस्त्यावरील संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने वाहतूक नियमात अंशत: बदल केले आहेत. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिलेल्या आदेशानुसार, बुधवार (३१ डिसेंबर २०२५) ते गुरुवार (१ जानेवारी २०२६) या कालावधीत चिखलदरा मार्गावर 'वन-वे' (एकमार्गी) वाहतूक लागू करण्यात आली आहे.

चिखलदऱ्याकडे येणारा परतवाडा ते चिखलदरा हा रस्ता अरुंद आणि तीव्र घाटाचा असल्याने अपघाताची शक्यता असते. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने चिखलदऱ्याला जाण्यासाठी आणि परतण्यासाठी वेगवेगळे मार्ग निश्चित केले आहेत. नवीन नियमानुसार, पर्यटकांना चिखलदऱ्याला जाताना परतवाडा-धामणगाव गढी-चिखलदरा या मार्गाचा वापर करावा लागेल. तर ☞(पान २ वर)